# मूलोद्योग-शिक्षण

नों.नं. १२०१८
ग्रं.नं. ८५८

१८५०
म. ग्रं. सं. ठाणें
विभाग निबंध
क्र.नं. ८५८

लेखक
शं. सी. कद्म, शिक्षक
सेवासदन ट्रे. कॉलेज फॉर विमेन
गांवदेवी, मुंबई

REFBK-0007403

मूल्य १॥ रु.

# मूलोद्योग-शिक्षण

अं. क्र. ८८

नों. क्र. १२०१८

—:प्रकाशकः—

मनोहर नारायण कुसे.
" मनोहर प्रकाशन "
१७ अब्दुल रहेमान बिल्डींग
लेडी जमशेटजी रोड,
दादर मुंबई १४

REFBK-0007403

ग्रंथ संग्रहालय ... क्र. 0.803

—: मुद्रण स्थळ:—

पॅरॅगॉन प्रिं. प्रेस, (पृ. ४० ते ८४)
के. मनोहर प्रिं. प्रेस, (पृ. १ ते ४०, ८४ ते १००.)
डी. एल्. वैद्य रोड, दादर.
मुंबई १४

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

# अनुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | बेसिक शिक्षण योजना | १ |
| २ | सामुदायिक जीवन | २ |
| ३ | सफाई | ३२ |
| ४ | सण–समारंभ | ३७ |
| ५ | सहली | ४३ |
| ६ | चर्चा मंडळ | ५० |
| ७ | मासिक सभा | ५६ |
| ८ | न्याय मंडळ | ६१ |
| ९ | शाळेचा कारभार | ६७ |
| १० | ग्राम सुधारणा | ७२ |
| ११ | गांधींचा रचनात्मक कार्यक्रम | ७७ |
| १२ | समवाय | ९२ |
| १३ | पाढ | ९८ |

# प्रस्तावना.

पू. महात्मा गांधींनीं हिंद-राष्ट्राला ज्या अनेक अमूल्य देणग्या दिलेल्या आहेत, त्यांत ‘ मूलोद्योग–शिक्षण पद्धतीची ’ प्रामुख्यानें गणना होते.

दानशूराचें दान कितीहि श्रेष्ठ धर्जाचें असो, त्या दानाचा सदुपयोग ज्या प्रमाणांत व ज्या पद्धतीनें केला जाईल, त्यावरच त्या दानाचें यशापयश अवलंबून राहील.

‘ मूलोद्योग–शिक्षण पध्दति ’ अगदीं नाविन्यपूर्ण गोष्ट आहे. कोणत्याहि नवीन सुधारणेस प्रारंभीं लोकांचा विरोध होतच असतो; परंतु हळूं हळूं तिचें महत्त्व व आवश्यकता लोकांना पटूं लागून लोक तिचा स्वीकार करतात.

म्हणजे जो विरोध होत असतो, तो गैरसमजांमुळें निर्माण झालेला किंवा कोणत्याही नव्या गोष्टीला विरोध करायलाच पाहिजे या मनोवृत्तींतून निर्माण झालेला असतो.

विशेषतः गैर समजांमुळेंच विरोध निर्माण होत असतो. अर्थात् असे जे गैर समज असतात ते दूर करण्याची जबाबदारी ती नव सुधारणा करूं इच्छिणारांवरच असते. त्यांनीं आपलें म्हणणें व योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत जाऊन पोंचेल अशी कांहीं तरी व्यवस्था करायला पाहिजे. कारण गैरसमज वाईट असतात. एका गैर समजांतून दुसरे अनेक गैर समज निर्माण होतात व मूळ हेतूला बाध आणतात.

तेव्हां या नव-शिक्षण योजनेच्या बाबतींतहि हीच गोष्ट लक्षांत घेतली गेली पाहिजे. ती जरी सर्वांगपूर्ण अशी योजना आहे, तरी लोकांत बरेच गैर समज निर्माण झालेले आहेत. हे गैरसमज दूर करावयाचे झाल्यास या योजनेच्या अंगोपांगांचें यतार्थ चित्रण जनतेपर्यंत जाऊन पोंचलें पाहिजे.

‘ मूलोद्योग शिक्षण क्षेत्रांत सध्यां जे कार्य करीत आहेत त्यांच्यावर या दृष्टीनें बरीच मोठी जबाबदारी येऊन पडते. आणि या क्षेत्रांतील प्रत्येकानें कर्तव्य बुध्दीनें ती जबाबदारी स्वीकारून कार्यास लागलें पाहिजे.

श्री बेसिक ट्रेनिंग सेंटर, लोणी येथें असतांना प्रत्यक्ष काम करून जो अनुभव आला व सध्यां मी काम करीत असलेल्या सेवासदन ट्रेनिंग कॉलेज, मुंबई, येथें ज्या गोष्टी प्रत्यक्ष अनुभवत आहे, त्यांच्या आधारेंच ' मूलोद्योग–शिक्षण ' हें पुस्तक लिहिलें आहे. मूलोद्योग–शिक्षणांत सामुदायिक जीवनाला अधिक महत्त्व आहे. लोकशाहीचा पाया शाळांतूनच रचला जावा हें योजनेचें एक उद्दिष्ट आहे. या दृष्टीनें शाळांतून, ट्रेनिंग कालेजांतून कोणतें धोरण अंगिकारलें गेलें पाहिजे याचें अल्प–दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. प्राथमिक शाळांतूनहि मी प्रत्यक्ष या धोरणाचा अंगिकार करून पाहिलेला आहे.

अशा तऱ्हेनें कर्तव्य बुध्दीनें केलेला माझा हा पहिलाच प्रयत्न आहे. ' नव–शिक्षण ' संबंधीं आतां बरेंच वाङ्मय प्रसिद्ध होऊं लागलेलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. त्या वाङ्मय प्रसिध्दींत 'मूलोद्योग-शिक्षण' याचीहि थोडीशी भर पडेल व तें आपलें विशिष्ट स्थान प्राप्त करील अशी खात्री आहे.

या लेखन कार्याची प्रेरणा प्रि. बी. आर. पाटील, लोणी, पुणें व श्रीमान् के. एन्. गुळवे, क्रॅफ्ट ऑर्गनायझर, वेस्टर्न डिव्हिजन, मुंबई यांजपासून मिळाली आहे. विशेषतः हें जें मी कांहीं लिहूं शकलों आहे, याचें सर्व श्रेय श्रीमान् के. एन्. गुळवे ( काकासाहेब ) यांजकडेच जातें. त्यांनीं आग्रह धरला नसता तर हें लिखाण होऊंच शकलें नसतें, हें प्रामाणिकपणें कबूल करणें मी माझें कर्तव्य समजतों.

हस्तलिखित तपासण्याचें व मार्गदर्शनाचें कामहि त्यांनींच केलेलें आहे. याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.

माझे मित्र व के. मनोहर प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. एम्. एन् कुसे यांनीं सदर कृति प्रसिद्ध करण्याची जी जबाबदारी स्वीकारली व अल्पावधींतच ती वाचकवर्गाच्या सेवेस सादर केली या बद्दल त्यांचाहि ऋणी आहें.

शेवटीं, नवशिक्षण क्षेत्रांतील माझी ही कृति मी सहर्ष वाचक वर्गाच्या स्वाधीन करीत आहे. आशा आहे कीं, ट्रेनिंग कॉलेजांतील शिक्षक, विद्यार्थी व योजनेसंबंधीं आस्था बाळगणारा वाचक वर्ग उदार अंतःकरणानें ही कृति गोड करून घेतील.

फेब्रुवारी १९५० शं. सी कदम.

# " मूलोद्योग शिक्षण "

## बेसिक शिक्षण योजना

शिक्षणाचा मूळ हेतु, मनुष्याचा सर्वांगीण विकास करणें हा आहे. सर्वांगीण विकास म्हणजे शरीर, बुद्धि व भावना यांचा समप्रमाणांत विकास होय. या त्रिविधांगापैकीं एकाचीहि उणीव मनुष्य विकासास, त्याच्या सर्वांगीण उन्नतीस बाधकच ठरते. याकरितां मुलाला शिक्षण देतांना या गोष्टींची प्रामुख्यानें काळजी घेतली पाहिजे. सर्वांगीण विकसित मनुष्यच उत्तम रीतीनें व सुखासमाधानें आपलें जीवन जगूं शकतो. बुद्धि आहे पण शरीरबल नाहीं, शरीरबल आहे तर भावना नाहीं असा मनुष्य आपल्या जीवनाचें कोडें सरळ मार्गानें सोडवूं शकणार नाहीं. म्हणजे जीवन व शिक्षण यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे एवढेंच नव्हे तर तीं दोन्ही अभिन्न अशींच आहेत. जीवन जगतां येण्याचें जें ज्ञान तें शिक्षण. जीवन नेहमीं कृतिमय असतें. जीवनांत अनेक उलाढाली कराव्या लागतात. त्या उलाढाली शरीर, बुद्धि व भावना यांच्या एकमतानेंच यशस्वी करतां येतात. शरीर, बुद्धि व भावना यांची एकतानता इंद्रियांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. इंद्रियांची कार्यक्षमता त्यांना मिळणाऱ्या कामावर अवलंबून असते. वापरांत नसलेल्या वस्तु विटून जातात, यंत्रें निकामीं बनतात हा आपला रोजचा अनुभव आहे. इंद्रियेंहि अशीच कामाभावी शिथिल बनतात. काम हेंच त्यांचें पोषक अन्न आहे, म्हणून शिक्षणांत कृतीला प्राधान्य असलें पाहिजे. कृतींत हाताचें महत्त्व अधिक असतें. हात हें ज्ञानाचें–विचाराचें इंद्रिय आहे. हात हें बुद्धि आणि भावना यांना जागृत करणारें प्रभावी साधन आहे. म्हणजे हात हे मानवी विकासाचा पायाच ठरतात. हात काम करूं लागले कीं इतर सर्व इंद्रियें सतर्क होतात. बुद्धि आपलें कार्य करूं लागते. इंद्रियें अनुभव घेऊं लागतात .हा अनुभव म्हणजेच ज्ञान असतें. अनुभवाचे ज्ञान अधिक टिकावू असतें. जें अधिक काळ टिकतें तें मनुष्याच्या भावी जीवनांत उपयोगी पडत राहातें. ऐकीव ज्ञान किंवा पुस्तकांतून प्राप्त झालेलें ज्ञान व्यव-

व्हारांत उपयोगी पडूं शकत नाहीं. शास्त्राच्या व्याख्या समजणें किंवा अवगत होणें म्हणजे शास्त्राचें ज्ञान असणें नव्हे. तें कृतींत उतरूं शकलें पाहिजे. आणि तें तसें कृतींत उतरूं शकत नाहीं कारण तें कृतींतून प्राप्त केलेलें नसतें. तेव्हां, शिक्षण हें जर जीवनाकरितां आहे तर तें जीवनाला पोषक ठरणाऱ्या कृति प्रधानच असलें पाहिजे. पोपटपंचीला त्यांत फाजील स्थान असतां उपयोगाचें नाहीं. आजपर्यंतचें आपलें शिक्षण, ही पोपटपंची होती. शिक्षणाचें तें लाजिरवाणें स्वरूप होतें. जीवनाकरितां शिक्षण नसून तें नोकरी करितां, गुलामी राबविण्याकरितांच आपण प्राप्त करीत होतों. आमच्या शिक्षणाचें ध्येय परीक्षा पास करणें व नोकरी मिळविणें हें होतें. नोकरी मिळाली कीं आपलें ध्येय आपल्या हातीं आलें, ही आमची समजूत होती. या पलीकडे आपलीं कांहीं कर्तव्यें आहेत, याची जाणीवहि आम्हांला पारकी झाली होती. शरिरानें व बुद्धीनें आम्ही परकीयांचे दास बनलों होतों. या दास्यत्वांत स्वतःचें, समाजाचें व राष्ट्राचें भवितव्य आम्ही धुळीस मिळवूं लागलों होतों. अशा वेळीं 'दीपस्तंभ' स्वरूपांत गांधीजींनीं राष्ट्राच्या जीवनांत पदार्पण केलें; बुडत्या तारवाला योग्य मार्ग दाखविला. सन १९२० ची स्वदेशीची चळवळ ही राष्ट्राच्या जीवनाला दिलेली कलाटणी होती. अफाट समुद्राला अडवितां येईल, नदीच्या महापूराला प्रतिबंध घालतां येईल; पण अधोगतीस चाललेल्या राष्ट्राच्या जीवनाला योग्य दिशेला वळविणें सोपी गोष्ट नाहीं. गांधीजी धैर्याचे मेरूपर्वत होते. त्यांचें आत्मबल पराकाष्ठेस पोंहोंचले होते आणि म्हणूनच त्यांनीं राष्ट्राच्या जीवनास इष्ट वळण देण्याचें कार्य आपल्या आंगावर घेतलें. प्रलयकालाबरोबरहि लढाई देऊं शकेल असा नेता आम्हांस लाभला. आम्ही महाभाग्यवान लोक. त्यांनीं सारा देश पालथा घातला. खेड्याखेड्यांत त्यांनीं प्रवास केला. तेथील जीवनाचें बारकाईनें निरीक्षण केलें. तेथील जनतेचें जीवन पाहून त्यांना धक्का बसला. हिंदुस्थानचें वास्तव स्वरूप कोणतें, याची त्यांना पूर्ण कल्पना आली. त्यांचें दारिद्र्य, अज्ञान व भेदाभेद पाहून त्यांच्या मनाला चटका बसला. त्यांचें प्रसंगीं वज्राहूनहि कठीण होऊं शकणारें मन मेणाहूनहि मऊ झालें! रात्रंदिवस त्यांच्या डोळ्यापुढें —" माझे हे पतित बांधव केव्हां

सज्ञान होतील ! " हेंच ध्येय असे. ते जगत होते गरिबांकरितां, शणित होते गरिबांकरितां व दरिद्री नारायणाचा अवतारहि त्यांनीं धारण केला होता गरिबांकरितां अशाप्रकारें त्यांनीं सात लाख खेड्यांतील बहुसंख्यांक भारतीयांस उद्धरण्याकरितां अस्पृश्यता निवारण, ग्रामोद्योगाचें पुनरुज्जीवन, खादी व स्वदेशी प्रचार इत्यादि कार्यें प्रथम हातीं घेतलीं. समाज सुधारणा अगोदर कीं राष्ट्रस्वातंत्र्य अगोदर, हा वादच त्यांच्यापुढें कधीं उभा राहिला नाहीं. त्यांनीं या दोन्ही गोष्टी केव्हांहि पृथक मानल्या नाहींत; तर या दोन्हीं क्षेत्रांत त्यांनीं एकदमच हस्तक्षेप केला. सुधारणा घडवून आणायच्या, राष्ट्रीय स्वातंत्र्य प्राप्त करायचें. हीं साध्यें जशीं श्रेष्ठ, तशीं तीं प्राप्त करण्याचीं साधनेंहि तितकींच श्रेष्ठ–विशुद्ध असावींत, असा त्यांचा आग्रह असे. ते आपल्या कोणत्याहि कार्याची इमारत सत्य-अहिंसा व प्रेम यावर उभारीत. ते म्हणत, " मी माझ्या सत्य–अहिंसा व प्रेम या मार्गानें सारें जग जिंकीन." त्यांनीं आपल्यावरील तत्त्व प्रणालीनें सामाजिक व राष्ट्रीय क्रांति जशी घडवून आणली तशी आणखीहि एक अहिंसक महान क्रान्ति घडवून आणली आहे. त्यांनीं पाहिलें, आपला देश राजकीय गुलामगिरीतच खितपत पडलेला नसून तो अनेक रूढी–बंधनांत गुरफटलेला आहे. त्यांतून त्यास मुक्त करायचें म्हणजे त्यांतील जनतेंत ज्ञानाचा प्रसार होणें आवश्यक आहे. मनें सुसंस्कृत झालीं कीं, रूढीचीं बंधनें शिथिल पडतील व सामाजिक सुधारणा घडून येईल. या समाज सुधारणेंतून, समाज जागृतींतून राष्ट्रीय जागृति निर्माण होईल व देश स्वतंत्र होईल, याची त्यांना खात्री वाटत होती. आणि म्हणूनच त्यांनीं या खेडयांच्या उद्धाराचें कार्य प्रथम हातीं घेतलें.

कोणतीहि सत्ता घ्या कीं, जी परशोषणावर आधारलेली आहे; ती केव्हांहि आपल्या ताब्यांतील देशांची प्रगति राष्ट्रीय दृष्टीनें होऊं देणार नाहीं. त्या सत्तेचे कायदेही असेच घडविले जातील कीं, ज्यांत माणुसकीची दृष्टि नसून स्वसंरक्षणाची तजवीज केलेली असेल मग त्या त्या देशांचा शैक्षणिक प्रश्न असो, कीं राजकीय वा आर्थिक प्रश्न असो, त्यांत स्वसंरक्षणाची व्यवस्था, आपल्या अधिपत्याची निर्धोकता दृष्टिआड केली जाणार नाहीं. ब्रिटिश

साम्राज्याचें हिंदुस्थान बाबतींतलें धोरण अशाच प्रकारचें होतें म्हणूनच त्यांना इतक्या दीर्घ कालपर्यंत येथें राज्य करतां आलें.

राजा तथा प्रजा. तसेंच, जसें शिक्षण तसें जीवन असें म्हटलें तर तें अनुचित ठरणार नाहीं. जीवन जगतां येण्याची जी कला तें शिक्षण; राष्ट्राची गरज भागविणारें तें शिक्षण. हाच शिक्षणाचा खरा अर्थ आहे व असला पाहिजे. ह्याच कसोटीवर जें शिक्षण उतरेल, तेंच खरें शिक्षण असें मानल्यास व आम्हाला ब्रिटिशांच्या कृपा छत्राखालीं मिळालेल्या शिक्षकांचें सिंहावलोकन केल्यास, असें आढळून येईल कीं, आम्हांला शिक्षणाच्या पवित्र नांवानें जें कांहीं दिलें जात होतें, तें शिक्षण नव्हतें. त्यांत व्यक्ति विकास वाव नव्हता, समाज उन्नतीस पोषक असें त्यांत कांहीं नव्हतें. कीं राष्ट्रीय वृत्तीला जागविणारें त्यांत धोरण नव्हतें. धोरण होते, नोकरवर्ग निर्माण करण्याचें. हाच एकनिष्ठ नोकरवर्ग त्यांच्या सम्राज्याचा आधार होता. ह्याचाच नोकरशाहीनें त्यांचें आसन स्थीर केलें. ह्याच नोकरशाहीनें स्वार्थासाठीं देशाच्या प्रगतीवर नांगर फिरवला.

ही नोकरशाही निर्माण करण्याकरितां त्यांनीं पाश्चात्य पद्धतीनें शिक्षण देण्याचा घाट घातला. आपल्या इंग्रजी भाषेचें, इंग्रजी संस्कृतीचें, आचारा, विचाराचें अवास्तव स्तोम माजविलें. आपलें तेवढें श्रेष्ठ; इतरांचें सर्व टाकाऊ हें दाखविण्याकरितां अनेक योग्यायोग्य मार्गांचा त्यांनीं अवलंब केला. मिशनरी लोकांचा सुळसुळाट झाला. त्यांनीं खेडींपाडीं व्यापलीं. तेथील भोळ्या व मागासलेल्या समाजास लालूच दाखवून आपल्या धर्मांत त्यांना प्रवेश दिला. खेडोपाडीं बायबलच्या प्रती वाटून ख्रिस्त-धर्माचा प्रचार केला. हें सर्व कशासाठीं तर अडाणी अशा हिंदुलोकांचा व त्यांच्या धर्मांचा उद्धार करण्याकरितां! आकाशांतल्या बापाचें दर्शन घडविण्याकरितां! पाश्चात्य संस्कृतीचा टेंभा मिरविण्याकरितां!

अशा मिशनरी लोकांच्या शाळांत पाश्चत्य पद्धतीचें शिक्षण घेत असलेल्या हिंदुस्थानी साहेबाला आपली भाषा, आपली संस्कृति व आपलें सारेंच तुच्छ वाटूं लागलें. आपल्या आईस आई म्हणण्याची शरम वाटूं लागली. एकंदरींत काय, तो स्वतःस इतर देशबांधवांपासून

वेगळा समजूं लागला. ही मिशनरी शाळांची कामगिरी! याशिवाय प्रत्यक्ष सरकारी देखरेखीखालीं सुरू झालेल्या शाळा–कॉलेजांची हिंदुस्थान उद्धरण्याची तयारी जोरांत चालू होतीच! हीं कॉलेजें म्हणजे नेटिव्ह साहेब निर्माण करावयाचे कारखानेच होते! असे साहेब विशेषतः मोठमोठीं गणलीं जाणारीं जीं शहरें, त्या शहरांतून निर्माण केले जात होते. अशांचा एक वेगळाच समाज निर्माण होत होता. हा समाज स्वतःला सुशिक्षित सुसंस्कृत मानी. त्यांनीं प्राप्त केलेलें शिक्षण थोर, त्यांचे आचार–विचार आणि उच्चारहि थोर, अशा तऱ्हेची त्यांची मनोवृत्ति तयार झाली होती. म्हणजे या पाश्चात्य शिक्षणानें हिंदुस्थानांत दोन समाज निर्माण झाले. एक शहरी वातावरणांत इंग्रजी थाटामाटानें राहणारा, व दुसरा खेड्यांतील जीवन कंठून हिंदुसंस्कृति टिकवणारा. एक पाश्चात्य मनोवृत्तीनें भारलेला, तर दुसरा पूर्वापार चालत आलेल्या आपल्या रीतिरिवाजांना चिकटून राहिलेला.

अशा प्रकारें आमच्या समाजांत नकळतच भिन्नता निर्माण होत होती. या दोन्ही समाजांचे विचार–आचार दिवसें दिवस परस्परापासून दूरावत होते. अर्थात एक प्रकारची भयंकर अशी फुटीरवृत्ति यांतून निर्माण झाली होती. हिचें अधिक प्राबल्य झाल्यास देशाला वांचविणें अशक्यच आहे. ही गोष्ट कांहीं राष्ट्रीय विचारवंतांच्या लक्षांत आली. त्यांना भारताचें भवितव्य धोक्यांत असल्याचें स्पष्ट दिसूं लागलें. त्यांचा आत्मा तळमळला–खळबळला. त्यांनीं या विरुद्ध आवाज उठविण्याचें ठरविलें; पण या आवाजाला बाहेर पाडणें कांहीं सोपें नव्हतें. परक्या सत्तेचा बडगा त्यांच्या टाळक्यांत हाणला जाण्याचा दाट संभव होता. अशा आणीबाणीच्या काळांत महात्माजी आम्हांला म्होरके मिळाले. त्यांनीं स्वदेशी, असहकार, कायदेभंगादि चळवळी हातीं घेतल्या. जसे ते राजकारणांत निर्धारानें पुढें सरकत होते, त्या बरोबरच इतरहि बाबतींत त्यांचे विचार चालू होतेच. आफ्रिकेंत टॉलस्टाय आश्रमांत त्यांनीं प्रत्यक्ष शिक्षकाचें काम केलें होतें. आपल्या सूक्ष्म निरीक्षणानें त्यांचे शिक्षण विषयक असे ठाम विचार तयार झाले होते. ते पट्टीचे शिक्षणशास्त्रज्ञ नव्हते, असें जरी मानलें तरी ते पट्टीचे शिक्षक होते ह्यांत संशय नाहीं. त्यांनीं जें

कांहीं शिक्षण विषयक ज्ञान संपादन केलें होतें, तें सर्व अनुभवांतून, निरीक्षणांतून व परीक्षणांतून प्राप्त केलेले होतें. दोनचार पुस्तकें वाचून नुसते कागदी पंडीत झालेल्या कोणत्याहि तज्ज्ञापेक्षां त्यांचा अधिकार श्रेष्ठ होता. आणि अगदीं सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास व आजपर्यंतच्या शिक्षण विषयक सुधारणा ध्यानीं घेतल्यास या सुधारणापाठीमागें कोणातरी शिक्षकाचाच हात राहिलेला आहे.

महात्मा गांधींच्या शिक्षणांतलि हस्तक्षेपामुळें कांहीं पंडितांचीं डोकीं भडकलेलीं जीं दिसतात, त्याचें कारण म्हणजे त्यांची विकृत मनोवृत्ति हेंच आहे; पाश्चात्य शिक्षणाचा तो एक परिणाम आहे. असे पाश्चात्य शिक्षणानें भारावलेले लोक कोणत्याहि गोष्टीचा कस लावायचा झाल्यास पश्चिमेचा आधार घेत असतात. जणूं बाऱ्या जगांतलें जें उत्तमांत उत्तम तें सारें पाश्चत्य संस्कृतींतच सांठवलेलें आहे! जोंपर्यंत ही मनोवृत्ति बदललेली नाहीं, जोपर्यंत राष्ट्रीय दृष्टिकोन आमच्यांत निर्माण झालेला नाहीं, जोंपर्यंत आम्ही आमचें अंतरंग तपासलेलें नाहीं, तोंपर्यंत आम्हास महात्माजींचे विचारच कळूं शकणार नाहींत. जर अशा टीकाकार पंडितांनी थोडेसें आत्मशोधन केलें, देशाची ओळख करून घेतली; तर गांधी शिक्षण योजनेचें मर्म आंकलन होण्यास विशेष परिश्रमाची गरज भासणार नाहीं.

इ. स. १९१५ मध्य महात्माजींनीं अहमदाबाद येथे सत्याग्रहाश्रमाची स्थापना केली. व तेव्हां पासूनच त्यांचा हिंदुस्थानच्या राजकारणाशीं संबंध आला. याच वेळेपासून त्यांचे विचार, चालू शिक्षणांतील सदोशता कोणत्या मार्गानें घालवितां येईल, या बाबतींत सुरू झाले होते. बौद्धिक–पुस्तकी शिक्षण जीवनांत उपयोगी पडूं शकत नाहीं, याचा त्यांनीं अनुभव घेतलेला होता. साबरमती आश्रमांत त्यांनीं जी राष्ट्रीय शाळा सुरू केली होती, त्या शाळेंत बौद्धिक शिक्षणाबरोबरच हस्तव्यवसायाचें शिक्षण देण्याची व्यवस्था त्यांनीं केली होती. त्यांना नेहमीं असें वाटे कीं, कोणत्याहि उद्योगांतून किंवा हस्तव्यवसायांतून अशा वस्तु निर्माण झाल्या पाहिजेत कीं ज्या आपल्या उपयोगांत येऊं शकतील. प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत ते म्हणत कीं, ' विद्यार्थी शाळेंत शिकत असतांनाच कोणता तरी उत्पादनशील असा त्यानें

उद्योग करावा व आपला खर्च भागवावा.' इ. स. १९३४ सालीं ते वर्ध्याला येऊन राहिले व तेव्हां पासून त्यांचे शिक्षण विषयक विचार जोरांत सुरू झाले.

मादक पदार्थांच्या उत्पन्नावर शिक्षणासारखें पवित्र कार्य अवलंबून असण्यापेक्षां असें शिक्षण बंद झालेलें बरें, असें त्यांना ठाम वाटे व म्हणूनच "दारुबंदी करतां, मग शिक्षण कार्य कसें चालेल ?" असा प्रश्न विचारणारास ते वरील उत्तर देत. या प्रश्नानें ते बेचैन होऊन जात. या बेचैनींतूनच त्यानीं स्वावलंबी शिक्षणाची घोषणा केली. स्वावलंबी शिक्षण करायचें म्हणजे तें उत्पादन शील उद्योग-प्रधानच असलें पाहिजे. या उद्योगांत विद्यार्थी, सृजन-कृति-द्वारा शिक्षण प्राप्त करू शकेल व कृतिद्वारा मिळालेलें शिक्षण हेंच त्याच्या आयुष्यांत त्याला उपयोगी पडेल. जो उद्योग तो करील, तो उद्योग स्थानिक गरज भागविणारा असला पाहिजे. या दृष्टीनें गांधीजी ग्रामीण उद्योग धंद्यावर अधिक भर देत. शें. ८५ टक्के लोक शेतकरी असलेल्या या ७ लाख खेड्यांच्या देशांत शेती हाच प्रमुख उद्योग आहे. त्या नंतर कताई-विणकाम, सुतारी, लोहारी बागायत, कातडीं काम इत्यादि मूळ उद्योग येतात.

जुलई १९३६ पासून गांधीजींनीं या मूलोद्योग शिक्षणावर आपले विचार 'हरिजन'मधून व्यक्त करण्यास सुरवात केली. शिक्षणानें साक्षरतेचा प्रसार होऊं शकेल; परंतु साक्षरता हेंच शिक्षणाचें अंतिम ध्येय नाहीं. संपूर्ण मनुष्य तयार करणें हें शिक्षणाचें ध्येय आहे व तें साध्य होण्यास विद्यार्थ्यांचें शिक्षण उत्पादनशील अशा कृतीमधून झालें पाहिजे, असे ते प्रतिपादीत.

वर उल्लेखिलेल्या मूल उद्योगांपैकीं कताई-विणकामावर गांधींनीं विशेष भर दिला. हिंदुस्थानांत प्राचीन काळीं जे हस्तव्यवसाय उदयास आले व ज्यांनीं जगाच्या बाजार पेठा हस्तगत केल्या, त्यांत हिंदुस्थानच्या कापड धंद्याचा प्रथम क्रमांक होता. आणि याच धंद्यामुळें देशांत भरपूर पैसा खेळता राहात होता; सोन्याचा धूर येथें निघत होता. आणि याच सोन्याच्या धुरानें साऱ्या जगाचें लक्ष हिंदुस्थानाकडे वेधलें. असा हा भरभराटलेला देश आपल्या ताब्यांत असणें म्हणजे जगाचें स्वामित्व आपणांकडे

येणेंच आहे, असें प्रत्येक बाहेरील राष्ट्रास वाटत होतें. इ. सनापूर्वी २ शतकें आमच्या देशांतील व्यापाऱ्यांनीं अमेरिकेशीं दळणवळण ठेवलेलें आहे. अमेरिका, इंग्लंड इकडील स्त्रिया आमच्या डाक्याच्या मलमलीनें वेडया झालेल्या होत्या. आज आपण कापड किंवा इतर वस्तु विकत घेतांना इंग्लंडची आहे कीं, अमेरिकेची आहे, अशी जशी चौकशी करतो व वस्तु घेतों, तीच स्थिति त्याकाळीं वरील देशांतल्या लोकांची होती. पुढें ही दैन्यावस्था त्यांच्या लक्षांत आली व त्यांनीं पद्धतशीर रीतीनें हिंदुस्थानच्या या कापड धंद्यास आळा घातला. नुसता आळा घालून परिस्थिति आटोक्यांत येणारी नव्हती, हें त्यांनी जाणलें व शक्य झाल्यास हा धंदाच नष्ट करून टाकावा, असा त्यांनीं संकल्प केला. जकाती बसविल्या, आयात बंदी घातली, उत्पादन प्रमाणांत करायला लावलें, कच्चा मालच फक्त उत्पन्न करा, असा कायदा केला नाना तऱ्हा त्यांनीं केल्या व आपल्या देशावरचें महान संकट त्यांनी टाळलें. अशा त्यांच्या प्रयत्नानें हिंदुस्थान दिवसेंदिवस कंगाल बनत गेला. कारागिरांना काम न मिळाल्यामुळें त्यांचें कसब पिढ्यान्‌पिढया कमी कमी होत गेलें व सध्यां देशांतल्या कांहीं भागांत मोठ्या नशिबानें जेमतेम जगत असलेला विणकर पूर्व चिन्ह म्हणून उरला. राज्यकर्त्यांनीं या आमच्या प्राचीन वैभव संपन्न उद्योगाकडे लक्ष देण्यासहि आम्हांला फुरसत दिली नाहीं, तो आमचा धंदा होता किंवा आहे, यांची जाणीवहि आमच्यांत उरली नाहीं. आम्ही या धंद्यापासून फार दूर गेलों. आमचा धंदा आम्हांला परका झाला; आमच्या देशांत आम्ही परके ठरलों.

आम्हीं कच्चा माल उत्पन्न करावा, परक्या राष्ट्रांनीं तो कवडी मोलानें खरेदी करावा, आपल्या देशांत नेऊन पक्का बनवावा व आम्हांलाच तो मोहरेच्या किंमतीनें विकावा; आम्हीहि डोळे मिटून खरेदी करावा, हा दैवदुर्विलास आमच्या वाट्यास आला.

व्यापारी जगांत पक्क्या मालाचे स्थान श्रेष्ठ असतें. ज्या प्रमाणांत पक्का माल देशांत तयार होईल, त्या प्रमाणांत राष्ट्राची आर्थिक स्थिति सुधारेल. हिंदुस्थान ही जगप्रसिद्ध कच्चा मालाची खाण व पक्क्या मालाचें गिऱ्हाईक

हिंदुस्थाननें कापूस पिकवावा व इंग्लंडअमेरिकेकडे रवाना करावा, हा शिरस्ता याच कापसानें आम्हांला भिकारी बनविलें. यानेंच आमचें सर्वस्व लुटलें !

गांधीजींनीं ही गोष्ट अत्यंत बारकाईनें तपासली. त्यांना हेंच एक स्वराज्य प्राप्तीचें मर्मस्थान सांपडलें. त्यांनीं तें आपल्या अनेक चळवळींद्वारा देशापुढें मांडलें. 'चरखा चला चलाके लेंगे स्वराज्य लेंगे' हा त्यांनीं सर्वांना मंत्र शिकवला. प्रारंभीं लोकांचा यावर विश्वास बसेना कीं, सूत कांतून कोठें कोणाला कधीं स्वराज्य मिळालें आहे! पण गांधीजी आपल्या विचारावर अचल होते. हें त्यांचें विचाराचें स्थैर्य हेंच लोकांचा विश्वास संपादन करण्याचें अचूक साधन होतें. १९२० सालापासून या चरख्याचा महिमा लोकांनीं गायला आहे. याच चरख्यानें अनेक कर्तबगार माणसें राष्ट्रांत निर्माण केलीं आहेत. तिरंगी झेंडा व त्यावर विराजणाऱ्या चरख्यानेंच अनेक वीरांना राष्ट्रसेवेचें वेड लावलें आहे.

१९३७ सालापर्यंत महात्माजींनीं राष्ट्रांत अशा तऱ्हेचें स्वदेशी वातावरण या चरख्याच्या साह्यानें निर्माण करीत आणलें. लोकांत भरपूर जागृति निर्माण केली. या जागृतींतून विधायक प्रवृत्ति निर्माण झाली. १९३५ च्या कायद्यानें झालेल्या सार्वत्रिक निवडणुकींत राष्ट्रसभा विजयी झाली व १७ जुलै १९३७ मध्यें सात प्रांतांत कॉंग्रेस मंत्रिमंडळें स्थापन झालीं. गांधीजींची विचार मालिका चालू होतीच. मंत्रिमंडळांचें राज्यरूढ होणें ही अशाच वेळीं त्यांना नामी संधि प्राप्त झाली. त्यांच्या मनांत सूक्षावस्थेंत असलेले विचार या संधीचा फायदा घेऊन बाहेर पडूं लागले. स्वराज्याचें स्वप्न दृष्टिपथांत आलेलें त्यांनीं पाहिलें. गुलामगिरीचा शेवट होण्याचें चिन्ह त्यांना दिसूं लागलें; पण त्यांच्या मनांत चालू पाश्चात्य पद्धतीच्या शिक्षणाचें शल्य होतेंच. त्यांना हें शिक्षण म्हणजे स्वराज्याच्या मार्गांतली धोंडच वाटत होती. येवढेंच नव्हे, तर हा आमच्या स्वराज्यास एक प्रकारचा शापच ठरेल याची त्यांना पूर्ण कल्पना येऊन चुकली होती. म्हणून त्यांनीं आग्रहानें पुढील प्रतिपादन करण्यास सुरवात केली—

( १ ) चालू शिक्षण पद्धति हिंदुस्थानसारख्या गरीब देशास कोणत्याच बाबतींत उपयुक्त नाहीं.

( २ ) संपूर्ण मनुष्य निर्माण करण्याचें जें शिक्षणाचें ध्येय तें या पद्धतीनें गांठतां येत नाहीं.

( ३ ) हें शिक्षण केवळ पुस्तकीज्ञानावर भर देणारें असून विद्यार्थ्यांची शारीरिक, मानसिक व नैतिक अधोगति करणारें आहे.

( ४ ) ह्या शिक्षणांत जीवनाला प्राधान्य नसल्यामुळें, शिक्षण पुरें करून बाहेर पडलेला विद्यार्थी जीवनसंग्रामांत अयशस्वी ठरतो.

( ५ ) ह्या शिक्षणानें राष्ट्रीय वृत्ति निर्माण होऊं शकत नाहीं. उलट गुलामप्रवृत्तीचेंच पोषण होतें व ती वाढत जाते.

तेव्हां आपल्या राष्ट्राला पोषक अशी एकादी शिक्षणपद्धति आखण्यांकरितां देशांतील शिक्षणशास्त्रज्ञांनीं एकत्र यावें, असें त्यांना वाटत होतें. हरिजनमधून केलेलें लिखाण, हें अशा लोकांच्या विचारांना चालनाच होती.

चालू शिक्षणाचे दोष मागील प्रमाणें लोकांच्यापुढें मांडून त्यांनीं आपल्या 'नवीन शिक्षणा'च्या कल्पना लोकांपुढें पुढील प्रमाणें मांडल्या होत्या—

(१) प्राथमिक शिक्षणाची अवधि ७ वर्षांची असावी. ७ व्या वर्षी मुलाला शाळेत प्रवेश मिळावा. १४ व्या वर्षी त्याचें प्राथमिक शिक्षण पुरें व्हावें. इंग्रजी सोडून बाकीचे विषय चालू मॅट्रिक परिक्षेच्या योग्यते इतके त्यांना अवगत व्हावेत.

(२) सर्व प्रा. शिक्षण मातृभाषेंतूनच दिलें जावें.

(३) देशांतल्या प्रत्येक मुलास ७ वर्षे पर्यंत मोफत व सक्तीचें शिक्षण मिळावें.

(४) हें सर्व शिक्षण कोणत्यातरी उत्पादनशील अशा मूलोद्योगाद्वारा किंवा हस्तव्यवसायाद्वारा दिलें जावें.

वरील आशयाचे विचार त्यांनीं हरिजनमधून लोकांपुढें मांडल्यानंतर कांहीं विद्वानांनीं आपापल्या परीनें बऱ्याच शंका गांधीजींपुढें मांडल्या. पैकीं कांहीं पुढील प्रमाणें होत्या—

(१) आजपर्यंत, शिक्षणाप्रीत्यर्थ होणारा खर्च हा मादक पदार्थांवरील करांतून केला जात होता व आहे. जर अशा मादक पदार्थांवर बंदी घालावी, असें आपण म्हणतां, तर शिक्षणाचा खर्च कसा चालवितां येईल ?

( २ ) जो हस्तव्यवसाय मुलांना शिकवावा असें आपण म्हणतां व स्वावलंबी शाळा बनवाव्यात असें प्रतिपादतां, तें कसें काय शक्य आहे ? लहान वयाच्या विद्यार्थ्यांकडून इतक्या उत्पादनाची कशी काय अपेक्षा आपण करूं शकूं ?

( ३ ) कताई–विणकाम ह्या मूलोद्योगावर जो आपण विशेष भर देत आहांत, त्यावरून असें वाटतें कीं. आपण मध्ययुगाकडेच चाललों आहोंत ! जग अधिक यांत्रिक होत आहे; तर आपण यंत्रापासून दूर जाऊं पाहात आहोंत !

( ४ ) स्वावलंबी शाळा व्हाव्यात, असा जो आपला विचार आहे त्यावरून अशीहि एक शंका उत्पन्न होऊं लागते कीं, सध्यांच्या घोकंपट्टीच्या शाळांच्या ठिकाणीं 'कामाची हमाली' शिकविणाऱ्याच शाळा नाहीं का निर्माण होणार ?– मग अशा शिक्षणाला अर्थच काय ?

( ५ ) तर उद्योगालाच ३/४ वेळ दिला जावा असें मत असेल, तर बौद्धिक शिक्षणाला वाव कोठें आहे ?

( ६ ) मुलांनीं उत्पन्न केलेल्या मालाची विल्हेवाट कशी लावतां येईल ?

( ७ ) मुलांच्या उत्पादनाचा, त्या त्या धंद्यावर कांहीं परिणाम होणार नाहीं का ?

( ८ ) हें शिक्षण साक्षरतेला मारक ठरणार नाहीं काय ? वरील प्रमाणें गांधीजींपुढें मांडलेल्या प्रमुख शंका होत्या. आजहि कित्येकांना त्या आहेत. या दृष्टीनें, गांधीजींनीं वरील शंकांना दिलेलीं उत्तरें संकलित स्वरूपांत पुढील प्रमाणें वाचकांपुढें मांडतां येण्यासारखीं आहेत––

दारू व शिक्षण यांचा जोडण्यांत येणारा संबंधच अनुचित असा आहे. लोकांना असें कां वाटतें कीं, दारूबंदी केल्यास शिक्षण देतांच येणें शक्य नाहीं ? हिंदुस्थान सारख्या गरीब देशालाहि असलेल्या करापेक्षां अधिक कर देतां येणें शक्य आहे, असें अर्थशास्त्रज्ञांनीं दाखवून दिलेलेंच आहे. देशांत

जे कांहीं पुंजीपति आहेत, त्यांच्या पुंजीवर योग्यप्रमाणांत अधिक कर बसविणें शक्य आहे. ठराविक उत्पन्नापेक्षां जास्त ज्यांचें उत्पन्न असेल, त्यांच्यावर जादा कर अवश्य बसविला पाहिजे. इंग्लंडसारख्या देशांत अशा उत्पन्नावर शें. ७० कर वसूल केला जातो; मग तो आपल्या देशांतहि कां वसूल केला जाऊं नये; हा एक मार्ग. दुसरा, जें शिक्षण आपण सुरू करणार तें उद्योगामार्फत आहे, तेव्हां थोडाबहुत खर्च त्यांतून निघेलच निघेल. करितां दारूबंदी ही शिक्षणाच्या खर्चाच्या सबबीवर रद्द केली जाणार नाहीं. ती तर शिक्षणापेक्षांहि आवश्यक गोष्ट आहे.

शाळा, स्वावलंबी शाळा बनविणें हा उद्देश आहेच आहे; पण या बाबतींत प्रारंभिक अवस्थेंत याची अपेक्षा करतां येणार नाहीं. मात्र या बाबतींत शिक्षकानें विशेष काळजी घेऊन मुलांना श्रमाचें महत्त्व व थोरवी समजावून दिली पाहिजे. शरीरश्रम व बुद्धि-विकास हीं अभिन्न आहेत, हें त्यांच्या लक्षांत आणून दिलें पाहिजे. आपल्या शिक्षणाकरितां होणारा खर्च आपण काम करून उत्पन्न केल्यास ती एक मोठी देशसेवा आहे, हें त्यांच्या मनावर बिंबवायला पाहिजे. अर्थात् मुलांमध्यें राष्ट्रीयवृत्ति निर्माण करण्याच्या हेतूनेंच हे हस्तव्यवसाय शिकविले पाहिजेत. उत्पन्नापेक्षां बुद्धीच्या विकासाकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे. जो हस्तव्यवसाय शिकविला जाईल तो यंत्रवत असतां कामा नये. बुद्धिपुरस्कर जर हे व्यवसाय शिकविले जातील तर ७ ते १४ वयाच्या मुलांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणानें त्यांचा शारीरिक व मानसिक विकास होईलच आणि अशा शाळाहि अवश्य स्वावलंबी बनूं शकतील.

कताई—विणकामाच्या उद्योगानें आपण मध्ययुगाकडे चाललों आहोंत; अशा तऱ्हेचा समज करून घेणें हें देशाच्या व जगाच्या चालू परिस्थितीला न ओळखतां, सकृतदर्शनी जें दिसतें त्यावरून बांधलेल्या कयासासारखें आहे.

हिंदुस्थान हा खेड्यांचा देश आहे. या खेड्यांच्या उन्नतीवरच देशाची उन्नति अवलंबून आहे. अशा खेड्यांतील जनतेच्या जीवनापासून आपण राष्ट्रोन्नतीच्या कार्यास सुरवात केली पाहिजे. अर्थात त्यांच्या जवळ सध्यां जी साधन सामुग्री आहे, त्यांचे जे उपजीविकेचे व्यवसाय आहेत, त्यांच्या

ज्या आवडी निवडी आहेत व त्यांच्या ज्या चालीरीति आहेत त्यांचाच आधार घेऊन आपणांस कोणतेंहि कार्य हातीं घ्यावें लागेल. त्यांच्या जीवनांत एकदम उलटापालट करून आमचें कार्य सुकर होणार नाहीं. त्यांना अपरिचित वाटणाऱ्या गोष्टी त्यांच्या पुढें एकदम मांडतां येणार नाहींत. तसें जर करूं तर आपला उद्देश केव्हांहि सफल होऊं शकणार नाहीं. अशा करण्यानें, त्यांच्या वेडगळ का होईनात, भावनांना आपण डिवचल्या सारखें होईल. भावना दुखाविल्या गेल्या कीं, मनुष्याला बऱ्या वाईटाचा तारतम्य भाव आकलन करतां येत नाहीं. म्हणून, सूज्ञ माणसें जशीं अज्ञान बालकांच्या कलानें घेऊन आपलें कार्य साधीत असतात, त्याच मार्गांचा अवलंब आपणांस येथें करायला पाहिजे.

खेड्यांतील जनतेचें जीवन शेती, कताई–विणकाम, सुतारकाम, लोहारकाम व मोलमजुरी यावर चाललेलें असते. या पैकीं शेती ही सर्वांच्याच वाट्याला आलेली नसते. खेड्यांतील कांहीं ठराविकच लोक शेतजमिनींचे मालक असतात. त्यांच्या शेतावर मोल मजुरी करून उपजीविका चालविणारा एक मोठा समाज प्रत्येक खेड्यांत असतो. लोहार, सुतार यांचींहि कामें शेती व घरें या पुरतीं मर्यादित असतात. या उद्योगांत बऱ्याच लोकांना सतत काम मिळूं शकत नाहीं. शिवाय कमी वयाच्या मुलांना, वृद्धांना व अशक्तांना शेतीचीं, सुतारकीचीं व लोहारकीचीं सर्वच कामें करतां येऊं शकत नाहींत. नैसर्गिक अनुकूलते–प्रतिकूलतेवर शेतीचें भवितव्य अवलंबून असतें. यामुळें शेती हा धंदा सर्वांनाच सोयीचा व सदासर्वकाळ किफायतशीर ठरूं शकत नाहीं. या दृष्टीनें पाहातां कताईचा उद्योग गोरगरिबांना, लहानांना, तरुणांना, वृद्धांना त्याच प्रमाणें शारीरिक अशक्तता असणाऱ्या स्त्री–पुरुषांना करतां येण्या सारखा आहे. यांतील उत्पन्न कोणत्याहि परिस्थितींत थोड्या बहुत प्रमाणांत का होईना, सतत मिळण्याची शक्यता असते. कमींत कमी साहित्यानें व खर्चानें हा व्यवसाय सुरू करतां येतो.

या कारणांशिवाय आणखीहि अनेक कारणांनीं हा व्यवसाय मनुष्याच्या सर्वांगीण प्रगतीला अनुकूल आहे. याची बैठक संपूर्ण अहिंसक

आहे. दिवसें दिवस मनुष्याचें जीवन अधिक यांत्रिक होत चाललेलें आहे. यंत्राचा गुलाम, मनुष्य बनत चालला आहे. आणि जोंपर्यंत तो तसा राहील, तोंपर्यंत जगांतील विषमता व अशांति नष्ट होणार नाहीं. एक दुसऱ्यावर यंत्रानें वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करील व हीच वर्चस्वाची वृत्ति अनेक युद्धांस जन्म देईल. जोंपर्यंत व्यक्ति हा राष्ट्राचा घटक मानून, जग चालणार नाहीं तोंपर्यंत जगांतील शोषण प्रवृत्तीस आळा बसणार नाहीं. उत्पादन व्यक्तिप्रधान झालें पाहिजे, राष्ट्र ग्रामप्रधान बनलें पाहिजे तरच समाजांतील हिंसक प्रवृत्ति कमी होईल. खादीचा व्यवसाय व्यक्तिप्रधान आहे. यामुळें प्रत्येकास परिश्रमाची जाणीव होईल. अन्नाची गरज जशी महत्त्वाची, तशीच वस्त्राची. कताईमुळें स्वावलंबन वाढेल. या स्वावलंबनानें सहकार्याची वाढ होईल. एकानें काबाडकष्ट करावेत व दुसऱ्यानें ऐतखाऊ बनावें, या प्रवृत्तीमुळेंच विषमता वाढते; ती कमी होईल व सहकार्य वाढेल. समभावना निर्माण होईल. राष्ट्रांत एकोप्याची भावना वृद्धींगत होऊन देश बलवान बनेल.

इतिहासाची पुनरावृत्ति होत असते. प्राचीन कालांत जी गोष्ट उपयोगी पडली तीच गोष्ट अर्वाचीन कालांतहि उपयुक्त ठरूं शकते. तेव्हां अमूक गोष्ट आपण स्वीकारली तर प्राचीन युगाकडे जाण्यासारखें होईल असें म्हणणें योग्य होणार नाहीं. कोणत्याहि कालांत का एकादी गोष्ट उदयास आलेली असेना, तिचा वर्तमान कालांत जर उपयोग होऊं शकत असेल व ती गोष्ट देशाच्या वर्तमान स्थितीला पोषक ठरत असेल, तर तिचा अवश्य अवलंब केला पाहिजे. जें भुतकालांत गेलें तें निकामी ठरलें, असें थोडेंच आहे!

इतर देश यंत्राच्या आहारीं पडत आहेत, इतर देशांत अमुक अमुक चाललें आहे म्हणून आपल्याहि देशानें तोच मार्ग स्वीकारावा, हें तर्कट वस्तुस्थितीचा विपर्यास करणारें आहे. आज यंत्र यंत्र करून ओरडणारे देशहि यंत्राचा प्रताप ओळखून त्यापासून परावृत्त होऊं पाहात आहेत. त्यांना त्या यांत्रिकजीवनांत आपला नाश दिसूं लागला आहे व अशा ह्या जीवनांतून

मुक्त होण्यासाठीं ते आजुबाजूच्या देशांकडे अगदीं काकुळतीच्या दृष्टीनें पहात आहेत. अशांत अशा त्यांच्या जीवनाला आतां शांततेची गरज भासूं लागली आहे. ते हिंदुस्थानकडे याच शांततेच्या धूरिणत्वाची याचना करीत आहेत. हिंदुस्थान आपल्या शांततेच्या, अहिंसेच्या व विश्वबंधुत्वाच्या तत्त्वावर अचल आहे. अर्थात् या धोरणास पोषक असेंच शिक्षण प्रत्येक हिंदी नागरिकाला मिळणें इष्ट आहे. याच वृत्तीनें भारत जगाचें नेतृत्व करूं शकणार आहे.

शाळा स्वावलंबी व्हाव्यात हा अंतिम हेतु आहेच; परंतु त्याची अपेक्षा आरंभींचा कांहीं काळ पावेतों केली जाणार नाहीं. शिवाय प्राथमिक शाळांतील पहिल्या कांहीं इयत्तांमधूनहि त्याची अपेक्षा करतां येणार नाहीं. जर आरंभींच अशी अपेक्षा केली गेली तर ' हमाली ' चा दोष निर्माण होण्याची बरीच शक्यता आहे. आणि अशी परिस्थिति जर निर्माण झाली तर येथें योजनेचा आत्माच मारला गेल्यासारखें होईल. तेव्हां अशा तऱ्हेचा दोष पद्धतींत निर्माण होणार नाहीं या बाबतींत योग्य अधिकाऱ्यांनीं व विशेषतः शिक्षकांनीं सावध राहिलें पाहिजे. जो शिक्षक अशा खालच्या वर्गांत केवळ उत्पादनाकडेच लक्ष देऊन काम करील तो शिक्षक म्हणून काम करण्यास अपात्रच ठरेल. या योजनेचें मर्म जाणणारा शिक्षक उत्पादन वाढविण्याचा असा आडदांडपणाचा प्रयत्न करणार नाहीं. तो नेहमीं चिंतनशील राहील. ज्या कोमल बालकांकडून त्याला काम करून घ्यावयाचें आहे, त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे त्याचें लक्ष राहील. मुलांच्या इंद्रियांचा समतोल विकास होत आहे कीं नाहीं याकडे त्याचें सूक्ष्म लक्ष राहून नंतरच तो इतर गोष्टींकडे आपली नजर वळवील. उत्पादनाच्या विकासापेक्षां मुलांचा व्यक्तिगत विकास पाहाणें हेंच त्याचें आद्य कर्तव्य असेल. अर्थात् अशा शिक्षकाच्या हातून मुलांना निष्ठूर अशीं हमालीचीं कामें दिलीं जाणार नाहींत व करूनहि घेतलीं जाणार नाहींत.

वरील अर्थाची हमाली मुलांना नकोच आहे; परंतु त्यांना कष्टाची संवय लहान वयापासून लावायची हें धोरण आहेच. वयोमानानुसार शरीर-

श्रम करण्याची संवय मुलांना झाल्यास त्यांच्या भावी आयुष्यांत तिचा चांगला उपयोग होईल. आज जी कष्ट न करतां जगूं इच्छिण्याची मनोवृत्ति लोकांत आढळून येत आहे व जी परिणामीं दुःखास कारण होत आहे, ती अशा भावी पिढींत आढळून येणार नाहीं. आज जी श्रमाची किंमत लोकांना कळूं शकत नाहीं त्याचें कारण श्रमाचा अनुभव नसणें, हेंच आहे. यासाठीं मुलांच्या मनांत श्रमाची आवड निर्माण करण्याकरितांच त्यांना श्रमाचें काम दिलें जाईल. या संवयीमुळें त्यांच्या अंगीं श्रमाचें सातत्य निर्माण होऊन तीं आपल्या भावी आयुष्यांत कोणत्याहि परिस्थितींत जगूं शकतील. दिवसाचे आठ तास तरी सतत श्रम करण्याची पात्रता त्यांच्या ठिकाणीं यावी हाहि हेतु या श्रमाचीं कामें करून घेण्याच्या मागें आहेच. तेव्हां कामाची हमालीच निर्माण न होतां, यांतून मुलांच्या अंगीं कष्ट करण्याची पात्रता निर्माण होईल.

हात आणि मेंदु यांचा अगदीं घनिष्ट संबंध आहे. हात हे मेंदूचे प्रेरक आहेत. हात हें ज्ञान स्थिर करण्याचें इंद्रिय आहे. हातानेंच बुद्धि आणि भावना जागृत करतां येतात. अर्थात् ज्याचे हात जागृत-कार्यक्षम असतील त्याची बुद्धि कार्यक्षम व जागृत असेल. जर मेंदु किंवा बुद्धि आणि हात यांचा इतका घनिष्ट संबंध आहे, तर मग हात बंद ठेवून बुद्धीची कशी काय उन्नति साधतां येईल ? कसा काय तिचा विकास करतां येईल ? अर्थात् हात व बुद्धि यांच्या सहकार्यानेंच जें कांहीं शिकायचें तें मुलानें शिकणें हिताचें आहे. म्हणजे मूल हें कृति–रूप बनलें पाहिजे. जें कांहीं शिकायचें तें कृतींतून त्यानें शिकलें पाहिजे; मग कृति आणि बुद्धि यांचें शिक्षण वेगवेगळें कसें काय देतां येणें शक्य आहे ? आणि याच तत्त्वाचा सूक्ष्मतेनें बेसिक शिक्षणाच्या वेळापत्रकांत अवलंब केलेला आहे. काम करीत करीत शिक्षण, अनुभव घेत घेत शिक्षण प्राप्त करावयाचें असल्यामुळें, जरी केवळ बौद्धिक विषयांच्या नांवानें ठेवलेला वेळ कमी वाटत असला तरी तो कमी नाहीं. आणि हा वेळ अशाच विषयांकरितां ठेवलेला आहे कीं जे विषय मूलोद्योगांतून, सामाजिक, नैसर्गिक व इतर परिस्थितींतूनहि शिकवले जाऊं शकणार नाहींत. बाकीचे विषय हे त्या ३/४ कामाच्या वेळांतच शिकवावयाचे आहेत. यावरून हें

स्पष्ट होतें कीं, बौद्धिक ज्ञानाकरितां राखून ठेवलेला वेळ मुळींच कमी नाहीं. केवळ पुस्तकी ज्ञानावर जगणारा ऐदी व ऐतखाऊ समाज यापुढें निर्माण होता कामा नये. आतां ज्ञानाची मिरासदारी समाजांतील एकाच घटकाच्या नशिबांत राहाणें योग्य नाहीं. या दृष्टीनें विचार करतां असें आढळून येतें कीं, 'या योजनेंत बौद्धिक ज्ञानास स्थान नाहीं' अशी ओरड करणारा, ठराविकच बुद्धिजीवि व बराच काळ काबाड कष्टास पारखा झालेला, समाज आहे. बुद्धि आणि कष्ट यांची युति झाल्यासच जीवनांत खराखुरा आनंद निर्माण करतां येईल.

काम करींत असतांनाच बौद्धिक ज्ञान मुलें प्राप्त करीत राहातील. आतां आपण गणित शिकूं या किंवा भूगोल शिकूं या असें सांगावें लागणार नाहीं. पाट्या काढा व उदाहरण घ्या, असें सांगण्याची गरज भासणार नाहीं, मुलें काम करीत असतांनाच ज्या अडचणी निर्माण होतील त्यांतून पार पडण्याचा प्रयत्न करतील. मग त्यांना कधीं पाटीची आवश्यकता भासेल, तर कधीं पुस्तकाची. अशा रीतीनें या योजनेंत हात व बुद्धि यांचें कार्य परस्पर सहकार्यानेंच चालेल. हात व बुद्धि यांच्या सहकार्यानें प्राप्त केलेलें ज्ञान, मुलाला त्याच्या भावी आयुष्यांत खात्रीनें हात देईल.

ज्ञानाची गंगा वाहवायची झाल्यास चार दोन कोटी रुपयांकडे पाहातां येणार नाहीं. प्राथमिक अवस्थेंतील शिक्षणाकरितां अधिक खर्च हा येणारच; आणि अधिक खर्च करूनहि आम्हांला तितक्या उत्पादनाची अपेक्षा करतां येणार नाहीं. या प्राथमिक अवस्थेंत प्रयोग आणि संशोधनाचेंच कार्य अधिक प्रमाणांत होणार असल्यामुळें उत्पादन अधिक व चांगलें होणें शक्य नाहीं. मुलांच्या हातून तयार करून घेतलेलें काम किंवा माल चांगल्या प्रतीचा असूं शकणार नाहीं. बाजारांत त्याला महत्त्व किंवा किंमतहि प्राप्त होणार नाहीं. अशा वेळीं मात्र विद्यार्थी व शिक्षक निरुत्साही होणें शक्य आहे. आणि हीच वेळ मूलोद्योग शिक्षणांत आणीबाणीची ठरूं शकेल. या आणीबाणीच्या परिस्थितींतून योजनेला, विद्यार्थ्यांना व शिक्षकांना उद्धरण्याची सर्वस्वी जबाबदारी सरकारची व पर्यायानें साऱ्या जनतेची आहे व ती त्यांनीं ओळखून त्याप्रमाणें आपलें कर्तव्य करणें आवश्यक आहे.

एक तर सरकारनें अशा तऱ्हेनें सर्व उत्पादन आपल्या ताब्यांत घेतलें पाहिजे किंवा आपल्याच मुलांनीं तयार केलेला हा माल आहे, तो कसा का असेना, आपलें कर्तव्य समजून जनतेनें खरेदी केला पाहिजे. अर्थात् या कर्तव्य भावनेंत नुकसान पदरीं पडणार हें तर ठरलेलेंच; पण आपल्या मुलांनीं तयार केलेला हा माल आहे, या ममत्त्वाच्या भावनेनें तें नुकसान, नुकसान असें वाटणार नाहीं. स्वकष्टाची मीठभाकरहि गोड लागते, तसाच अनुभव, सदर मालाची खरेदी करतांना हितकरू व राष्ट्रीय बाण्याच्या कोणत्याहि पालकाला, आल्या शिवाय राहाणार नाहीं. मुलांचे लाड आईबाप पुरवीत असतात. त्यापायीं कितीतरी पैसा खर्च होत असतो. मग असे आईबाप आपल्या लाडक्यांनीं स्वकृतीनें तयार केलेल्या वेड्यावांकड्या साहित्याच्या खरेदीच्या वेळीं का मागें सरतील?

समजा अशा प्रकारें सर्वच माल जनतेकडून खरेदी केली गेला नाहीं आणि नेहमींच तशी शक्यता असणार नाहीं—तरी निरुत्साही होण्याचें कारण नाहीं. अशा वेळीं तो सर्व माल कर्तव्य समजून सरकार खरेदी करील. अर्थात् सदर मालाची विल्हेवाट सरकार आवश्यक व उचित अशाच मार्गांनीं लावील. या ठिकाणीं फायद्याची दृष्टि न राखतां सरकार आर्थिक दृष्टीनें अधिक त्यागाची दृष्टि बाळगील.

मुलांनीं अशा उत्पादनांत भर टाकली तर त्याचा इतर जे धंदेवाईक लोक त्या धंद्यांत राबताहेत, त्यांच्या उत्पन्नावर परिणाम नाहीं का होणार, हा प्रश्न वास्तविक अगदीं उथळ आहे. कारण कोणत्याहि धंद्यास आव्हान देणें हा हेतूच येथें नाहीं. स्पर्धा किंवा चढाओढ करावयाची नसल्यामुळें परस्परास घातुक ठरेल अशा तऱ्हेचें उत्पादनच व्हावयाचें नाहीं. या ठिकाणीं मुलांचें उत्पादन हें त्या त्या धंद्यातील धंदेवाईकांच्या उत्पादनाला पूरक असेंच राहाणार आहे. कोणत्याहि धंद्याला धोका तेव्हां निर्माण होतो कीं ज्यावेळीं त्याला उत्पादनाच्या उच्च पातळीवरून स्पर्धा करणारा प्रतिस्पर्धी उत्पन्न होतो. येथें यापैकीं कोणतीच गोष्ट होणारी नाहीं. म्हणून जातिवंत व पिढीजात धंदा करणाऱ्यांच्या धंद्यावर अनिष्ट असा परिणाम होणेंच शक्य नाहीं.

मूलोद्योगांतून शिक्षण द्यावयाचें असल्यामुळें साक्षरतेचा प्रश्न लौकर सुटणार नाहीं, असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे; पण या ठिकाणीं असें म्हणावें लागतें कीं, देशाची वस्तुस्थिति अशा लोकांनीं जाणून घेतलेली नसावी. सात लाख खेड्यांचा हा देश. बहुसंख्य जनता खेड्यांतच रहाणारी. खेड्यांतील शेती बागायत, सुतारी, लोहारी, कताई-विणकामादि धंद्यांशीं त्यांचें जीवन निगडीत झालेलें. अशा ग्रामीण जनतेंतच साक्षरतेचा प्रसार करावयाचा आहे. शहरांत साक्षरतेची मोहिम ज्या मार्गांनीं यशस्वी होऊं शकेल तेच मार्ग अशा खेड्यांत साक्षरतेचा प्रसार करण्यास उपयुक्त ठरणार नाहींत. त्यांच्या करितां ज्या मार्गाचा अवलंब करावा लागेल, तो मार्ग त्यांच्या जीवनाशीं कांहीं तरी संबंध असणाराच असला पाहिजे, तरच शिक्षणाकडे त्यांचें लक्ष वेधलें जाईल; त्यांना आवड वाटेल. ज्या वस्तु त्यांच्या जीवनाशीं संबंधित आहेत त्यांचीं चित्रें काढण्याऐवजीं किंवा त्यांचें वर्णन करूं शकण्यापूर्वी, त्यांना त्या वस्तूंचा उपयोग करण्यास प्रथम शिकविणें स्वाभाविक होईल. जगांतील इतर वस्तूंप्रमाणेंच तीं मुलें अक्षरें व शब्द यांचे आकार प्रकार ओळखूं शकतील. वस्तु ओळखीच्या झाल्या कीं त्यांचीं नांवें स्मरणांत राहातील. त्यांचा उपयोग लक्षांत राहील. तो उपयोग त्यांना भाषेंतून प्रगट करतां येईल. बोलणें, वाचणें व लिहिणें या क्रमानें मुलें ज्ञान प्राप्त करूं शकतील. यापेक्षां साक्षरतेच्या प्रचाराचें अधिक स्वाभाविक व प्रभावी साधन कोणतें होऊं शकेल !

अशा प्रकारें जुलई १९३७ पासून हरिजन मधून जी शैक्षणिक चर्चा सुरू झाली व ज्या चर्चेंतून अनेक प्रश्नांचा ऊहापोह झाला, त्या चर्चेला मूर्त स्वरूप प्राप्त होण्याचा योग, त्याच सालच्या २२,२३ आक्टोबरला आला.

वर्धा येथील नवभारत विद्यालयाच्या रजत जयंती उत्सवाच्या प्रसंगीं म. गांधींच्या अध्यक्षतेखालीं अखिल भारतीय शिक्षण परिषद बोलावण्यांत आली. निरनिराळ्या प्रांतांतून प्रांतिक शिक्षणमंत्री व ध्येयनिष्ठ राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते यांना आमंत्रित केलें होतें. जवळ जवळ ९० राष्ट्रीय

शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांनीं त्यांत भाग घेतला होता. गांधीजींनीं आपली शिक्षणाची कल्पना अगदीं विस्तृतपणें सर्वांपुढें मांडली. ती मांडतांना पुढील कांहीं गोष्टींचा प्रामुख्यानें त्यांनीं उल्लेख केला.

( १ ) चालू शिक्षण पद्धति हिंदुस्थानसारख्या खेडीं-प्रधान देशाला उपयुक्त नाहीं.

( २ ) शिक्षणासारखें पवित्र कार्य मादक पदार्थांच्या उत्पन्नावर अवलंबून असावें, हें अगदीं गैर आहे.

( ३ ) हें शिक्षण विद्यार्थ्यांच्या नैसर्गिक विकासाला पोषक नाहीं.

( ३ ) शिक्षणाचें जें अंतिम ध्येय-यशस्वी रीतीनें जीवन जगतां येणें-साध्य होत नाहीं.

( ५ ) या शिक्षणानें परावलंबी वृत्ति निर्माण होते. कष्ट करण्याची कुवत कमी होते. कष्टाची आवड राहात नाहीं.

( ६ ) 'इंद्रियांमार्फत शिक्षण' हेंच खरें शिक्षण आहे व म्हणून तें कृतिप्रधान असलें पाहिजे.

( ७ ) नुसती कृति हेंच शिक्षण होऊं शकणार नाहीं, तर उत्पादनशील अशा कृतिद्वारा-मूलोद्योगाद्वारा शिक्षण दिलें पाहिजे.

( ८ ) स्वावलंबन हेंच या शिक्षणाचें अंतिम ध्येय असलें पाहिजे.

अशा प्रकारचें मूलोद्योगावर आधारलेलें शिक्षण जर आपण यशस्वी करूं शकलों तर अनेक सामाजिक व राष्ट्रीय गुंतागुंतीचे प्रश्न सुटूं शकतील. ही योजना जरी नवीन व अगदीं अपरिचित अशी वाटत असली, तरी तिचा आत्मा प्राचीनच आहे. या योजनेंत जीं दोषस्थळें वाटत आहेत तीं शिक्षक, अधिकारी वर्ग व जनता यांच्या सहकार्यानें दूर करतां येतील. या योजनेंत अंगचुकार माणसें उपयोगाचीं नाहींत. कर्तृत्वशाली राष्ट्रीय वृत्तीचे शिक्षक व अधिकारी वर्ग पाहिजे.

आपल्या भाषणाच्या शेवटीं त्यांनीं पुढील महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख केला —

( १ ) जगांतील साम्राज्यवाद जर नष्ट करावयाचा असेल तर हीच योजना रामबाण ठरेल, असा माझा विश्वास आहे.

( २ ) अहिंसेच्या पायावर या योजनेची उभारणी असल्यामुळें समाजांतील, राष्ट्रांतील संघर्ष टळतील.

( ३ ) राष्ट्राची आर्थिकस्थिति खालावलेली आहे म्हणूनच ही योजना आपण स्वीकारावयाची आहे, असें नाहीं; तर राष्ट्राची आर्थिक स्थिति कितीहि उंचावली तरी हें शिक्षण अगदीं आवश्यक असेंच आहे.

( ४ ) आम्हांला शहरांची संख्या वाढवावयाची नसून खेड्यांची पुनर्रचना करावयाची आहे.

( ५ ) प्राचीन भारतीय संस्कृति. सभ्यता व गौरव यांचें रक्षण करावयाचें आहे. आणि तें याच योजनेनें होऊं शकेल.

या योजनेच्या अमल बजावणीकरितां कुशल शिक्षकांची अत्यंत आवश्यकता आहे. त्याच प्रमाणें क्रमिक पुस्तकांचीहि अडचण आहेच. या संबंधीं गांधीजींनीं पुढील विचार मांडले होते—'शिक्षक हा जन्मावाच लागतो! असे जातिवंत शिक्षकच या योजनेची अमल बजावणी कुशलतेनें करूं शकतील; पण असे शिक्षक कितीसे सांपडतील? तेव्हां जे आपल्यापुढें आहेत, त्यांच्या कडूनच काम करून घ्यायला पाहिजे. त्यांना शक्य तितक्या लौकर याचें शिक्षण देऊन तयार केलें पाहिजे. अयोग्य ठरल्यास, अशा शिक्षकांना सदर पेशांतून मुक्त केलें पाहिजे. क्रमिक पुस्तकांच्या बाबतींत वाटणारी भीति अस्थानी आहे. याकरितां अभ्यासक्रम एकदम बदलला गेला पाहिजे. प्रारंभीं थोडा गोंधळ माजल्यासारखा वाटेल, पण याच गोधळांतून क्रमिक पुस्तकें व उपयुक्त शिक्षक निर्माण होतील. अभ्यासक्रम हळू हळू बदलण्यांत कालाचा जो अपव्यय होईल, त्यापेक्षां कमी कालांत एकदम बदललेला अभ्यासक्रम सुरळीतपणें सुरू होऊं शकेल. जर एका गोष्टीचा आपण विचारपूर्वक निर्णय घेतलेला आहे, तर मग तिच्या अमल बजावणीस विलंब कां लावावा?–ती तावडतोबच अमलांत आणली पाहिजे.'

या परिषदेच्या शेवटीं कांहीं टीकांचीं उत्तरें देतांना महात्माजींनीं सांगितलें,–"या योजनेचा स्वीकार करतांना कांहीं विद्वानांच्या मनांत ज्या

कांहीं शंका उत्पन्न होत आहेत, त्यांचीं कारणें मी जाणतों; परंतु आपण असे कांहीं जादुगार नाहींत कीं, क्षणांत कांहीं चमत्कार करूं शकूं. मात्र या योजनेची सार्वत्रिक अमल बजावणी करण्यापूर्वी ठराविक क्षेत्रांत ही राबवून पाहिली पाहिजे व जो अनुभव येईल त्या प्रमाणें योग्यती दुरुस्ती करून घेतली पाहिजे. मला आत्मविश्वास आहे कीं, या प्रयोगांतीं जी गोष्ट आपल्या निदर्शनास येईल ती या योजनेस पोषकच असेल; कारण जी गोष्ट मी आपणांपुढें मांडली आहे ती व्यवहारिक आदर्शाच्या दृष्टीकोनांतून मांडली आहे. म्हणून मला तरी या योजनेच्या यशस्वितेबद्दल तिळमात्र शंका वाटत नाहीं."

या नंतर या परिषदेनें अभ्यासक्रम निश्चित करण्या करितां पुढील लोकांची कमिटी नेमली—

डॉ. जाकिर हुसेन—अध्यक्ष. श्री. आर्यनायकम् संयोजक. इतर सभासद—ख्वाजा गुलाम सैयद्दिन, प्रा. के. टी. शहा, विनोबा भावे, काकासाहेब कालेलकर, किशोरीलाल मश्रुवाला, जे. सी. कुमाराप्पा, श्रीकृष्णदास जाजू, आणि श्रीमती आशादेवी.

या कमिटीनें सात वर्षांत पुरा होऊं शकणारा अभ्यासक्रम आंखला. तो आंखतांना पुढील मूलोद्योग, शिक्षणाचे माध्यम म्हणून स्वीकारले—

(१) कताई—विणकाम
(२) सुतारी
(३) शेती
(४) बागकाम
(५) कातड्याचें काम
(६) दुसरा कोणताहि व्यवसाय जो भौगोलिक, व स्थानिक परिस्थितीला अनुकूल असेल.

ज्या ठिकाणीं कताई—विणकाम किंवा शेतीकाम खेरीज करून दुसरा कोणताहि मूलोद्योग सुरू केलेला असेल, तेथेंहि कताई—विणकाम व शेती कामाची सामान्य माहिती विद्यार्थ्यांना मिळण्याची तजवीज केली गेली पाहिजे. मातृभाषा, गणित, समाज—शास्त्र, सामान्यविज्ञान, चित्रकला,

संगीत आणि राष्ट्रभाषा हे शिक्षणाचे प्रमुख विभाग मानण्यांत आले व या विषयांचें शिक्षण मूलोद्योगांशीं समन्वय साधून द्यावयाचें असें ठरलें. या सर्व विषयांत मातृभाषा व राष्ट्रभाषा यांचें स्थान अधिक महत्त्वाचें मानण्यांत आलें.

योजना आखतांच तिची अमल् बजावणी करणें शक्य नव्हतें व तें योग्यहि होऊं शकलें नसतें. कोणतीहि नवीन गोष्ट सर्वसाधारण स्वरूपांत तिला राबवायची असेल तर प्रथम ती ठराविक क्षेत्रांत राबवून प्रथम पाहाणेंच इष्ट असतें व त्या दृष्टीनेंच वरील परिषदेनें वर्धा येथें 'हिंदुस्तानी तालिमी संघाची' स्थापना एप्रिल १९३९ सालांत केली. या संघामार्फत मूलोद्योग शिक्षणाचें प्रत्यक्ष कार्य सुरू करण्यांत आलें. बिहार, मुंबई, ओरिसा प्रांतांतूनहि मूलोद्योग शिक्षण समित्या स्थापन करण्यांत आल्या. खास अधिकाऱ्यांच्या नेमणुकाहि करण्यांत अल्या. सरकारी, राष्ट्रीय अशा सर्व संस्थांमधून प्रयोगाचें, शिक्षक तयार करण्याचें कार्य सुरू झालें. पहिलीं दोन वर्षें उत्तम तऱ्हेनें प्रगति झाली. १९४० सालीं एक नवीनच शिक्षण योजना पुढें आली. फक्त मुंबई आणि बिहार प्रांतांतच प्रयोगाकरितां या योजनेच्या शाळा सुरू ठेवण्यांत आल्या. शेवटीं डी. पी. आय् च्या रिपोर्टा-नुसार सरकारनें १९४१ फेब्रुवारींत सदर प्रकारच्या शाळा व कॉलेजें बंद करण्याचा निर्णय घेतला. या नंतरची स्थिति मात्र चमत्कारिकच होती; तरी पण राष्ट्रीयवृत्तीच्या संस्थांनीं आपलें काम चालूच ठेवलें होतें. त्यांत ओरिसा मधील 'उत्कल-मौलिक-शिक्षा-परिषद्' व दिल्ली प्रांतांतील '**जामियामिलिया इस्लामिया**' ह्या प्रमुख संस्था होत्या. मूलोद्योग शिक्षणाचें दुसरें अधिवेशन जामियानगर, दिल्ली, येथें झालें. त्या नंतर १९४४ सालीं वर्धा येथें अधिवेशन भरलें व त्या अधिवेशनांत प्रांता प्रांतांतील अनुभवांवर विस्तृत चर्चा झाल्या. याच अधिवेशनांत संपूर्ण शिक्षण योजनेची रूपरेषा निश्चित करण्यांत आली. प्राथमिक अभ्यासक्रमांतील अडचणी सुधारण्यांत आल्या. शिक्षणक्रमानुसार पुस्तकें प्रकाशित केलीं जावीं यावर अधिक भर देण्यांत आला.

उच्च शिक्षणाच्या बाबतींत पुढील गोष्टी निश्चित मानण्यांत आल्या उच्च शिक्षण हें व्यवसाय प्रधानच असलें पाहिजे. त्यांत सध्यां असलेलें

साहित्याचें व नुसतें बौद्धिक विषयांचें प्रस्थ कमी करण्यांत यावें. शारीरिक, बौद्धिक शिक्षणाची सांगड घालण्यांत यावी व दोघांचेंहि महत्त्व समान मानण्यांत यावें. कामामुळें बौद्धिक विकास व साहित्यिक ज्ञान यांत कोणत्याहि प्रकारचा अडथळा तर येतच नाहीं, उलट कामामुळें त्यांचें महत्त्वच वाढतें. विद्यार्थ्यांना जें काम द्यावयाचें तें त्यांच्या आवडीनिवडी प्रमाणें दिलें पाहिजे. त्या कामांत त्यांनीं प्राविण्य संपादन करायला पाहिजे व तें त्या उद्योगाद्वारा आपला जीवन निर्वाह करूं शकले पाहिजेत.

उद्योग सामान्यतःपुढील प्रकारचे असावेत—

( १ ) शेती–गोपालन ( २ ) चिकित्सा ( ३ ) इंजिनियरिंग ( ४ ) व्यापार ( ५ ) निरनिराळ्या कला ( ६ ) इलेक्ट्रिक व्यवसाय ( ७ ) शिक्षण व्यवसाय ( ८ ) संपादकाचा व्यवसाय ( ९ ) छपाईचें काम ( १० ) नृत्य–संगीत ( ११ ) गृहशास्त्र ( १२ ) धातुकाम व ( १३ ) इतर उद्योग धंदे.

वरील धंदे शिकवितांना इतर सर्व बौद्धिक विषयांचें आवश्यकतेनुसार शिक्षण दिलें जावें.

बौद्धिक विषय पुढील प्रमाणें असावेत—

( १ ) मातृभाषा ( २ ) गणित ( ३ ) सामान्य विज्ञान ( ४ ) इतिहास ( ५ ) भूगोल ( ६ ) यंत्र–शास्त्र ( ७ ) अर्थ–शास्त्र ( ८ ) चित्रकला ( ९ ) समाज शास्त्र ( १० ) शिक्षण–शास्त्र ( ११ ) जमाखर्च ( १२ ) स्थापत्यशास्त्र ( १३ ) डॉक्टरी शिक्षण ( १४ ) गृहशास्त्र ( १५ ) शारीरिक शिक्षण ( १६ ) संगित, इत्यादि–

या शिक्षणानें उदात्त भावनांनीं विकसित मनुष्य तयार होईल. तो केवळ धंदेवाईकच बनणार नाहीं. त्याची दृष्टि संकुचित नसेल तो उदार प्रकृतीचा बनून अधिक राष्ट्रीय वृत्तीचा असेल. या शिक्षणानें शिकून तयार झालेला डॉक्टर खेड्यांत जाऊन गरिबांची सेवा करण्यांस नाक मुरडणार नाहीं, तर कर्तव्य समजून तो खेड्यांत प्रवेश करील.

वरील प्रमाणें नव शिक्षणाची–स्वाश्रयी शिक्षणाची आंखणी केलेली आहे. या योजनेला यशस्वी करण्याकरितां कुशल, कार्यतत्पर, ध्येयवादी व श्रद्धावान शिक्षकांची आवश्यकता आहे. अधिकारी, शिक्षक व जनता

यांच्या संपूर्ण सहकार्यावर या योजनेचें यशापयश अवलंबून आहे. योजना तशी नवीन नसली तरी बरीचशी अपरिचितच आहे. माणसाला सहज सुलभजीवन हवें असतें; कष्ट नको असतात. थोडक्या श्रमांत अधिक फळ मिळावें अशी अपेक्षा असते. आणि कांहींच न करतां हातपाय न हलवतां जर कांहीं आयतेंच हातीं आलें तर दुधांत साखरच! अशी आमची मनोवृत्ति! या मनोवृत्तीपासून आपणांस परावृत्त व्हायचें आहे. ही गुलामी मनोवृत्ति नष्ट करावयाची आहे. आम्हांला कष्टाचे महत्त्व जाणून घ्यायचें आहे. आमची कार्यक्षमता वाढवायची आहे. अशी कार्यक्षम माणसेंच देशाच्या उपयोगी पडतील, देशास सुस्थिति प्राप्त करून देतील. संकटकाळीं हींच माणसें देशास वांचवतील.

म. गांधींनीं हें मर्म जाणलें. देशाची नाडीपरीक्षा ती हीच त्यांनीं केली व मूलोद्योग शिक्षणाची अमृतवल्ली आमच्या हातीं दिली. आपण तिचा सदुपयोग करून घेऊं या. आपण तरूं या, देशास तारूं या व बुडत्या जगास उद्धरण्यासाठीं कमरा कसूं या. ज्या महात्म्यानें आपल्या जीवाचें रान केलें, त्याच्या श्रमाचें चीज करूं या. यानेंच आपण त्यांचें चिरस्मारक उभारूं शकूं.

---

२

# सामुदायिक जीवन

## —प्रार्थना—

या अफाट विश्वांतील चराचर सृष्टीकडे आपण सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां आपणांस आढळून येतें कीं ग्रह नक्षत्रांचे उदयास्त, ऋतूंचें आगमन व इतर सृष्ट घडामोडी ह्या गोष्टी बव्हंशीं सुसूत्रित चाललेल्या आहेत, एका गोष्टीच्या अनुरोधानें दुसरी गोष्ट घडत आहे; एक गोष्ट दुसरीची पूरक आहे. या वरून विचारवंतांच्या मनांत एक प्रकारचें कुतुहल निर्माण होतें. ते या सृष्टव्यापारासंबंधीं विचार करूं लागतात. खूप खूप विचार करूनहि त्यांना याचा उलगडा होत नाहीं कीं, हें जगाचें रहाटगाडगें नियमित रूपानें चालतें तरी कसें? जेथें कांहीं घडतें आहे तेथें कोणी तरी घडविणारा असलाच पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा होते; पण घडविणरा त्यांना कोठें दिसत नाहीं! तेव्हां पुन्हां मनामध्यें संशय निर्माण होतो व या संशयसागरांत त्यांचें विचारी मन हेलकावे खाऊं लागतें. बुद्धि निर्णय देऊं शकत नाहीं. त्या विचारी व जिज्ञासु अशा माणसाची मति गुंग होते व तो एकदम अनादि अनंत! असे शब्द उच्चारून जातो. घडविणारा, संचालक त्याला दिसूं शकत नाहीं परंतु कोणी तरी या विश्वाचा संचालक असलाच पाहिजे अशी त्याची पक्की समजूत होते व त्या संचालकास निराकार, निर्विकार असें तो पुकारतो!

विश्वाचा अफाट पसारा पाहून तो जसा आश्चर्यचकित होतो, तसाच या विश्वाच्या अज्ञात संचालकाच्या अफाट सामर्थ्याबद्दल त्याला आदर [illegible] लागतो. त्याचें कल्पनेनें स्वरूप चितारून जो त्या अदृश्य शक्तीची उपा[illegible] करूं लागतो त्याला लोक आस्तिक म्हणतात. हा आस्तिक माणूस आ[illegible] आवडीप्रमाणें त्या शक्तीचीं कृत्रिम रूपें निर्माण करतो व त्यांची आर[illegible] करूं लागतो. हिंदुधर्मांत जीं त्या शक्तीचीं रूपें मूर्तींच्या स्वरूपांत आप[illegible] आढळतात, तीं या आस्तिक्य वादाचींच चिन्हें आहेत.

जसा जगांत आस्तिक्यवाद निर्माण झाला तसा नास्तिक्यवादहि निर्माण झाला. नास्तिक्यवादी विश्वसंचालकास देव, ईश्वर, परमात्मा मानीत नाहींत. ते ती एक शक्ति आहे, शक्तीला स्वरूप असूं शकत नाहीं, असें मानतात. या ठिकाणीं आपणांस येवढेंच म्हणतां येईल कीं, प्रत्येकाची बाजू त्या प्रत्येकाच्या दृष्टीकोनांतून सत्यच आहे. मग कोणी 'शक्ति' म्हणोत कीं कोणी 'ईश्वर' म्हणोत.

जगांत आपणापेक्षां जें मोठें, श्रेष्ठ व प्रभावी असतें त्यापुढें आपण नकळतच नम्र होत असतों! तो आपला प्रकृति धर्म आहे. या नम्र होण्यांत कमीपणा वाटत नाहीं कीं कमीपणा दाखविण्याकरितां आपण नम्र होत नाहीं; तर मनांत त्याप्रतिश्रद्धा निर्माण होत असल्यामुळेंच आपण नम्र होत असतों. लीनता, नम्रता हा भ्याडपणा नव्हे, तर तें माणूसकीचें लक्षण आहे,

जो श्रेष्ठ आहे, जो उपकारी आहे, ज्याच्यावर आपलें जीवन अवलंबून आहे अशा व्यक्तीबद्दल आपल्या मनांत आपुलकी, आदर व भक्तिभाव निर्माण होतो. या भक्तिभावांतून त्या व्यक्तीबद्दल आपल्या मनांत सेवाभाव निर्माण होतो. सेवा अनेक प्रकारें करतां येते. तिचें गुणगान करणें ही सेवेची पहिली पायरी असते. यालाच स्तुति म्हणतात. या स्तुतिस्तोत्रा नंतर त्या श्रेष्ठ व्यक्तिकडून आपण कांहीं अपेक्षाहि करीत असतों—तिनें आपलें संरक्षण करावें, आपल्या मनोकामना पुऱ्या कराव्यात. ह्या आपल्या अपेक्षा म्हणजे याचना असतात; मागण्या असतात. म्हणजेच ती आपली प्रार्थना असते. प्रार्थना म्हणजे आपल्या आशेचें—आकांक्षेचें प्रतीक असतें. आपल्या आकांक्षा—इच्छा सामान्य माणूस काय पुऱ्या करकरणार, म्हणून आपण सर्वश्रेष्ठ अशा जगन्नियंत्याकडेच प्रार्थना सादर करतों. 'आशा करावी परमेश्वराची'! अशी आमची या प्रार्थनेमागील श्रद्धा असते. आणि प्रार्थना ही बाब श्रद्धेचीच आहे. श्रद्धेनेंच हिंदूंनीं त्या एका विश्वसंचालकाचीं तेहत्तीस कोटी रूपें निर्माण केलीं! या तेहत्तीस कोटिमध्यें त्यांची गणती केली गेली कीं, ज्यांच्यांत परोपकाराची थोडीशी वृत्ति भरलेली आहे, सूर्यदेव, चंद्रदेव व नागदेव; वृक्ष देवता व पृथ्वीदेवता अशा अनेक देव—देवता हिंदूंनीं निर्माण केल्या.

मूर्तिपूजक हिंदुधर्म आस्तिक्य विचार सरणीचा. मुसलमान आस्तिकच परंतु साकारतेस न मानणारे. एकूण काय, कोणी त्या परमशक्तीस मूर्तिस्वरूपांत भजणारे तर कोणी अदृश्य अशा शक्तीच्या स्वरूपाची उपासना करणारे. हिंदूंनीं उपासनेकरितां मंदिरें स्थापन केलीं. मुसलमानांनीं मशिदी बनविल्या तर ख्रिश्चनांनीं चर्चें प्रस्थापित केलीं. कोणी शुक्रवार, कोणी शनिवार तर कोणी रविवार आपापल्या प्रार्थनेकरितां निश्चित केला.

या प्रार्थना दिनांच्या दिवशीं एक मोठा समाज एकत्र जमूं शकतो. अशा एकत्र जमल्यानें ओळखी देखी होतात. परस्परांचे स्वभावधर्म कळूं शकतात. यामुळें नवनवीन मित्र मंडळी लाभते. प्रेमाची, सहकार्याची व मिळून मिसळून वागण्याची संवय आपणांस लागते. त्या क्षणापुरती तरी एका मोठ्या कुटुंबाची आठवण आम्हांस होऊं शकते. कुटुंब पद्धति राष्ट्रसंघटनेस पोषक आहे. ज्या राष्ट्राचा मोठ्यांत मोठा समाज एकत्र नांदूं शकेल त्या राष्ट्राची सर्वतोपरी उन्नति होण्यास शतार्व्दींची आवश्यकता नाहीं. एकाकाळीं आपला भारत याच गोष्टीमुळें जगाच्या आघाडीवर होता.

आज आपली कौटुंबिक घडी थोडी विस्कळित झाली आहे. पूर्व संस्कृतीस धोका निर्माण झाला आहे. जीवनाला संस्कृतीच्या पालनाची आवश्यकता असते. त्या शिवाय जीवनाला दिशा मिळूं शकत नाहीं. अनेक मार्गांनीं जीवन प्रवाह वाहूं लागल्यास त्याची दुर्दशा होईल. म्हणून संस्कृतीचें मार्गदर्शन आवश्यक आहे. प्रार्थना हें एक भारतीय संस्कृतीचें अंग आहे. तें आपणांस पुष्ट केलें पाहिजे. मलीनता आली असल्यास तिला उजाळा दिला पाहिजे. संस्कृति संस्कृति म्हणून ओरडत बसण्यानें संस्कृतीचें पोषण होणार नाहीं. प्रत्यक्ष कृतीनेंच ती टिकूं शकेल व पुष्ट होऊं शकेल.

नव–शिक्षण प्राचीन संस्कृतीच्या उदयाची आशा करते आहे. प्राचीन संस्कृति टिकविण्याचें व्रत त्यानें स्वीकारलें आहे. या दृष्टीनें त्याला समाजाच्या जीवनांत हस्तक्षेप करावयाचा आहे. म्हणूनच राष्ट्राच्या उद्‌गम स्थानाला त्यानें हात घातला आहे. नव्या युगाच्या नवपिढीला त्या प्राचीन संस्कृतीचें मधु–घुटके पाजावयाचें ठरविलें आहे. या दृष्टीनें शाळा कॉलेजांमधून या

प्रार्थनेचें—सामुदायिक प्रार्थनेचें फार महत्त्व आहे. प्राचीन संस्कृतीचें दर्शन त्यांना घडावें, आवड उत्पन्न व्हावी व त्यांचा स्वदेशाभिमान वृद्धीस लागावा हा थोर हेतु यांत आहे.

प्रार्थना म्हटली म्हणजे फक्त त्या अदृश्य अशा सर्वश्रेष्ठ शक्तीचीच, अशी पूर्वी समजूत होती व ती कालानुसार ठीकहि असू शकेल; पण आतां काळ बदललेला आहे. कालाच्या परिवर्तनाप्रमाणें जीवनमूल्येंहि बदलत असतात व त्यांचें बदलणें आवश्यकहि असतें. आतां 'देशाला देव माना' ही मनोवृत्ति निर्माण झाली आहे-होत आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, त्या विश्व-संचालकाबद्दल लोकांच्या मनांत अनादर निर्माण झाला आहे. आपण त्याला जनार्दन, दीनबंधु, दीनानाथ वगैरे नांवांनीं संबोधतों. याचा अर्थच आम्हांला असें सांगतो कीं, तो कांहीं आपणांपासून दूर नाहीं कीं अदृश्यहि नाहीं! आपणांपुढें जो मानव समाज दिसतो आहे, तोच त्याच्या स्वरूपाचें प्रतीक आहे. मग आपण प्रथम त्या अदृश्याच्या प्रतिकाचेंच स्मरण करावयास हवें. त्याचें स्मरण म्हणजेच त्या विराटशक्तीचें स्मरण होय. जनतेची सेवा हीच जनार्दनाची सेवा होय. दीनाची सेवा हीच दीनबंधूची, दीनानाथाची सेवा होय. म्हणून शेवटीं जनता हाच जनार्दन व देश हाच देव ठरतो! आपण याच जनार्दनाची प्रथम सेवा करायला पाहिजे!

या दृष्टीनें शाळा कॉलेजांतील प्रार्थना राष्ट्रीय-प्रार्थनाच प्रामुख्यानें असल्या पाहिजेत. या नंतरचेंच स्थान धार्मिक प्रार्थनांना असू शकेल. सामु-दायिक प्रार्थनेंत धार्मिक प्रार्थनेस स्थान नाहीं. व्यक्तीला मात्र प्रार्थना स्वातंत्र्य आहे. धार्मिक प्रार्थनेच्या वेळीं, मग ती कोणत्याहि धर्माची का असेना, त्या वेळेपुरतें, त्याच समाजापुरतें स्वातंत्र्य आहेच. अशा वेळीं अन्य धर्मियांकडून त्यांत व्यत्यय आणला जाता कामा नये, त्यांच्या हक्कांवर अतिक्रमण करतां कामा नये. म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मनांत परधर्म सहिष्णुता निर्माण झाली पाहिजे, त्या प्रमाणें त्याचें वर्तनहि घडलें पाहिजे.

ज्यावेळीं आमच्या नवीपढींत या परस्परांच्या मूलभूत हक्कांची जाणीव निर्माण होईल, त्याच वेळीं अनेक धर्मांचे, जातीचे व वर्णांचे लोक एकत्र गुण्यागोविंदानें नांदू शकतील; त्याचवेळीं अनेक धर्मियांचें आश्रयस्थान बनलेलें हें आमचें राष्ट्र प्रगतिपथावर येईल, एक आदर्श राष्ट्र म्हणून जगांत चमकेल. भारत याच उदात्त ध्येयाची पूजा करूं पाहात आहे. या पूजेकरितां पुजारी निर्माण करावयाचें काम शाळा कॉलेजांचें आहे.

या सामुदायिक प्रार्थनेंत ऐक्य भावना निर्माण होतेच त्याबरोबर व्यक्तीच्या विकासास आवश्यक असलेली विशुद्ध मनोवृत्ति निर्माण होते. प्रार्थनेनें अंतरात्मा विश्वात्म्याशीं तादात्म्य पावतो. त्या विराट आत्म्याची शक्ति या अंतरात्म्यास प्राप्त होते. व व्यक्तीचें आत्मबल वाढतें. आत्मबल हें सर्वश्रेष्ठ बल आहे. राष्ट्रपिता याच बलाची आपणांपासून प्रथम अपेक्षा करीत होता. याच आत्मबलाच्या जोरावर त्यांनीं अतर्क्य अशीं कामें यशस्वी रीतीनें पार पाडलीं. आत्मिकबलांतूनच 'आंतलाआवाज' निघू शकतो. तेव्हां गांधींच्या दृष्टीनें प्रार्थनेचें जें महत्त्व होतें व त्यांनीं आपल्या जीवनांत प्रार्थनेला जें महत्त्वाचें स्थान दिलें होतें त्याचें रहस्य कळून येतें.

आत्म्याचें शुद्धीकरण हा प्रार्थनेचा सूक्ष्म हेतु. रात्रंदिवसाच्या बऱ्या-वाईट कृत्यांचा, सभोंवतालच्या परिस्थितीचा चंचल मनावर परिणाम झाल्या-शिवाय राहात नाहीं. मनाची चंचलता हा कोणत्याहि कार्यांतील मोठ्यांत मोठा प्रारंभिक अडथळा असतो. म्हणून कोणत्याहि कार्याचा आरंभ करण्यापूर्वी मनःस्थिरता प्राप्त करून घेतली पाहिजे. मनाची स्थिरता ही शारीरिक शक्तीच्या बचतीची पहिली पायरी आहे. मनाची मजबूती ही शरिराची मजबूती आहे. म्हणून भोजनापूर्वी, कोणतेहि कार्य हातीं घेण्यापूर्वी व विश्रांति घेण्यापूर्वी आपण प्रार्थनेच्या द्वारा मनाची स्थिरता–एकाग्रता निर्माण करून घेतली पाहिजे. पाठांत ज्या प्रमाणें विषय प्रवेशावर त्याच्या पुढील यशाची कल्पना येऊन जाते, तद्वतच प्रार्थनेच्या यशस्वीतेवर त्याच्या पुढील अंगिकृत कार्याची यशस्वीता वा अयशस्वीता यरीचशी अवलंबून असते.

शाळा कॉलेजांतील प्रार्थना केवळ विद्यार्थ्यांकरितांच नसतात ! या शाळेशीं किंवा कॉलेजाशीं ज्यांचा ज्यांचा म्हणून संबंध येतो, त्या प्रत्येकानें त्यांत भाग घेतला पाहिजे; तें प्रत्येकाचें आद्य कर्तव्य आहे. ज्या बालमनास नकळत संस्कृतीचे घुटके पाजावयाचे आहेत, ते नुसत्या हुकूमशाहीनें पाजतां येणार नाहींत. ते शिक्षकांच्या अनुकरणानें त्यांनीं स्वतः प्यावयाचे आहेत. म्हणून प्रथम सामुदायिक प्रार्थनेचें महत्त्व शिक्षकांच्या कृतींतून मुलांच्या मनावर बिंबलें पाहिजे.

नव शिक्षणांत प्रार्थनेचा इतका उदात्त हेतु सांठवलेला आहे. शाळेतील आजचीं बालकें उद्यांचे नागरिक आहेत, समाज वृक्षाचीं तीं पाळें-मुळें आहेत. समाज सुसंस्कृत बनवायचा असेल तर त्याच्या या चिमुकल्या आधारस्तंभांना योग्य असें शिक्षण मिळालें पाहिजे.

---

# ३

# सफाई

सफाईचा अर्थ स्वच्छता असा आहे. शब्दाचा अर्थ अगदीं सुगम असाच आहे; परंतु त्या सुगमतेंतच दुर्गमता लपलेली आहे! सफाईची व्यापकता आत्म्याच्या व्यापकते इतकी थोर आहे. येवढेंच नव्हे, तर सफाई हें ईश्वराचें स्वरूप आहे! ईश्वरापेक्षां जगांत जसा दुसरा कोणी श्रेष्ठ नाहीं, तसें सफाईपेक्षांहि दुसरें कांहींच श्रेष्ठ नाहीं.

सुदृढ शरिरांत सुदृढ आत्मा असतोच असें जसें म्हणतां येणार नाहीं तसें स्वच्छ शरिरांत स्वच्छ मन असतेंच असें म्हणतां येणार नाहीं. तरीपण शरिराची बाह्य व अंतरस्वच्छता परस्परावलंबी आहेत. कांहीं लोक बाह्य स्वच्छतेकडे जास्त लक्ष पुरवतात; तर कांहीं म्हणतात, आधीं मनःशुद्धि करा! मग सामान्य माणसाला पेंच पडतो कीं, यांतील कोणती गोष्ट आपण प्रथम केली पाहिजे? या बाबतींत आपण जरा अधिक सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर आपणांस कळून येईल कीं, बाह्य स्वच्छतेशिवाय अंतरस्वच्छता टिकावूं होणार नाहीं. घामट कपडे घालून कोणाला कधीं मनःशांति प्राप्त झाली आहे? दुर्गंधी सुटलेली असतांना कोणी चित्ताची स्थिरता राखूं शकलेला आहे? तेव्हां स्वच्छता म्हटली म्हणजे ती अंतरबाह्य अशीच असली पाहिजे. दोन्हींच्या परस्पर एकतेवरच सर्वांगीण स्वच्छता निर्माण होऊं शकते—अव लंबून असते. गांधीजी अंतरस्वच्छतेबद्दल म्हणतात—'जो मनुष्य बाह्य वस्तूंचा अंतरंगाशीं संबंध जोडून संपूर्ण बाह्यशुद्धि करतो त्याच्या अंतराची शुद्धि आपोआपच होते; परंतु जो अंतरशुद्धि करण्याच्याच मागें प्रथम लागतो त्याला दोन्हीहि असाध्य अशाच राहातात.' म्हणून प्रत्येकानें प्रथम बाह्य स्वच्छतेकडे लक्ष दिलें पाहिजे.

स्वच्छता प्रत्येक प्राणी—मात्रास आवडते. पशु घ्या, पक्षी घ्या कीं कीटक घ्या, प्रत्येक आपापल्या शरीर स्वच्छतेची काळजी घेत असलेला आपणांस आढळतो. घाणेरडा वाटणारा कावळ्यासारखा पक्षीहि नदीकांठीं

किंवा तळ्याकाठीं जाऊन आपलें अंग स्वच्छ करीत असलेला आढळतो. वास्तविक मनुष्याखेरीज इतर पशु–पक्ष्यांना स्वच्छता राखण्याची इतकीशी काळजी घ्यायला नको. कारण त्यांचें शरीर नैसर्गिक रीतीनेंच स्वच्छ राहात असतें. पक्ष्यांना दांत नसणें, पंख तुळतुळीत–तेलकट असणें व त्यांची आवश्यकतेनुसार हालचाल करतां येणें या गोष्टी निसर्गानेंच त्यांना प्राप्त करून देऊन शरीरस्वच्छतेचें त्यांचें काम हलकें केलें आहे. माणसानें चार आठ दिवस दांत घासले नाहींत तर त्याचे किती भयंकर परिणाम त्याला भोगावे लागतील याचा भरंवसा नाहीं. सर्व प्राण्यांमध्यें अतिशय घाणेरडा जर कोणता प्राणी असेल तर तो मनुष्य ! पण इतर प्राण्यांत व त्याच्यांत जो नैसर्गिक फरक आहे तो बुद्धीचा. माणसास इतर प्राण्यांपेक्षां बुद्धीचें भांडवल अधिक लाभलेलें आहे. या बुद्धीच्या जोरावरच तो इतर प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ ठरूं शकला आहे.

स्वच्छता आपल्या जीवनांत किती दृढमूल झालेली आहे, हें रोज नियमित आंघोळ करणें, कोणाचें उच्छिष्ट न खाणें, ज्या पात्रांतून एक माणूस पाणी प्याला असेल, तें पात्र धुतल्याखेरीज दुसऱ्यानें त्यांतून पाणी न पिणें, शौचविधीनंतरची स्वच्छता करणें या गोष्टी जीवनाचें अभेद्य अंग होऊन बसल्या आहेत. ही आमची सफाइ-संस्कृतीच बनलेली आहे.

स्वच्छता ही संस्कृतीचे जर अंग आहे, तर त्याचें शास्त्र शिकत बसण्याची काय आवश्यकता ? वास्तविक तशी आवश्यकता नाहींच; परंतु वर्तमान जीवन जर अपण बारकाईनें पाहिलें तर अशा कित्येक गोष्टी आपल्या लक्षांत येतील कीं ज्या सफाई—संस्कृतींत बसूं शकणार नाहींत. आणि म्हणूनच आपणांस सफाई संबंधींच्या पूर्वापार चालत आलेल्या व आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी संकलित करून त्यानुसार वागण्याचा प्रयत्न करावयास पाहिजे; नव्या शास्त्रयुगाची झाक देऊन इष्ट ते बदल त्यांत करून घेतले पाहिजेत.

जशी व्यक्तिगत स्वच्छता महत्त्वाची समजून प्रत्येकानें स्वच्छ राहिलें पाहिजे, तसें सामुदायिक रीत्याहि स्वच्छता राखण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. गांवांतील सांडपाण्याची व्यवस्था, कचऱ्याची व्यवस्था, शौचकूप

इत्यादिची व्यवस्था सामुदायिक रीतीनें व्हायला पाहिजे. कांहीं गांवांत पाण्याची एकच विहीर असते. पिण्याकारितां, धुण्याकारितां व इतर वापाराकरितां याच विहिरीच्या पाण्याचा उपयोग केला जातो. अशा विहिरींच्या आसमंतांत अतिशय घाण, चिखल आढळून येतो. प्रत्येक इसम 'किती घाण झाली आहे'! म्हणून नाक मुरडतो; पण ती घाण काढून टाकूं या म्हणून समुदायानें कांहीं करूं इच्छित नाहीं. प्रत्येकानें जर 'मलाच काय करायचें आहे'! असें म्हटलें तर ती विहीर स्वच्छ राहाणें शक्य नाहीं आणि याच कारणानें अनेक रोग निर्माण होऊन सबंध गांवचें आरोग्य धोक्यांत येतें.

शौचाचीहि तीच तऱ्हा खेड्यांत आढळून येतें. सामुदायिक शौचकूप कांहीं ठिकाणीं बांधलेले असतात. प्रत्येक जण विधि उरकून कसा तरी बाहेर पडतो! आपलें काम झालें म्हणजे मग मागच्यांचें कांहीं होवो इतकी बेदरकार वृत्ति दिसून येते. याचें एकच कारण म्हणजे सामुदायिकरीत्या पाळावयाच्या जबाबदारीचें ज्ञान त्याला नसतें.

आपल्या घरांतील कचरा घरासमोरच्या उकीरड्यावर फेंकून द्यायचा, ही तर खोडच होऊन बसलेली दिसते. असे उकिरडे म्हणजे रोगांचे माहेर घरच. चार पावलांच्या अंतरावर जर दुर्गंधी निर्माण झाली तर तिचा उपसर्ग होणार नाहीं काय! शेजारीं रोगानें ठाणें मांडलें तर आपणांस त्याची झळ पोंचणार नाहीं काय? तेव्हां खेड्यांतील जनतेस या सामान्य गोष्टींचें ज्ञान होणें इष्ट आहे.

मलेरिया, नारू, कॉलरा, देवी इत्यादि रोगापासून बचाव करावयाचा असेल तर सामुदायिक स्वच्छतेची फार आवश्यकता आहे.

शहरांतहि अशा कित्येक गोष्टी अगदीं लाजिरवाण्या आढळतात. पान खावून थुंकणें, विड्या-सिगारेटचीं थोटुकें वाटेल तेथें फेंकणें, फळें खाऊन साली आजुबाजूला फेंकून देणें. कांहीं शहरांत नगर पालिकांनीं कचऱ्याच्या पेट्या, थुंकण्याच्या पेट्या रस्त्याच्या कडेला ठेवण्याची व्यवस्था केलेली असते; परंतु स्वच्छतेचें महत्त्व ज्यांच्या मनावर बिंबलेलें नाहीं असे सुशिक्षितहि त्यांचा उपयोग करीत नाहींत! मग अडाणी माणसाची गोष्टच कशाला!

म्हणून सफाईचे पाठ हे लहान वयांतच मुलांना दिले गेले पाहिजेत; पण जसे नीतिपाठ देऊन कांहीं नीति सुधारूं शकत नाहीं, तसे स्वच्छतेचे तोंडी पाठ देऊन कांहीं सुधारणा घडवून आणतां येणार नाहीं. मुलांनीं जें पुढील आयुष्यांत करावें असें आपणांस वाटतें, तें त्यांच्या हातून प्रत्यक्ष करून घेतलें गेलें पाहिजे; त्यांची संवय त्यांना जडली पाहिजे. या दृष्टीनें लहान वयांत मुलांना व्यक्तिगत स्वच्छता राखण्याचें प्रात्यक्षिक मिळालें पाहिजे. त्यानंतर आपलें घर, अंगण, शाळा, आपला वर्ग, खेळाचें मैदान इत्यादि सामुदायिक स्वच्छता राखण्याची ठिकाणें यांचें महत्त्व कळलें पाहिजे. लहान वयांत जर स्वच्छतेचे असे पाठ मिळाले तर मुलांना स्वच्छतेची आवड आपोआप निर्माण होईल. घाण पाहतांच त्यांची स्वच्छतेची संवय जागी होईल व ती घाण दूर करीपर्यंत त्यांच्या मनाला स्वस्थता लाभणार नाहीं. जशी वाईट गोष्टीची चीड माणसाला आली पाहिजे तशी अस्वच्छतेचीहि चीड आली पाहिजे!

नव्या अभ्यासक्रमांत याच दृष्टीनें सफाईचें महत्त्व फार आहे. सफाई हें शास्त्र या दृष्टीनें मुलांना शिकवायला पाहिजे. या सफाईतून भूगोल, इतिहास, समाजशास्त्र, रसायनशास्त्र व सामान्य-विज्ञान यांचें ज्ञान देतां येईल. सामुदायिक स्वच्छतेच्या वेळीं शेजारधर्म, सामुदायिक आरोग्य, आजुबाजूची जमीन व तिचे गुणधर्म समजावून देतां येतील. आदर्श घरें, सार्वजनिक विहिरी, संडास यांचे नमुने तयार करून घेतां येतील व त्यांच्या कल्पकतेस वाव मिळेल. या दृष्टीनें पाहातां आपणांस सफाईतून अनेक बौद्धिक विषय शिकवितां येतात; मुलांच्या मनावर ते बिंबतात.

स्वच्छतेच्या बाबतींत अभ्यासक्रमाची एक विशिष्ट अपेक्षा आहे, ती म्हणजे मानसिकशक्ति निर्माण करण्याची. समाजांत आजची विषमता, जो उच्च-नीच भाव आढळून येतो व जी राष्ट्राच्या प्रगतीस खीळ घालते, ती वृत्ति, बव्हंशीं या सफाई-प्रकरणांतून निर्माण झालेली आहे! अभ्यासक्रमाचा कटाक्ष या मनोवृत्तींत बदल घडवून आणण्याकडे आहे. शरिराला जशी भोजनाची, विश्रांतीची नितांत आवश्यकता असते तशीच किंबहुना

त्या पेक्षांहि अधिक आवश्यकता साफसफाईची आहे, ही गोष्ट मुलांच्या मनावर बिंबली पाहिजे. गुरुजी सांगतात म्हणून किंवा शाळेचे नियम पाळायचे म्हणून जर शाळा कॉलेजांमधून स्वच्छता पाळली-राखली जात असेल तर अभ्यासक्रमाचा हेतु अशानें साध्य होणार नाहीं. स्वच्छता राखणें हें जीवनांतील आद्य कर्तव्य आहे व तें आपण कर्तव्य बुद्धीनें पार पाडलें पाहिजे याची जाणीव ज्यावेळीं शिक्षकांना व विद्यार्थ्यांना होईल, त्याच वेळीं अभ्यासक्रमांतलि 'सफाई–विभागा' चें महत्त्व त्यांना कळलें आहे असें ठरेल.

या ठिकाणीं आणखीहि एक अति महत्त्वाची गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. गांधीप्रणीत या योजनेंत शिक्षक हा विद्यार्थ्यांना हुकूम सोडणाराच नाहीं; तो विद्यार्थ्यांबरोबर मित्रत्वानें, बंधु-भावानें वागणारा त्यांच्यापैकींच एक कार्यकुशल सहकारी आहे. ज्यावेळीं शिक्षक व विद्यार्थी मिळून एखादा उकीरडा साफ करूं शकतील, पायखाने, मुतान्या स्वच्छ करूं शकतील त्याच वेळीं परस्परांशीं अगदीं जवळ येऊं शकतील. याच वेळीं विद्यार्थ्यांच्या मनांत शिक्षकाबद्दल आपुलकी, प्रेम व आदराची भावना निर्माण होईल! सफाई इतका दोन माणसांना जवळ आणून एकरूप करणारा दुसरा कोणताहि विषय नाहीं! शाळा कॉलेजांत याच विषयाची उपासना केली गेली पाहिजे.

—:०:—

४

# सण—समारंभ

कोणत्याहि देशाची किंवा राष्ट्राची उन्नतावस्था प्रायः त्याच्या संस्कृतीच्या थोरवीर अवलंबून असते. ज्याची परंपरा उज्ज्वल, ज्याची संस्कृति थोर तो देशहि थोर.

आपल्या हिंदुस्थानला अशीच थोर संस्कृतीची जोड लाभलेली आहे. हिंदुसंस्कृति जगांतील साऱ्या संस्कृतींहून श्रेष्ठ ठरली ती आपल्या गुणांनींच. आशिया खंडांत जगांतील सर्व धर्म उदयास आले. सर्व संस्कृतींचा उगमयाच खंडांत झाला. आर्य संस्कृति ही मूळ संस्कृति व तिचेंच हिंदुसंस्कृति हें प्रतिबिंब आहे.

हिंदुसंस्कृतीचें वैशिष्ट्य हेंच कीं, ती कालानुसार प्रगत होत आलेली आहे. तिनें आपणांतील कांहीं विशेष गुण दुसऱ्या संस्कृतींना दिलेले आहेत व आपणांतहि चांगल्या चांगल्या गुणांचा वारंवार संग्रह केलेला आहे. या संग्राहकवृत्तीमुळें ती आजपर्यंत आरंभीच्या जोमांतच टिकून राहूं शकली आहे. तिनें जें ग्रहण केलें तें पूर्णपणें पचवून एकजीव करून घेतलें आहे. एकंदरींत ती नित्य नूतनच राहिलेली आहे.

या संस्कृतीचा संबंध तसा सर्व संस्कृतींशीं आलाच. परंतु त्यांतल्यांत मुसलमान संस्कृतीशीं व तद्नंतर पाश्चात्य संस्कृतीशीं तिचा अधिक काळ संबंध आला. अर्थात् ज्याप्रमाणें दोन व्यक्तींमध्यें मित्रत्व निर्माण झाल्यानंतर व परस्परांच्या सान्निध्यांत सतत आल्यानंतर जशी विचारांची, आचारांची देवाण घेवाण सुरू होते, तशीच देवाण घेवाण या संस्कृति संस्कृतीमध्यें झाल्याचें सण समारंभ, खाणें-पिणें, राहाणी व पोषाख तुलनात्मक दृष्टीनें पाहिल्यास, आढळून येतें.

सण समारंभांचें अनुकरण अधिक लौकर होतें. सणसमारंभांतच आनंदाचे झरे निर्माण होत असतात. ज्या संस्कृतीमध्यें याचा अभाव असेल

ती संस्कृति लौकर मृतप्राय होऊं लागते. हिंदुसंस्कृतीचीं जीं कांहीं वैशिष्ट्यें आहेत, त्यांत सणसमारंभांची अद्वितीय गुंफण हें एक आहे.

कोणताहि महिना घ्या. सणावारांनीं गजबजलेलाच आपणांला आढळेल. चैत्रांत–गुडी पाडवा, रामनवमी, दोलोत्सव, हनुमानजयंती हे सण येतात. वैशाखांत अक्षय्य तृतीया परशुराम जयंती येते. ज्येष्ठांत–दशहरा, वटपौर्णिमेचा सण येतो. आषाढांत एकादशी येते. चातुर्मास्याचा प्रारंभ होतो. श्रावणांत–नागपंमी, नारळी पौर्णिमा किंवा श्रावणी पौर्णिमा, गोकुळ अष्टमी व पिठोरी अमावास्या हे सण येतात. भाद्रपद विद्यापतिगणरायाच्या आगमनाचा. हरितालिका हें नायकांचें व्रत याच महिन्यांत.

आश्विन महिन्यांत–शारदोत्सव म्हणजेच नवरात्रोत्सव सुरू होतो, दसरा सण मोठा नाहीं आनंदा तोटा ! याच महिन्यांत शुद्ध पंचमीला ललिता पंचमीचा सण साजरा करतात. कोजागिरी पौर्णिमा किंवा नवान्न पौर्णिमा याच महिन्यांत येते. सरस्वती पूजन, धनत्रयोदशी, नरकचतुर्दशी, लक्ष्मीपूजन याच महिन्यांत येतात.

कार्तिक प्रतिपदा किंवा बलिप्रतिपदा. या दिवशीं गाई बैलांची पूजा करतात. भाऊबीजेसारखा अत्यंत आवडता सण याच महिन्यांत येतो. भाऊ बहिणीच्या घरीं भोजनास जातो. आवळी भोजन याच महिन्यांत शु ॥ १० ते १५ पर्यंत करतात. तुळसी विवाह शु ॥ १२ ला होतो त्रिपुरी पौर्णिमा याच महिन्यांत येते.

मार्गशीर्ष महिन्यांत थोरली दिवाळी. हा सण विशेषतः कोंकणांत करतात. चंपाषष्ठी, दत्तजयंती याच महिन्यांत येते. पौषांत–मकर संक्रांत येते. तिळगूळ समारंभ करतात. माघ महिन्यांत–वसंत पंचमीचा उत्सव होतो. जलक्रीडा, वनभोजन वगैरे कार्यक्रम करतात. रथसप्तमी याच महिन्यांत येते. महाशिवरात्रि सारखा उपवासहि याच महिन्यांत येतो. फाल्गुन महिना –होळीचा महिना. कोणी शिमग्याचा महिना असेंहि म्हणतात. हा सण अभद्र मानला जातो.

वरील प्रमाणें हिंदूंच्या सणांचा ढोबळ मानानें आढावा काढतां येईल. यावरून आपणांस स्पष्ट कळून येतें कीं, हिंदुसंस्कृति ही सणसमारंभ प्रधान संस्कृति आहे. सणसमारंभ प्रधान म्हणजेच आनंद प्रधान संस्कृति असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

या सणसमारंभांचा मूळ हेतु मनुष्याच्या जीवनांत आनंद निर्माण करणें हाच आहे. थकल्या भागल्या जीवास विरंगुळयाचें साधन म्हणजे सणच. काबाडकष्ट करावेत व महिन्यांतून एक दोन वेळां असा आनंद भोगावा व फिरून कष्टास नव्या जोमानें सुरवात करवी अशीच या सणांची गुंफण केलेली आपणांस दिसून येईल. सण समारंभ हें मानसिक व शारीरिक विश्रांति मिळविण्याचें साधनच. सण समारंभांत अंग मेहनतीचें काम नसतें असें नाहीं, तर आनंद मिश्रित कष्ट ते असतात! कामांत फक्त बदल असतो. आणि कामांत बदल हीच विश्रांति असते!

सण—समारंभाचा दुसरा हेतु एकत्र जमणें व सामुदायिक जीवनांतील आनंद उपभोगणें हा आहे. या सणामुळें नातलगांकडे, मित्रांकडे, एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जाण्याची संधि मिळते. प्रवास घडतो नेहमींच गृहकृत्यांत गुंतलेल्या स्त्रियांना या निमित्तानें घराबाहेर पडतां येतें. सख्या—मैत्रिणींच्या गांठी—भेटी घेतां येतात. आपलें हृद्गत—मनोगत जें कांहीं असेल तें मनमोकळेपणानें व्यक्त करण्यास, सुखा दुःखाचे व आपलेपणाचे चार शब्द बोलण्यास संधि मिळते.

हिंदुसणांचें दुसरें एक वैशिष्टय असें आहे कीं, स्त्रियांचे असे कांहीं खास सण आहेत. वटसावित्री, नागपंचमी, हरितालिका, ललितापंचमी, आंवळीभोजन, मकरसंक्रांत इत्यादि. या शिवाय मंगळागौरी आहेतच.

जसे स्त्रियांकरितां खास सण, तसे पुरुषांकरितांहि आहेत. त्यांत उल्लेखनीय असा होळीचा सण आहे.

मुलांकरितां स्वतंत्र अशा सणांची गरज त्याकाळीं भासली नसावी कारण लहान मुलें कोणाच्याहि व कोणत्याहि सणांत आपोआपच सामील

होऊं शकतात. गोड गोड खायला, खूप खूप उड्या मारायला व मनसोक्त खेळायला मिळालें कीं, झालें त्यांचें काम! बालमनोवृत्ति हा आमचा सण, तो दुसऱ्याचा, हें जाणतच नसते! जेथें त्यांचें मन रमेल तो त्यांचा सण!

जसे वरील प्रमाणें हिंदूंचे सण आहेत, तसे प्रत्येक अन्यधर्मांतहि सण समारंभ आहेत. मुसलमानांचे ईद, मोहरम हे सण उल्लेखनीय सण आहेत. पारशी लोकांचेहि झोरास्टर दिन, जमशेदी नवरोज इत्यादि प्रमुख सण आहेत. युरोपियनांचे–त्यांच्या वर्षाचा पहिला दिवस, गुडफ्रायडे, ख्रिस्तमस इत्यादि सण आहेत.

यावरून सणांचे महत्त्व प्रत्येक धर्मांत प्रत्येक संस्कृतींत किती आहे हें कळून येतें. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, या सण–समारंभामुळेंच ते ते धर्म व त्या त्या संस्कृति जिवंत राहिलेल्या आहेत!

एक काळ असा होता कीं, लोकांच्या धार्मिक भावना पराकाष्टेच्या संकुचित होत्या. प्रत्येक आपली संस्कृति व आपला धर्मच सर्व श्रेष्ठ समजत असे. परधर्म सहिष्णुता लोकांत इतकीशी नव्हती. याचें कारण म्हणजे आजच्या इतकें जग जवळ आलेलें नव्हतें. परस्परापासून दूर राहिल्यामुळें परस्परांचे गुण–दोष कळणें शक्य नव्हतें व याचमुळें परधर्म–परसंस्कृति सहिष्णुता कमी प्रमाणांत आढळत असे.

सध्यांचें युग नवयुग आहे. नवयुग नवविचार नवआचार व नव संस्कृति घेऊन उदय पावलें आहे. कोणत्याहि धर्मांतील, संस्कृतींतील शाश्वत सत्येंच या युगांत टिकून राहातील. जीं अनावश्यक व कालप्रवाहाच्या विरुद्ध असलेलीं तत्त्वें आहेत तीं आपोआपच लय पावतील.

या दृष्टीनें पाहातां या नवयुगांत राष्ट्रीय धर्मालाच प्राधान्य प्राप्त झालेलें आहे. धर्म म्हणजे परंपरागत चालत आलेल्या रूढी नव्हत. हृदयाची धारणा म्हणजेच धर्म. आणि या धर्मानुसार होणारी वागणूक म्हणजे नवसंस्कृति ही नवसंस्कृति राष्ट्रीय वृत्तीची पोषक आहे. रूढींचीं बांडगुळें या संस्कृतींत पोसलीं जाणार नाहींत. कोणत्याहि धर्माचें चालत आलेलें य कालप्रवाहांत दूषित झालेलें स्वरूपही नवसंस्कृति स्वीकारणार नाहीं. तेव्हां जी संस्कृति कालानु-

सार आपलें स्वरूप बदलूं शकत असेल किंवा जी नवतत्त्वांना आपणांत समाविष्ट करूं शकत असेल, तीच संस्कृति यापुढें आपलें अस्तित्व राखूं शकेल.

हिंदुसंस्कृति या दृष्टीनें प्रगतच आहे. तिचें स्वरूप बव्हंशीं राष्ट्रीयच आहे. सणसमारंभांच्या परिणत नवस्वरूपाचें ती स्वागत करण्यास तयार आहे. प्रत्येक सण-समारंभास राष्ट्रीय स्वरूप देण्याच्या मार्गावर ती आहे. आज तिनें राष्ट्रीय सणांना, राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या-पुण्यतिथ्यांना, आणि अशाच कित्येक राष्ट्रीय स्मृति-दिनांना आपणांत समाविष्ट करून घेतलेलें आहे. बालदिन, आरोग्यदिन यांनाहि प्रामुख्यानें स्थान दिलेलें आहे.

या नवयुगांत सर्व जाति, सर्व धर्म, एकत्र नांदणार असल्यामुळें परधर्म सहिष्णुतेला प्राधान्य आहे. ही परधर्म सहिष्णु वृत्ति शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांत निर्माण व्हायला पाहिजे. अनेक जातींचे अगर धर्मांचे विद्यार्थी असल्यास त्या शाळेंत सर्व धर्मांचे सण साजरे करण्याची त्या त्या धर्मीयांना परवानगी असावी. इतरांनीं स्वेच्छेनें भाग घ्यावा अगर घेऊं नये. मात्र दुसऱ्यांच्या धार्मिक भावना डिवचल्या जातील असें कोणत्याहि प्रकारचें गैर वर्तन होतां उपयोगी नाहीं. या दृष्टीनें अशा शाळांमधून हिंदूंचे, मुसलमानांचे, पारश्यांचे व इतरांचेहि सण-समारंभ आवश्यकता असल्यास साजरे केले जातील. मात्र या धार्मिक सण-समारंभास दुय्यमच स्थान मिळेल. प्रथम राष्ट्रीय सण, समारंभ, जयंत्या व पुण्यतिथ्या यांचेंच स्थान असेल. टिळक पुण्यतिथि, टागोर जयंति, नऊ ऑगष्ट, स्वातंत्र्यदिन, महादेवभाई देसाई पुण्यतिथि, गांधीजयंति, सर्वोदय दिन, राष्ट्रीय सप्ताह किंवा कर्तव्य सप्ताह, सुभाष जयंती वगैरे सण समारंभ व दिन साजरे केले जातील. या सणांद्वारें विद्यार्थी राष्ट्रपुरुषांच्या, हुतात्म्यांच्या, देशसेवकांच्या व स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासाचें ज्ञान मिळवितील. त्यांच्यांत स्वदेशाभिमान निर्माण होईल. त्यांची कर्तव्य बुद्धि जागृत होईल. या थोर पुरुषांप्रमाणें आपणहि स्वदेशाकरितां त्याग, बलिदान केलें पाहिजे या उच्च मनोवृत्तीचा त्यांच्या मनांत विकास होईल. अशा शिक्षणानें राष्ट्राची

सेवकांची उणीव भरून येण्यास मदत होईल. ज्या राष्ट्रांत त्यागी– संन्यासी यांची उज्वल परंपरा निर्माण होते तो देश सदा आघाडीवरच असतो. पण सणसमारंभ केवळ करमणूक किंवा एकत्र येण्यापुरतेच मर्यादित स्वरुपाचे असतां कामा नयेत. यांतून विधायक प्रवृत्ती निर्माण झाली पाहिजे. धार्मिक सण समारंभातून विधायक प्रवृत्ती निर्माण होऊं शकत नाहीं कारण अशा सण समारंभाच्या वेळीं दृष्टीची विशालता राहूं शकत नाहीं. वास्तविक सर्व धर्मांची मूलतत्त्वें एकच आहेत. मात्र तीं निरनिराळया शद्बांत मांडलेली आहेत येवढेंच. सर्व धर्मांचे सार काढल्यास त्यांतून शेवटीं खरा धर्म म्हणजे राष्ट्रीय धर्मच निर्माण होतो. या धर्माचा मानवता हा प्राण असतो.

शाळा कॉलेजांच्या दृष्टीनें सण- समारंभांचें फार महत्त्व आहे. मुलांचा उत्साह कायम ठेवून तो वाढवायचा असल्यास शाळांतून वारंवार उत्सव, सण, समारंभ साजरे होत राहिले पाहिजेत. नुसत्या पुस्तकी ज्ञानानें मेंदूला थकवा येतो, शाळेबद्दल अप्रीति निर्माण होते. सण समारंभांत त्यांना शरीरश्रम व बुद्धिश्रमहि करावे लागत असल्यामुळें त्यांच्यांत असलेले सूप्त गुण प्रकट होतात. स्वप्रदर्शनाची आवड प्रत्येक मुलांत विशेष प्रमाणांत असते. सण समारंभाचे जे कार्यक्रम असतात त्यांच्यामार्फत त्यांना आपल्या अंगच्या वैशिष्टयाचें प्रदर्शन करण्यास संधि मिळते. नुसती, शाबासकी मिळाली किंवा थोडीशी जरी वाहवा झाली, तरी मुलाला अतिशय समाधान वाटते – त्याची कळी खुलते !

सण समारंभ हे अशा प्रकारें आनंदाचे झरेच आहेत. शाळेचें वातावरण आनंदी राखावयाचे असेल तर, शाळेची एकंदर प्रगती व्हावी असें वाटत असेल तर येणारे सण, समारंभ न चुकतां न विसरतां साजरे केले पाहिजेत. जे ज्ञान आपणास संबंध वर्षांतहि देणे शक्य होत नाहीं तें अल्पावधींत मुलांना देण्याचा व त्यांच्या मनावर बिंबविण्याचा हाच एक राजमार्ग आहे. त्याचा आपण अवलंब केलाच पाहिजे.

# सहली

मनुष्य अनुभवानें चतुर बनतो–शहाणा बनतो. अनुभवानें प्राप्त झालेलें ज्ञान खरें ज्ञान असतें. घरांत बसून आजुबाजूला काय चाललें आहे, याचें ज्ञान होणार नाहीं. आपण ज्या गांवांत राहतों त्या गांवची रचना, क्षेत्र त्यांत, असलेलीं वैशिष्टयपूर्ण स्थळें वगैरेंचें ज्ञान प्रत्यक्ष गांवांत फिरून बारकाईनें निरीक्षण केल्यासच होऊं शकतें. कधीं कधीं असें आढळून येतें कीं. पांच पांच, दहा दहा वर्षें एकाद्या गांवांत राहाणाऱ्या माणसास अमुक रस्त्याचें नांव विचारलें असतां सांगतां येत नाहीं. पुस्तकी ज्ञानावरून नुसतें आपण सांगूं शकूं कीं, तेथें असें असें आहे. परंतु त्या ठिकाणीं जाण्याची वेळ आल्यास आपणांस अचूक रीतीनें तें स्थळ शोधून काढतां येत नाहीं. अर्थात अशा तऱ्हेचें सांगीव व ऐकीव ज्ञान व्यवहारांत उपयोगी पडूं शकत नाहीं असाच प्रत्येकाचा अनुभव आहे.

म्हणून जें ज्ञान प्राप्त करावयाचें तें प्रत्यक्ष अनुभवद्वारा करणेंच अधिक योग्य असतें. विशेषतः भौगोलिक व ऐतिहासिक माहिती मिळवितांना जितकें आपण वस्तुस्थितीशीं जवळ जाऊं तितकें फायद्याचें असतें. प्राथमिक शाळेंत खालच्या वर्गांतून आसमंतांतील झाडें, वेली, पशु, पक्षी, ओढे, नाले, टेकड्या व उद्यानें यांची माहिती मिळवावयाची असते. गांवांतील प्रमुख रस्ते, सार्वजनिक विहिरी, धर्मशाळा, वाचनालयें, क्रीडांगणें सरकारी इमारती, पोस्ट ऑफिस, रेल्वे स्टेशन, सार्वजनिक संस्था, प्रार्थना स्थळें यांचीही माहिती त्यांना असावी लागते. अर्थात वरील गोष्टींची माहिती कांहीं वर्गाच्या चार भिंतींच्या आंत बसून देणें शक्य नसतें. आणि यदाकदाचित दिली गेली तरी तिचा ज्ञान या दृष्टीनें कांहींच उपयोग नाहीं. याकरितां मुलांना प्रत्यक्ष त्या त्या स्थळीं नेऊन त्या स्थळांची माहिती करून दिली पाहिजे. कधीं ओढ्याकाठीं, कधीं रेल्वेस्टेशनवर तर कधीं सार्वजनिक उद्यानांत मुलांना फिरायला नेऊन फिरतां फिरतां माहिती दिली पाहिजे. सहलीला जाऊं या, असें सांगण्याऐवजीं आपण सर्व फिरायला जाऊं या,

असें सांगितल्यास मुलांचा उत्साह अधिक वाढलेला आपणांस दिसेल. मात्र फिरायला जाण्याचा आपला हेतु अधिक स्पष्ट असला पाहिजे. मुलांची, फिरायला बाहेर पडण्यापूर्वीच त्या स्थळाबद्दलची जिज्ञासा जागृत केली पाहिजे. मुलें जात्याच जिज्ञासू असतात. हें काय, तें काय, हें असें कां. तें तसें कां असे अनेक प्रश्न विचारून तीं मोठ्या माणसांना भंडावून सोडीत असतात. त्यांच्या ह्या सहज प्रवृत्तीचा योग्य तो फायदा घेऊन व मोठ्या कुशलतेनें त्यांना प्रश्नरुपानेंच ज्ञान प्राप्त करून घेण्याची संधि गुरुजनांनीं दिली पाहिजे.

मुलें ढोबळ मानानें व सहज दिसणाऱ्या सर्व गोष्टींबद्दल चौकशी करतातच; पण त्यांची ही दृष्टी अधिक खोल, सूक्ष्म बनविण्याचें काम गुरुजींनीं करावयाचें असतें. म्हणजे मुलांची निरीक्षणशक्ति वाढवावयाची असते. ज्या प्रमाणांत मूल सूक्ष्म किंवा ढोबळ निरीक्षण करूं शकेल त्या प्रमाणांतच त्याला त्या स्थळाबद्दल अगर वस्तुबद्दल ज्ञान प्राप्त होईल. एखाद्या रस्त्यानें आपण कित्येक वेळां गेलेले असतों परंतु अमुक दुकान त्या रस्त्यावर कोठें आहे, हें नेमकें सांगतां येत नाहीं. हा निरीक्षणाच्या अभावाचा दाखला म्हणून सांगतां येईल. तेव्हां मुलांना, विशेषतः खालच्या वर्गांतल्या, मुलांना भूगोलाचें शिक्षण हें सहलीमार्फतच देणें योग्य असतें. वरील वर्गांनाहि द्यावयाचें शिक्षण हें समकेंद्र शिक्षण असल्यामुळें शक्यतों सहली मार्फतच देणें योग्य आहे. परंतु थोड्या अवधींत बराच भाग पुरा करावयाचा असल्यामुळें प्रत्यक्ष त्या त्या स्थळीं जाऊन माहिती मिळविणें अशक्यच असतें. शिवाय कांहीं स्थानीय अडचणी असतात. अशा वेळा तुलनात्मक दृष्टीनें शिक्षण देणें, नमुने तयार करणें यांचाच आधार घेतला पाहिजे.

या दृष्टीनें या ठिकाणीं असें म्हणतां येईल व तें योग्यच असेल कीं अभ्यासक्रमाची आंखणी, इयत्तेचें मान, मुलांची शारीरिक व मानसिक तयारी व वस्तुस्थिति यांना अनुसरूनच असली पाहिजे. कित्येक वेळां असें आढळून येतें कीं मुलांच्या जीवनाशी कधीच संबंध न येऊं शकणाऱ्या

गोष्टींचें ज्ञान त्यांना मिळवावें लागतें! मग अशावेळीं शिक्षक व विद्यार्थी यांच्या जिवाची जी त्रेधातिरपीट उडते ती अनुभवी मनुष्यच जाणूं शकेल. अभ्यासक्रमांत तो विषय आहे. अर्थात परिक्षेला तो आहेच. परीक्षा पास होणें हें ध्येय, मग काय मिळतील तितकीं त्या संबंधींचीं पुस्तकें वाचून टाकणें व घोकंपट्टी करीत बसणेंच विद्यार्थ्यांच्या नशिबीं! तेव्हां यत्तावार आंखलेला अभ्यासक्रम हा व्यवहारिक स्वरुपाचा असला पाहिजे म्हणजे विद्यार्थ्यांच्या, गुरुजींच्या शक्तीचा जो उगाच अपव्यय होतो, तो होणार नाहीं. त्यांना तीच शक्ति, अन्य आवश्यक विषयाकडे खर्च करतां येईल. कमी श्रमांत अधिक ज्ञान प्राप्त करून घेतां येण्यासारखाच अभ्यासक्रम असला पाहिजे. अनावश्यक असणाऱ्या व देश, काल आणि वस्तुस्थितीशीं मेळ न खाणाऱ्या गोष्टी अभ्यास क्रमांतून दूर करणें आवश्यक आहे. नवीन अभ्यासक्रम या दृष्टीनें बराच व्यवहारिक व जीवनाशीं संबंधित असा आहे.

सहलीद्वारा आपणांस अशा रीतीनें भौगोलिक व ऐतिहासिक ज्ञान प्राप्त करून घेतां येतें. या शिवाय अधिक महत्त्वाचें असें समाज शास्त्राचें ज्ञानहि विद्यार्थ्यांना होऊं शकतें. सहलीला जाणार म्हणजे एका वर्गांतील सर्व मुलें मिळून किंवा सर्व शाळा मिळून. या ठिकाणीं संघ भावना जागृत होते. संघाबरोबर संघासंबंधींचीं आपलीं कर्तव्यें कोणतीं याची जाणीव विद्यार्थ्यांना देतां येतें. या संघांत अनेक शरीर प्रकृतीचे, स्वभावधर्मांचे विद्यार्थी असूं शकतात अर्थात सर्वांच्या गुणावगुणाची पारख परस्परास होऊं शकते. कोणत्याहि माणसाबद्दल सकृद्दर्शनी आपणांस विशेष माहिती होऊं शकत नाहीं. तो मनुष्य जितका अधिक काळ आपल्या संगतींत असेल व अशा संगतीच्या काळांत जेव्हां अनेक बरे-वाईट प्रसंग येतील व त्या त्या वेळीं त्या माणसाची जी वागणूक आढळून येईल त्या वरूनच आपण एखाद्या माणसास अधिक चांगलें ओळखूं शकूं. सहलीच्या वेळीं अनेक प्रसंग येतात व मुलांची मुलांना चांगली ओळख होऊं शकते. या ओळखींतून त्यांना आपला मित्र निवडतां येतो. विद्यार्थी दशेंत तसे पुष्कळच मित्र असतात, पण जिवाभावाचा खरा मित्र अशा प्रसंगांनींच

आपण प्राप्त करूं शकतो. अशा प्रकारें अनेक स्वभावधर्मांच्या, जातिपातींच्या, धर्मविधर्मीयांच्या संघटनेस टिकवायचें झाल्यास प्रत्येक घटकांत थोडा फार संयम असलाच पाहिजे. कोणाच्या हातून चुका होतील, कांहींकडून अक्षम्य अपराध घडतील तर कोणाचा स्वाभिमान दुखविला जाईल. अशा वेळीं वातावरण बिघडण्याची शक्यता असते. व या बिघडलेल्या वातावरणाचा संघटनेवर खोल आघात होणें शक्य असतें. आणि अशा आणीबाणीच्या वेळींच संयमाची मदत अधिक जाणवते. या ठिकाणीं विद्यार्थ्यांना याची जाणीव असली पाहिजे कीं, व्यक्तिपेक्षां संघ श्रेष्ठ आहे, व्यक्तीच्या मानापमानापेक्षां संघाचा मानापमान अधिक महत्त्वाचा आहे. ज्या वेळीं ही जाणीव विद्यार्थ्यांत निर्माण होईल त्या वेळीं त्यांचें व्यक्तिगत वर्तनहि सुधारेल व व्यक्तिगत वर्तन सुधारल्यावर कोणाकडून कोणाच्या स्वाभिमानाला दुखविलें जाणार नाहीं. कोणाच्या भावना दुखविल्या जाणार नाहींत. संयमाचें शिक्षण सहली इतकें दुसऱ्या कोणत्याहि विषया मार्फत समर्पक रीतीनें देतां येणार नाहीं.

संयम अंगीं आला म्हणजे त्या बरोबर शिस्तही येते. संघटना हें शरीर तर शिस्त हा तिचा प्राण आहे! शिस्तीनेंच कोणत्याहि गोष्टींत सौंदर्य निर्माण होतें. कवायतीच्यावेळीं जर शिस्त नसेल तर ती कवायत होऊं शकणार नाहीं. ती एक गोंधळ होऊन बसेल. गोंधळांत मग कोणतें आकर्षण असणार व कोणतें सौंदर्य निर्माण होणार! सैनिकी शिस्त कशी असते, हें कळावें म्हणून ज्याज्या वेळीं असा एकादा प्रसंग येतो त्या त्या वेळीं सैनिकांची परेड पाहायला विद्यार्थ्यांना घेऊन जावें अशा तऱ्हेचा जो शाळाखात्याचा आदेश आहे तो अगदीं स्तुत्य आहे. आपणांस ज्यावेळीं आपण करतों ती गोष्ट चूक कीं बरोबर हें नीट उमजूं शकत नाहीं त्यावेळीं तीच गोष्ट आदर्श स्वरूपांत जेथें केली जात असेल ती पाहून आपले कृतींत सुधारणा करून घेणें इष्ट असते.

सहलींत शिस्त राहावी या करितां सहलीचे कांहीं तात्कालिक किंवा कायम स्वरूपाचे नियम असणें आवश्यक असतें. ते नियम पाळण्याची

नैतिक जबाबदारी त्या सहलीत भाग घेणाऱ्या प्रत्येकावर असते व ती त्यानें ओळखून आपली वागणूक ठेवली पाहिजे. पण या नियमासंबंधीं एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, नियमांच्या जाळ्यांत विद्यार्थ्यांना पुरेपूर गुरफटून ठेवून त्यांच्या व्यक्तिगत स्वतंत्र हालचाली मारल्या जाऊं नयेत. असें जर झालें तर सहलीचा दुसरा जो हेतु स्वतंत्र हालचालींतील आनंदाचा आस्वाद चाखण्याचा, तो मारला जाईल, शिस्त तर राहीली पाहिजे मुलांना स्वतंत्र वृत्तीचा आनंद तर चाखतां आला पाहिजे या परस्पर विरुद्ध वाटणाऱ्या गोष्टी एकसाथ साधावयाच्या म्हणजे कांहीं साधें काम नव्हे. या ठिकाणीं सहलीच्या मार्गदर्शकावर मोठी जबाबदारी येते. त्यानें यांतून कसा मार्ग काढाया हा प्रश्न पडतो. धाकदपटशा हा झाला सरळ मार्ग शिस्तीचा, पण या मार्गानें निर्माण होणारी शिस्त कायमस्वरुपाची टिकाऊ होऊं शकत नाहीं. आणि आम्हांला कांहीं एक प्रसंगापुरतीच शिस्त निर्मावयाची नसते. आम्हांला विद्यार्थ्यांमध्यें कायम स्वरुपाची, त्यांच्या भावी आयुष्यांत नागरिक या नात्यानें उपयोगी पडणारी शिस्त निर्माण करावयाची आहे. अर्थात अशी टिकाऊ शिस्त ही प्रेमाचीच शिस्त कर्तव्याच्या जाणीवेंतून त्यांच्यांत निर्माण केली पाहिजे. खालच्या वर्गातील मुलांना सहलीचे सामान्य नियमच लागू करावेत. त्यांना प्रायः स्वैरसंचारास मोकळीक असावी. त्यांना उडूं, बागडूं, हंसू, खेळूं दिलें पाहिजे. जें कांहीं त्यांनीं शिकावें असें आपणांस वाटतें, तें त्यांनीं याच मार्गानें शिकणें इष्ट आहे. त्यांच्या इंद्रियांना सुख प्राप्त झालें कीं त्यांना आनंद होतो व आनंद प्राप्ति हेंच शिक्षणाचें उद्दिष्ट असतें. ज्या वेळीं सहलींत मुलांना आनंद प्राप्त होईल त्याच वेळीं तीं सहल यशस्वी झाली. असे समजावें. मुलें किती शिकली याचें अनुमान शिक्षकास काढतां येणार नाहीं. सहली मार्फत मिळणाऱ्या शिक्षणाची मोजदाद होऊंच शकत नाहीं.

वरच्या वर्गाच्या सहलींत अधिक शिस्तीची अपेक्षा करणें योग्य असतें. कारण त्यांच्या ठिकाणीं संयमाची अधिक पात्रता असते. अर्थात

येथेंहि प्रेमाची शिस्तच असावी. वरील वर्गांच्या सहलींत ज्ञान प्राप्त करणें हा हेतु तर असतोच या शिवाय कांहीं सामुदायिक कार्यांचीहि अपेक्षा असते. समजा एकाद्या प्रेक्षणीय स्थळीं सहल गेली व त्या प्रेक्षणीय स्थळी कांहीं उपद्रव होण्यासारखी परिस्थिति असेल, घाणघूण असेल तर ती स्वच्छ केली जावी. या कामामुळें सार्वजनिक सेवेची कल्पना विद्यार्थ्यांना येईल. जाण्याचा रस्ता अडचणीचा, कांट्याकुट्यांचा असेल तर तो नीटनेटका करून इतरांना सोयीचा बनविणें हेंहि परोपकाराचें काम आहे. ही स्वयंसेवकाची वृत्ति आहे. शाळेंतील विद्यार्थी स्वयंसेवक बनला पाहिजे. स्वयंसेवकच राष्ट्रसेवक होऊं शकतो. सहलीच्या निमित्तानें ग्रामसफाई, प्रौढशिक्षण या सारखें ग्रामोद्धाराचें कार्य करतां येईल. सहल समजा एखाद्या खेड्यांत अगर खेड्याच्या आसपासच्या भागांत गेली तर करमणुकीचे कार्यक्रम करून स्वतःची करमणूक करून घेतां येईलच येईल, शिवाय या करमणुकीच्या सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारा तेथील रहिवाश्यांस समाज शिक्षण देतां येईल. पाट्या घ्या व शिका, या मार्गानें त्यांचें शिक्षण होणार नाहीं तर त्यांच्या आवडीच्या विषयांतूनच त्यांना साक्षर करतां येईल.

म्हणजे वरील वर्गांच्या सहलीचा हेतु बहुतेक दुटप्पी असणेंच योग्य आहे. अशानें ज्ञानापरी ज्ञान मिळेल व राष्ट्रीय कार्यहि साधतां येईल. आपल्या ज्ञानाचा, आपल्या शक्तीचा आपल्या देशबांधवांस फायदा घेऊं दिला पाहिजे. ज्ञान दिल्यानें उणें होत नाहीं, कामानें शक्तीचा पात होत नाहीं, उलट वृद्धि होते.

सहलींत सहकार्यालाहि मोठें स्थान आहे. समजा एखादें अवजड साहित्य सहलीबरोबर न्यायाचें असेल तर तें सहकार्यानेंच नेतां येईल. सहकार्यांत श्रम विभागणीचें तत्त्व अनुसरलें जातें. मोठ मोठीं वाटणारी कामें सहकार्यानें कशीं सहज साध्य होतात, प्रत्येकाच्या श्रमाची कशी बचत होते, तें काम कसें कमी वेळांत व चांगलें करतां येतें यांचें प्रात्यक्षिक सहलींत मिळूं शकतें. सहकार्य करणें चांगलें असें सांगून त्याचें महत्त्व कळत नाहीं

कीं पटतहि नाहीं. तसा प्रसंग निर्माण झाला कीं प्रत्येकाला त्याचें महत्त्व कळूं लागतें. सहलींत पदोपदीं सहकार्याची आवश्यकता भासते. आणि या अनुभवांतून त्याला सहकार्याचें शिक्षण मिळतें. कुटुंबात, समाजात अगर राष्ट्राराष्ट्रांत सहकार्य असेल तरच मनुष्य सुखी होईल, आनंदानें जगूं शकेल.

सहलींत जातीपातीला, उच्चनीचतेला स्थान नसतें. त्या ठिकाणीं आपण सारे एकच बांधव. विद्यार्थी ही जात आणि मानवता हा धर्म. याची जाणीव प्रत्येकाच्या ठिकाणीं निर्माण व्हायला पाहिजे. प्रसंगांत कोणी जात-पात पाहात नाहीं. तीच वृत्ति सहलीच्या प्रत्येक कार्यक्रमांत दिसून आली पाहिजे याची बरीच जबाबदारी सहल-मार्गदर्शकावर — शिक्षकावर असते. त्याची वागणूक हाच इतरांपुढचा आदर्श असतो. मात्र वागणूक कृत्रिम अशी असतां कामा नये. निष्ठापूर्वक, श्रद्धापूर्वक ती झाली पाहिजे.

सहलीपासून मोठ्यांत मोठा फायदा म्हणजे मुलांना स्वावलंबनाचें प्रत्यक्ष ज्ञान होणें. आपलें काम आपण करणें. आपलें सामान आपण वाहणें हीं कामें ज्यांचीं त्यांनींच करावयाचीं असल्यामुळें मुलें स्वावलंबनाच्या श्रमाशीं परिचित होतात. आपलें काम आपण करण्यास त्यांना कमीपणा वाटत नाहीं सहलींत कित्येक वेळां भोजनाचा कार्यक्रम ठेवण्यांत येतो. त्या वेळीं प्रत्येकास कांहींना कांहीं काम वाटलें जातें. प्रत्येक जण तें आनंदानें करतो. निदान दुसऱ्यांकडून हसें होऊं नये म्हणून काम करण्याचा आपल्या शक्तीनुसार प्रयत्न करतोच करतो.

अशा रीतीनें स्वावलंबनाचे प्राथमिक धुटके सहलीमार्फत विद्यार्थ्यांना पाजतां येतात. श्रम, कष्ट सहिष्णुता त्यांच्या अंगीं येते. भावी जीवनाला सहाय्यभूत होणारी सहनशीलता अंगीं बाणते. या सर्वांबरोबर सामुदायिक जीवनांतील स्वतंत्र, खेळीमेळीच्या वातावरणांत निर्माण होणारा आनंद उपभोगतां येतो.

नवीन अभ्यासक्रमांत सहलीचें मूलोद्योगाइतकें महत्त्व मान्य केलेलें आहे 'मूलोद्योगांतून शिक्षण' असें म्हटलें जातें तसें 'सहलींतून शिक्षण' असेंहि म्हटलें जातें व तसें दिलेंहि जातें.

# चर्चा मंडळ

'वादे वादे जायते तत्त्वबोधः'–वादांतून किंवा चर्चेतून तत्त्वाचा बोध होतो. म्हणजे कोणत्याहि एका विषयावर अनेक माणसांनीं आपले विचार मांडले तर सर्वांच्या विचारांच्या साकल्यानें आपण त्यांतील सार काढूं शकतों. जरी दोन विद्वानांचीं मतें कधीं कधीं तात्त्विक भूमिकेवरून एक होऊं शकत नसलीं तरी त्यांच्या मतप्रदर्शनांतून योग्यमार्ग शोधून काढतां येतो. कोणतीहि एक व्यक्ति, मग ती डॉक्टर पेशाची घ्या कीं वकिली पेशाची घ्या अथवा अन्य कोणत्याहि पेशाची घ्या, आपापल्या विषयांत परिपूर्ण असूं शकत नाहीं. केव्हांकेव्हां असे कांहीं प्रसंग निर्माण होतात कीं, त्यांना आपापल्या व्यावसाय बंधु–भगिनींची मदत घ्यावी लागते. मग ती मदत वैचारिक असूं शकेल किंवा प्रत्यक्ष स्वरुपाची असूं शकेल.

कोणतेंहि काम बुद्धिपुरस्कर केल्यास तें चांगलें होत असतें. सर्वांची बुद्धिमत्ता कांहीं सारखीच असूं शकत नाहीं. एकादा विषय एकास जितक्या लौकर कळूं शकला, तसा तो दुसऱ्यास कळूं शकेलच असें नाहीं. कोणी एकादी गोष्ट आपल्या बुद्धिसामर्थ्यानें एकतासांत करून दाखवील तीच गोष्ट सामान्य बुद्धीच्या माणसास करण्यांस कांहीं तास लागतील. अर्थात ज्याला ती गोष्ट लौकर करून दाखवितां आली नाहीं, त्यांत त्याचा दोष आहे असें म्हणतां येणार नाहीं. त्यानें आपल्या बुद्धि–सामर्थ्यानुसार प्रयत्न केलेला आहे. अशा मंदबुद्धीच्या माणसास आपल्या बुद्धीची चीड येत असतेच, परंतु त्यांत त्याचा नाइलाज असतो; कारण बुद्धि कांहीं प्रयत्नांनीं वाढूं शकत नाहीं.

बुद्धीच्या तीव्रतेचे व मंदबुद्धीचे नमुने शिक्षकांच्या नजरेस वारंवार येत असतात. वर्गांतील किंवा शाळेतील विद्यार्थी म्हणजे शून्यापासून शतका-पर्यंतच्या सर्व बुद्धि–गुणकांचे नमुनेच असतात. अशा अलग अलग बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांना एकाच साच्याचें व ठराविक प्रमाणांतच शिक्षण द्यायचें असतें. वर्गांत परिक्षेला असलेला सर्व भाग पुरा करावयाचा असतो.

६४०३

तो पुरा तर झाला पाहिजे व कोणी मागें तर राहतां कामा नये वर्गांतील दोन चार बुद्धिमान मुलांना घेऊन शिक्षकाला आपला विषय चार सहा महिन्यांतहि पुरा करणें शक्य असतें. परंतु असें करण्यांत पक्षपात होईल; इतरांवर अन्याय होईल. या ठिकाणीं मात्र शिक्षकापुढें मोठा पेंच पडतो. गाडीचे दोन्ही बैल सारख्या उंचीचे व सारख्या शक्तीचे असतील तर गाडी अगदीं सुरळीत चालते. गाडीवानास विशेष त्रास होत नाहीं; परंतु तीच जोडी असमान असेल तर थोडेंसेंहि अगदीं जवळच्या मुक्कामीं वाहून नेण्यास त्या जोडीला फारच त्रासाचेंच होईल, गाडीवानहि कंटाळेल. जवळ जवळ अशीच स्थिति बहुतेक वर्गशिक्षकांची होत असते. अशा भिन्न भिन्न बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांची कुचंबणा कशी होत असते हें सांगण्याची गरज नाहीं. तीव्रबुद्धिच्या विद्यार्थ्यांना उगाच थांबावें लागतें व ते कंटाळतात. या तीव्रबुद्धिच्या विद्यार्थ्यांमुळें मंदबुद्धिच्या विद्यार्थ्यांना कधीं कधीं शिक्षकांच्या बेसावधगिरीमुळें विषय समजो वा न समजो, उगाच थांबावें लागतें व त्यांचे हाल होतात. अशा वेळीं दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांवर जे उद्गार निघतात ते अनुभवी शिक्षकांस सांगणें नकोच.

चालू वर्गपद्धति या दृष्टीनें बरीच दोषी ठरते. विषय वारीची पद्धति योग्य वाटते; परंतु तिची आपल्या देशांत कोठवर शक्यता आहे ? जेथें साक्षरतेचा प्रश्नच आ वासून उभा आहे तेथें सध्यां कांहींकाळ तरी वरील गोष्टीची अपेक्षा करणें उचित ठरणार नाहीं.

यामुळें आपल्या दृष्टीपुढें आहे तीच वर्ग पद्धति ठेवून आपणांस मार्ग काढला पाहिजे. पाठांत जसे कोणी कोणाला प्रश्न विचारावेत, हा मुद्दा महत्त्वाचा असतो, तसा वर्गांत कोणी कोणाला शिकवावें, हाहि विचारणीय मुद्दा आहे. प्रश्न जसे शिक्षकानें विद्यार्थ्यांस, विद्यार्थ्यांनीं विद्यार्थ्यांस किंवा शिक्षकास विचारावयाचे असतात, तोच प्रकार शिकविण्याबाबतहि अमलांत येण्यासारखा आहे. जी गोष्ट एका विद्यार्थ्यास चांगली समजली ती त्यानें दुसऱ्यास समजावून द्यावी. कारण येथें शिकविणें हें तत्त्व नसून दुसऱ्यास शिकण्यास परिस्थिति निर्माण करून देणें हें तत्त्व आहे. मग हें काम

शिक्षकानेंच केलें पाहिजे, असा अट्टाहास वरील यत्तांमधून असतां उपयोगी नाहीं. ज्या विषयाचें वर्गांत शिक्षकानें मार्ग दर्शन केलें. त्या विषयावर सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र जमून चर्चा करावी. या चर्चेमुळें विचार विनियम होईल. ज्या विद्यार्थ्यांना वर्गांत बरोबर मार्गदर्शन घडलें नसेल, तर या चर्चेनें तें घडेल. अधिक विचार करण्यास त्याला योग्य वातावरण मिळूं शकेल. ज्यांना त्या विषयाचें आकलन झालें असेल त्यांचें ज्ञान त्या विषयाच्या चर्चेनें अधिक पक्कें होईल. एकंदरींत अशा चर्चांमुळें शिक्षकांचे श्रम वांचतील. बुद्धिमान मुलांचें त्या त्या विषयाचें ज्ञान पक्कें होईल व सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्यांना त्या त्या विषयांतील यशस्वीतेबद्दल अधिक आत्मविश्वास प्राप्त होईल.

ही झाली वर्गाच्या मर्यादित विषयांची गोष्ट. या शिवायहि अनेक गोष्टींचे व विषयांचें ज्ञान विद्यार्थ्यांना असणें आवश्यक असतें. कारण भावी आयुष्यांत त्या विषयांचें अधिक महत्त्वाचें स्थान असतें. असे विषय सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीयस्वरूपाचे असूं शकतात. या विषयांचें ज्ञान पूर्वापार चालत आलेल्या स्वरूपांत माहीत असणें कांहीं विशेष महत्त्वाचें नसतें. कालपरिवर्तनानुसार त्या बाबतींत विचारांत व आचारांत फरक पडणें आवश्यक असतें. जुन्या टाकाऊ रूढींना चिकटून न राहतां कालानुसार प्रगतविचारसरणी प्रत्येकाच्या ठिकाणीं निर्माण झाली पाहिजे म्हणजे ती व्यक्ति, तो समाज व तें राष्ट्र नव्या जमान्याला तोंड देऊं शकून प्रगतीचा पुढचा टप्पा गाठूं शकतें. स्पृश्यास्पृश्यता, मंदीरप्रवेश, दारुबंदी, आंतरजातीयविवाह, विधवाविवाह, सहशिक्षण, इत्यादि सामाजिक, धार्मिक व राष्ट्रीय स्वरूपाचे कांहीं विषय शाळांत चर्चिले जाऊन त्या संबंधीं सामान्यज्ञान तरी विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेंत होणें इष्ट असतें या दृष्टीनें विचार करतां प्रत्येक शाळेंत अगर कॉलेजांत अशी चर्चा होणें आवश्यक आहे हें कळून येतें. या करितां प्रत्येक शाळेंत एक चर्चामंडळ किंवा वादविवाद मंडळ असणें आवश्यक आहे. प्राथमिक शाळेंत जें चर्चा मंडळ निवडावयाचें तें बहुंशीं प्रमुख शिक्षकाच्या सल्ल्यानें निवडलें जावें. या मंडळाची निवड लोकशाही-

पद्धतीनुसार झाल्यास योग्यच होईल. पण विशेष योग्यतेचा विद्यार्थी कोणता हें इतर विद्यार्थ्यांपेक्षां शिक्षकच ठरवूं शकतील.

प्राथमिक शाळेंत इ. ३ री पासूनच्या विद्यार्थ्यांनीं चर्चेंत भाग घ्यावा. मात्र सक्ती असूं नये. सक्तीचें काम उत्साहजागृतीनें साधतां आल्यास अवश्य प्रयत्न करावा. कांहीं मुलें जात्याच धीट असतात. तीं आपोआप पुढें येतात; पण कांहीं विद्यार्थी हुशार असूनहि चर्चेंत भाग घेण्यास भितात. याचें कारण त्यांच्या अंगीं सभाधीटपणा नसतो, हेंच असतें. विषयाचें ज्ञान असणें हें वेगळें व तें ज्ञान दुसऱ्यास पद्धतशीर देतां येणें हें वेगळें आहे. तसेंच घरांत आई जवळ किंवा इतर नातेवाईकांजवळ बोलणें निराळें व परक्या जनसमुदायांत बोलणें निराळें. कित्येक अगदीं बोलण्याची जंगी तयारी करून येऊनहि आयत्यावेळीं सभागृहांतून पळून गेलेले कांहीं कमी ऐकिवांत नाहींत. चार माणसांत प्रारंभीं नुसतें येऊन उभें जरी नीट राहतां आलें, तरी पुरें आहे. विद्यार्थ्यांनीं चर्चेंत आपले विषय कसे मांडले हा प्रारंभीं महत्त्वाचा मुद्दा नसून ते जें बोलत होते तें धीटपणानें बोलत होते कीं, घाबरटपणा त्यांत होता; हें पाहिलें पाहिजे. म्हणजे विद्यार्थ्यांच्या अंगीं प्रथम धीटपणा येतो आहे कीं नाहीं तें पाहिलें पाहिजे. हा धीटपणा अंगीं येण्या करितां वारंवार चर्चा होणें आवश्यक असतें. शाळेंत चार मुलें बोलकीं निघालीं यावर त्या शाळेची प्रगति ठरविली जाणार नसून त्या शाळेंत अधिकांश प्रमाण अशा मुलांचें आहे कीं नाहीं, हें पाहून शाळेची त्या बाबतींत प्रगति ठरविली जाईल. म्हणून शक्यतों बहुतेक मुलांना चर्चेंत भाग घेतां यावा याकडे लक्ष पुरविलें पाहिजे. अगदीं आरंभीं फार थोडीं मुलें भाग घेतात. पुढें चढाओढीनें तें प्रमाण वाढत जातें. आणि यानें बहुतेक श्रेय कुशल अशा शिक्षकाकडेच जातें. मुलांना नुसती शाबासकीही उत्तेजित करण्यास पुरेशी असतें. चुरशीनेंपण बरेंच काम साधतें. या ठिकाणीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं तात्त्विक मतभेद व्यक्तिगत वैमनस्याला कारणीभूत होतां कामा नयेत. दोन वकील मित्र जसे कोर्टांत तेवढे परस्पराशीं तात्त्विक भांडण किंवा कायद्याचें भांडण करीत असतात, परंतु तेथून बाहेर पडतांच

तें जसे पूर्ववत मित्र म्हणूनच वागतात, ती दृष्टि विद्यार्थ्यांना प्राप्त व्हायला पाहिजे. कारण चर्चा करण्याचा हेतूच हा असतो कीं त्यांतून बोधप्रद असें कांहीं तरी निर्माण व्हावें. आतां, जे विषय चर्चेला घ्यावयाचे ते प्राथमिक शाळांतील खालील वर्गांत शिक्षकांनींच सुचविलेले असावेत कारण जो विषय चर्चेस घ्यावयाचा तो शैक्षणिक लायकी व वयो-मान यांना धरूनच असला पाहिजे. अन्यथा अशा चर्चेपासून कांहीं तत्त्व निष्पत्ति होऊं शकणार नाहीं व विद्यार्थ्यांना त्यांत मौज वाटणार नाहीं. कोणताहि विषय चांगला कळल्या शिवाय त्यांतील आनंद आपणांस प्राप्त होऊं शकत नाहीं. चर्चा हा एक सामाजिक कार्यक्रम असतो. व बराच समाज एकत्र आल्यामुळें आनंदाची निर्मिती होते. मुलांचें तें करमणुकीचें एक साधनच आहे.

प्राथमिक शाळांतील वरील यत्ता व प्राथमिक ट्रेनिंग आणि इतर कॉलेजें यांचीं चर्चामंडळें अधिक पद्धतशीर असलीं पाहिजेत. हीं चर्चामंडळें लोकशाहीपद्धतीनुसार निवडलेलीं पाहिजेत. येथें शिक्षक व विद्यार्थी असा भेदभाव असतां कामा नये. मात्र मर्यादेचें अतिक्रमणहि होतां उपयोगी नाहीं. या ठिकाणाचें वातावरण अधिक खेळी मेळीचें असलें पाहिजे. या ठिकाणीं चालणाऱ्या चर्चा नियमानुसार चालताहेत कीं नाहींत, प्रत्येक वक्ता बोलण्याचे नियम पाळतो आहे कीं नाहीं, विषयावरच बोलतो आहे कीं, विषयांतर होत आहे, या कडेहि लक्ष दिलें पाहिजे. अध्यक्षांचा हुकूम, सभा-गृहाची शिस्त, सभ्यवर्तन व सभ्यभाषा यांचें पालन होणें आवश्यक आहे. या शिवाय इतर प्राथमिक गोष्टी लक्षांत ठेवणें इष्ट आहे.

या वरील दर्जाच्या विद्यार्थ्यांकडून ज्या चर्चा होतील त्या बाबतींत कांहीं विशेष अपेक्षा असतात. अशा चर्चा करून उत्तम वक्ते निर्माण व्हावेत ही एक अपेक्षा असते. जो विषय चर्चेला गेला त्यांतून बोधप्रद गोष्टींची निर्मिती व्हावी हीहि दुसरी अपेक्षा असते. म्हणून सदर चर्चांमधून अधिक गांभिर्य असलें पाहिजे. यांच्या चर्चेचे विषय अर्थात अधिक गंभीर स्वरूपाचे

असावेत. कारण सामान्यविषयांत त्यांच्या मनास व बुद्धीस खाद्य सांपडणार नाहीं.

महिन्यांतून किती विषय चर्चेला घ्यावेत हें चर्चामंडळानें प्रमुखाध्यापकाच्या सल्ल्यानें ठरवावें. चर्चेचे विषय मात्र कोणत्याहि-विद्यार्थ्यास सुचविण्याचा हक्क असावा. सुचविलेल्या विषयांतून योग्य विषय निवडून त्यांची यादी तयार करावी व कोणता विषय केव्हां घ्यावा हें मंडळानें ठरवावें. विषय कमींतकमी चार दिवस पूर्वी तरी जाहीर करावाच.

विशेष तल्लख बुद्धिमत्तेच्या विद्यार्थ्यांकरितां असा एकादा दिवस ठेवून द्यावा कीं, विषय, वेळे पूर्वी पांच तें सात मिनिटें जाहीर करून चर्चा सुरु करावी, अशा प्रकारच्या चर्चा वर्षाच्याउत्तरार्धांत सुरू कराव्यात.

अशा प्रकारच्या चर्चा सुरु करण्यापूर्वी शिक्षकांनीं नमुन्याच्या चर्चा म्हणून करून दाखवाव्यात निरनिराळ्या विषयावर पद्धतशीर कसें बोलावें याचें ज्ञान होण्याकरितां नामांकित लोकांची व्याखानें चर्चा मंडळानें करवावींत.

प्रत्येक शाळेंतील किंवा कॉलेजांतील चर्चा मंडळें वरील सर्व गोष्टींचा अवलंब करतील तर तीं यशस्वी होण्यांत अडथळे येणार नाहींत.

# मासिक सभा

प्रत्येक मनुष्य दिवसभर कांहीं ना कांहीं तरी उद्योग करीत असतो. ते उद्योग चांगले, वाईट, फायद्याचे किंवा तोट्याचेहि असूं शकतात. म्हणजे उद्योगाचें स्वरूप तात्कालिक परिस्थितीवर अवलंबून असतें. वेळ प्रसंग येईल तशी माणसाची क्रिया–प्रतिक्रिया होत असते. असें दिवसभर झाल्या नंतर रात्रीं तो विश्रांतीसाठीं निद्रादेवीची आराधना करूं लागतो. या निद्रादेवीची आराधना करण्यापूर्वीं त्यानें दिवसांतल्या आपल्या कामगिरीचें सिंहावलोकन करावें. प्रत्येक गोष्टीचें मनन करावें. या मननानें त्याला आपल्या कृत्यांच्या बऱ्यावाईट पणाची कल्पना येईल. चुका झाल्या असतील तर त्या कां झाल्या, त्यांत सुधारणा कोणत्या रीतीनें करतां आली असती किंवा करतां येणें पुढेंहि शक्य आहे, याबद्दल मार्ग सांपडेल म्हणजे दिवसभर केलेल्या कृत्यांचा पाढा मनाशीं मोजून मनाचा निर्णय काय होतो तें अजमावण्याचा प्रयत्न प्रत्येकानें करावा. या ठिकाणीं त्यांचें मन हेंच त्याचा मार्गदर्शक होऊं शकतें.

मनुष्य परिस्थितीनुसार वागत असतो. मग या प्रत्येक वेळीं त्याची वागणूक न्यायाची किंवा योग्य मार्गाचीच झाली असेल असें त्याला तरी निश्चित स्वरूपांत सांगतां येणार नाहीं. शरिराच्या ज्या भगांवर स्वतःची दृष्टि पोंचूं शकत नाहीं ते भाग किंवा ते अवयव पाहावयाचे झाल्यास आरशाची किंवा दुसऱ्याच्या डोळ्यांची जशी मदत घ्यावी लागते, तशीच मदत आपण केलेल्या कृत्यांच्या बऱ्या वाईट पणाच्या निर्णयाबाबत घेणें इष्ट असतें. कोणाचें मत घेणें म्हणजे त्या प्रमाणेंच वागणें असें नाहीं. तर सर्वांच्या मताचा सारासार विचार करून शेवटीं आपल्या मनाच्या कसोटीवर जें सत्य ठरेल त्या प्रमाणें वागणेंच इष्ट असतें. 'ऐकावें जनाचें करावें मनाचें.'

हें व्यक्तिगत स्वरूपाच्या कृत्याबद्दल झालें. पण जी व्यक्ति एकाद्या-समाजाचें धुरणीत्व स्वीकारून त्या समाजाकरितां जर कांहीं कृत्यें करीत असेल,

तर त्याची जबाबदारी फार मोठी असते. त्याच्या थोड्याशा बेसावधगिरीच्या कृत्याचा परिणाम अखिल समाजाला भोगावा लागतो. तेव्हां अशा जबाबदार माणसाचें कर्तव्य असतें कीं, तो जें कांहीं करील त्याची जाणीव समाजाला करून दिलेली असली पाहिजे. त्याला जर एखादी गोष्ट करणें समाजाच्या हिताचें वाटत असेल तर ती गोष्ट आरंभीं समाजापुढें मांडणें व समाजाचें मत अजमावणें आवश्यक असतें. हीच लोकशाहीपद्धति आहे.

कोणतेंहि कुटुंब हें समाजाचें एक स्वरूप असतें. त्यांतील मुख्य माणूस हा इतर कुटुंबीजनांच्यावतीनेंच कारभार पाहात असतो. कुटुंबाची भरभराट ही त्याच्याच धोरणावर अवलंबून असते. त्याची सत्ता मात्र निरंकुश असते, असें नाहीं. तो इतर सर्वांना जबाबदार असतो. त्यानेंहि आपला कारभार बव्हंशीं लोकशाही तत्त्वानुसार हांकावा हेंच श्रेयस्कर. लोकशाही पद्धतींत धोक्याचा कमी संभव असतो. चूक घडली तरी तिला बहुमत जबाबदार असतें. अर्थात् असें जबाबदारीचें बहुमत कोणत्याहि संकटाला धैर्यानें, एकोप्यानें तोंड देऊं शकतें.

जसें कुटुंब, समाज व राष्ट्र हें लोकशाही तत्त्वानुसार चाललें पाहिजे तसें ज्ञानार्जनाचें कोणतेंहि केंद्र अर्थात् शाळा, त्याचप्रमाणें कॉलेजें ह्यांचाहि कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालला पाहिजे. कारण याच ठिकाणाहून कुटुंब, समाज व राष्ट्र संचालक व्यक्ति निर्माण व्हायच्या असतात. याच ठिकाणीं तें बीज अंकुर धारणा करूं लागलें पाहिजे म्हणजेच त्याचा भावी काळांत विशालवृक्ष बनूं शकेल.

या दृष्टीनें प्रत्येक शाळेंत कराव्या लागणाऱ्या कामाची विभागणी करून त्या प्रत्येक कामाची जबाबदारी बहुमतानें निवडून दिलेल्या एका विद्यार्थ्यावर सोंपवायला पाहिजे. अशीं कामें करणाऱ्या लोकांच्या समूहाला मंत्रिमंडळ हें नांव देतात. या मंत्रिमंडळासंबंधीं स्वतंत्र प्रकरणांत पुढें विचार करूं.

अशा रीतीनें शाळेचा कारभार हा बहुमतानें निवडून आलेल्या मंत्र्या मार्फत चालविला जातो. सर्व मंत्री आपापलीं कामें दररोज नियमित रूपानें

आपापली जबाबदारी ओळखून करीत असतात. मुख्य मंत्र्याच्या देखरेखी खालीं हें सर्व चालतें. प्रत्येक मंत्री आपली रोजनिशी ठेवतो. महिना अखेर आपल्या एकंदर कामाचा विगतवार अहवाल तयार करतो. कारण महिना अखेरच्या सर्व विद्यार्थ्यांच्या सभेंत ते अहवाल मांडावयाचे असतात, या अहवालांवर प्रथम मंत्रिमंडळांत गुप्त अशी चर्चा होऊनच नंतर ते अहवाल सामान्य सभेपुढें मांडले जाणें योग्य असतें. ही महिना अखेरची मासिक सभा फार महत्त्वाची असते. महिन्यांत घडलेल्या एकंदर गोष्टीचा आढावा घ्यावयाचा असतो. पुढील महिन्याकरितां नवीन पदाधिकारी निवडावयाचे असतात. चालू महिन्याच्या मंत्र्यांच्या अहवालावर चर्चा व्हावयाची असते. या चर्चेंत सर्व विद्यार्थी भाग घेत असतात. शिक्षकांनाहि त्यांत भाग घेतां येतो. कारण शिक्षक हे कांहीं निराळे घटक मानले जात नाहींत. मात्र विद्यार्थ्यांनींच विशेष पुढाकार घ्यावयाचा असतो. प्रथम अहवालावर चर्चा सुरू होते. या चर्चेचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक किंवा दुसरा कोणीहि जबाबदार शिक्षक असतो. यांच्यापैकीं कोणीच नसल तर न्यायदान मंडळांतील एकादा विद्यार्थी तें स्थान सर्वांच्या संमतीनें स्वीकारतो.

अहवाल वाचन प्रथम कोणत्याहि मंत्र्याच्या अहवाल वाचनानें सुरू करण्यास हरकत नाहीं. परंतु तें मुख्यमंत्र्याच्या अहवालवाचनानें सुरू झाल्यास चांगलें. कारण मुख्यमंत्र्याच्या अहवालावरून पुढील अहवालांची कल्पना येते. त्याचा अहवाल हा, सर्व मंत्र्यांच्या अहवालाचें थोडक्यांत दिग्दर्शनच असतें. सामान्य सभेला आपलें मत याच अहवाल वाचनानें निश्चित बनवितां येतें. कारण मुख्य मंत्री हा अधिक जबाबदार असतो.

अशा प्रकारें प्रत्येक अहवाल वाचला जातो. त्या अहवालावर टीका होते. दुरुस्ती, पुष्टी अगर लिहिलेल्या विधानाची—अर्थात खोटें—चुकीचें असल्यास निर्गति केली जाते. त्या नंतर अहवाल मान्य व्हावा म्हणून सभेंतून कोणाचा तरी ठराव घ्यावा लागतो. त्या ठरावास अनुमति मिळाल्यावर अध्यक्षांची सही होऊन तो अहवाल मान्य केला जातो. कोणत्याहि मंत्र्याच्या अहवालावर जी टीका केली जाते ती सूड बुद्धीची किंवा

•

व्यक्तिगत मत्सराची नसते. तर ती विधायक स्वरूपाची असते. चालू महिन्याच्या मंत्र्याच्या हातून जी चूक घडली ती पुढील मंत्र्यानें सावधगिरीनें टाळावी हाच त्या टीकेचा हेतु असतो. हे लोकशाही पद्धतीनुसार निवडले गेलेले मंत्री आपोआपच विशेष सावधगिरी बाळगीत असतात. कारण लोकमताच्या अधिकाराची जाणीव त्यांना असते. येथें अधिकाराच्या मोहाची चिंता नसून जनमताची चिंता त्यांना असते. जनमताला विश्वासांत घेऊन कार्यें करावीं लागतात. त्यांतूनहि चुका होणें शक्य असतें. ज्या चुका खरोखर घडल्या त्या तो प्रामाणिकपणें सर्वांपुढें मांडीत असतो. कारण लपवालपवीला जागृत जनमतांत वावच नसतो. एकंदरींत सर्व मंत्री प्रामाणिकपणें आपापलीं कामें करीत असल्यामुळें अविश्वासाचा कोणाविरुद्ध ठराव आणण्याची पाळी येत नाहीं. म्हणजे राज्यकारभार प्रामाणिकपणावर, विश्वासावर आधारलेला असल्यामुळें तो सर्वांना सुखावह असाच ठरतो.

अहवाल, रोजनिशी ठेवण्यानें विद्यार्थ्यांना लेखनाची संवय लागते. आपण जें केलें तेंच मुद्देसूद कसें मांडावें हें अनुभवानें कळतें. आपापला अहवाल त्या प्रत्येक मंत्र्यासच वाचावा लागत असल्यामुळें सभेपुढें धीटपणानें अहवालाचें परिणामकारक वाचन करण्याची संवय लागते. विशेष प्रसंगीं एकाद्या मुद्याचा तोंडीहि खुलासा करावा लागत असल्यामुळें छोटेंसें भाषण करून तो मुद्दा लोकांना पटवावा लागतो. यामुळें भाषणतंत्राचा अनुभव घेतां येतो व त्याची भाषण-शक्ति वाढते. अशा प्रकारें प्रत्यक्ष शिक्षणाचें कार्य घडत असतें. मंत्री–विद्यार्थी यामुळें जसे कार्यकुशल बनतात तितका फायदा इतर विद्यार्थ्यांना जरी होत नसला तरी तेहि ऐकून, पाहून कांहीं गोष्टी शिकत असतातच. शिवाय मंत्रीपद प्राप्त करण्याची संधी प्रत्येकास मिळवितां येते.

मंत्री म्हणून बहुमतानें निवडून येणें हेंहि एक भूषणच असतें. अर्थात त्याच्या प्राप्तीची इच्छा प्रत्येक उत्साही विद्यार्थ्यास असतेच. या मंत्रिपदाबरोबर जबादारीहि तितकीच मोठी येते त्याचीहि जाणीव या मासिक सभेनें प्रत्येकास होत असते. आपण जें कांहीं मंत्रिपदावरून करणार

त्याची चौकशी करून न्याय देणारा एक मोठा समाज आपल्यावर आहे, ही जाणीव ठेवून काम करणें म्हणजे तरवारीच्या धारेवर नाचण्यासारखें आहे, याची प्रचीती अहवालावरील स्पष्ट व सडेतोड टीकेनें प्रत्येकास येत असते. या दृष्टीनें ही मासिक सभा अधिकाराची, प्रामाणिकपणाची व जबाबदारीची जाणीव करून देणारी न्याय सभाच ठरते.

या सभेंत न्यायदान मंडळाचे निकालहि मांडले जातात. कारण या सामान्य सभेला एकादा निर्णय बदलण्याचाहि पूर्ण अधिकार असतो. कारण या सभेंत प्रत्येकजण न्यायाधिश असतो. आणि यांच्या बहुमतानेंच न्यायमंडळाचा निर्णय योग्य वा अयोग्य ठरविला जातो. न्याय-मंडळाचे कार्य व त्याचे अधिकार या बाबतींत पुढें निराळ्या प्रकरणानें विचार केला जाईल.

हें अहवाल वाचनाचें काम संपल्यावर नवीन पदाधिकारी यांची निवड होते. स्वखुशीनें विद्यार्थी उभे राहातात. एका पदाकरितां अनेक विद्यार्थी उभे राहिले तर गुप्तमतदान पद्धतीनें निवड केली जाते. पण सहसा असा प्रसंग येत नाहीं. कारण विद्यार्थी अधिक संयमी बनतात. त्यांना मंत्रिपदाची खरी कल्पना असते. अधिकार गाजविण्यासाठीं मंत्री व्हायचें नसून सेवेसाठीं मंत्री व्हायचें असतें याची कल्पना त्यांना आलेली असते. चढाओढीचे प्रसंग प्रारंभीं प्रारंभीं उद्भवतात. पुढें प्रमाण कमी होत जातें. याचें कारण शिथिलता हें नसून संयमी प्रवृत्ति बनणें, हेंच असते. सर्व कामाचे मंत्री निवडून झाल्यावर तेच आपसांत मुख्य मंत्र्याची निवड करतात व त्याच सभेंत तें जाहीर होतें. तेथेंहि पदाबद्दल चुरस असेल तर बहुमतानें त्याचा निर्णय लागतो.

अशा रीतीनें मासिक सभेचें कार्य चालतें. प्रत्येकास भाषण स्वातंत्र्याचें महत्त्व कळतें. आपल्या मताची किंमत कळतें. जबाबदारीची जाणीव होते. समाजांत संयमानें कसें वागावें हें कळून संघशक्तीची कल्पना येते.

# न्याय मंडळ

अनीतीचा व्यवहार हाच अन्याय. अर्थात् नीति आणि अनीति ही माणसांनीं आपल्या सोयी प्रमाणें बनविलेली आहे. एकाद्यास जी गोष्ट नीतीची-न्यायाची वाटेल तीच दुसऱ्याला त्याच्या दृष्टिकोनांतून अनीतीची-अन्यायाचीहि वाटूं शकेल हा नीति-अनीतीचा व्यवहारिक दृष्टिकोन झाला. म्हणजे नीती-अनीतीचा प्रश्न विवाद्यच आहे. तरी पण यांतून असा एखादा मध्यबिंदु शोधून काढला पाहिजे कीं जो समाज-स्थिरतेच्या दृष्टीनें न्यायाचा ठरेल. कधीं कधीं या समाज–स्थिरतेच्या दृष्टिकोनांतून माणूसकीचा महान घात करणारे अन्यायहि घडतील, ही सर्वांत मोठी धोक्याची गोष्ट आहे. तेव्हां न्याय-अन्याय नीति-अनीति ही माणूसकीच्या दृष्टिकोनांतून न्याहाळून पाहिली पाहिजे. माणूसकीची दृष्टि ज्या वेळीं माणसाला प्राप्त होईल त्याच वेळीं जगांत कोणालाहि योग्य न्याय मिळूं शकेल. आणि जोंपर्यंत या माणूसकीच्या दृष्टीची प्राप्ति होणार नाहीं तों पर्यंत दिलेले न्याय हे न्यायच ठरूं शकणार नाहींत.

या करितां या नवयुगांत आपणांस ह्या नवदृष्टिकोनाचा उदय करावयाचा आहे. प्रथम प्रत्येकास माणूस बनवायचें आहे. हें माणूस बनविण्याचें कार्य या नवशिक्षणानें होईल. कारण तें माणसाचा सर्वांगीण विकास साधणारें शिक्षण आहे, अर्थात् अशीं माणसेंच न्याय-अन्याय, नीति-अनीति उत्तम रीतीनें पारखूं शकतील. आणि योग्य न्याय देऊं शकतील.

वास्तविक न्याय देण्याचें कार्य कांहीं अल्पवयांत कोणाकडे येऊं शकत नाहीं किंवा दिलेंहि जात नाहीं, मग शाळेंत न्यायदान मंडळाची काय आवश्यकता? हा प्रश्न येथें एकादा उपस्थित करूं शकेल. या बाबतींत असें सांगतां येईल कीं, शाळेंतील वातावरणांत असेपर्यंत विद्यार्थ्यांना बाह्य-जगांतील दूषित वातावरणाचा संपर्क होत नसतो किंवा झालेला नसतो, त्यांची मनोवृत्ति निष्पाप असते. त्यांची दृष्टि स्थीर असते. आणि खऱ्या माणूसकीची, सहृदयतेची, पुरेपूर पात्रता याच वयांत त्यांच्या अंगीं विशुद्ध स्वरूपांत वास करीत असते. हेंच त्या माणूसकीचें विशुद्ध स्वरूप, अधिक

प्रगत करण्याचा काळ म्हणजे मुलाचे प्राथमिक शैक्षणिक वय. या वयांत मुलांच्या मनावर जे संस्कार घडतील ते चिरायु होतील. ज्या संवयी लागतील त्या दृढमूल होतील. याच काळांत त्यांच्या व्यक्तीत्वाचा भरभक्कम पाया उभारला जातो कीं, ज्या पायावर त्यांच्या भावी यशस्वी जीवनाची इमारत उठविली जाते.

तेव्हां या शाळेतील वयांतच प्रत्येक विद्यार्थ्यास बऱ्यावाईटाची दृष्टि प्राप्त झाली पाहिजे. नीति कोणती, अनीति कोणती याची पारख करतां आली पाहिजे. म्हणजे पुढील जीवनांत त्यांना धोके खावे लागणार नाहींत.

आतां, प्रत्येकांत माणूसकी निर्माण झाली आहे म्हणून तो प्रत्येक इसम न्यायदाता होऊं शकेलच असें नाहीं. याकारितां या माणूसकीला व्यवहारिक दृष्टि प्राप्त झाली पाहिजे. ही व्यावहारिक दृष्टि व्यावहाराच्या अनुभवाशिवाय निर्माण होणार नाहीं. अनेक प्रसंग अनुभवल्यावर जी दृष्टि प्राप्त होते ती व्यावहारिक दृष्टि असते. या व्यावहारिक दृष्टीची फार आवश्यकता आहे. ही व्यावहारिक दृष्टि शाळेतच निर्माण करावयाची झाल्यास, शाळेंत जे लहान मोठे कांहीं प्रश्न निर्माण होतात मुलांमुलांमध्यें, ते सोडविण्याची कामगिरी त्यांच्यावरच टाकल्यास, होईल. 'रामानें सदूची पेन्सील चोरली म्हणून सदूनें रामाच्या थोबाडींत लगावली! सदूनें मारल्याची तक्रार घेऊन रामा आला आहे, न्याय करा' हाच प्रसंग आपण उदाहरणादाखल येथें घेऊन विचार करूं शकतों कीं, मुलें हा प्रश्न सोडवूं शकतील कीं, नाहीं. मुलें खात्रीनें या बाबतींत योग्य निर्णय देतील. असे अनेक तक्रारीचे प्रसंग निर्माण होतात. शिक्षकाजवळ येतात. शिक्षकाचें काम वाढतें. त्रास होतो. हा त्रास टाळण्याकारितां व विद्यार्थ्यांनाहि एका थोर दृष्टिकोनाची प्राप्तिकरून देण्याकरितां विद्यार्थ्यांच्या 'न्यायदान मंडळा'ची स्थापना करणें आवश्यक आहे.'

प्रत्येक शाळेंत, कॉलेजांत अशीं न्यायदान मंडळें स्थापन करावींत. या न्यायदान मंडळांत जे विद्यार्थी निवडायचे ते हुशार, तल्लख बुद्धिमत्तेचे व

सर्वांच्या विश्वासास पात्र असेच निवडले जावेत. या विद्यार्थ्यांची निवड विद्यार्थ्यांनींच बहुमतानें करावी. या न्यायदान मंडळांत ५ ते ७ विद्यार्थी असावेत. ज्या विद्यार्थ्यांच्या लेखी अगर तोंडी तक्रारी येतील त्या शांततेनें ऐकून घ्याव्यात. आपला निर्णय ठरवावा. त्याला लेखी स्वरूप द्यावें. जाहीर करण्यापूर्वी मुख्याध्यापकांना तो निर्णय सांगून त्यांचेंहि मत घ्यावें. त्यांच्या सल्ल्याचा विशेष विचार करावा. कारण न्यायदान मंडळांतील विद्यार्थी हे शिकणारे असतात. चुका होणें शक्य असतें. अशा चुका करून करूनच ते ज्ञान प्राप्ति करूं शकतात. न्यायदान मंडळानें ज्या शिक्षा करावयाच्या त्या सौम्य स्वरूपाच्या, गुन्हा करणाऱ्याच्या मनावर विपरीत खोल परिणाम होईल अशा करूं नयेत. शिक्षा ह्या विधायक स्वरूपाच्या कराव्यात. पैशाच्या शिक्षा करणें योग्य नाहीं. त्याचा मनावर कांहीं परिणाम होत नाहीं. एका मुलानें चार आणे चोरले म्हणून त्याला आठ आणे दंड केल्यासहि तो भरील. कारण त्याला ठाऊक असते कीं, सर्वच आपल्या चोऱ्या कांहीं उघडकीस येणें शक्य नाहीं; एकंदरींत पाहातां फायदाच ठरेल. तेव्हां असे दंड करण्याच्या भानगडींत न्यायमंडळानें पडूं नये. जर तसाच प्रसंग निर्माण झाला व अशी शिक्षा करणें त्या प्रसंगीं इष्ट वाटेल तर करायला हरकत नाहीं. पण अशा दंडाच्या शिक्षा करून जी रक्कम जमा होईल त्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न उपस्थित होईल. शाळा जर सरकारी असेल तर तशी वरील अनुमती घ्यावी लागेल. त्याचा तपशील ठेवावा लागेल. खाजगी संस्थेची शाळा असेल तेथेंहि या दंडाच्या रकमेची माहिती कायदेशीर, संस्थेच्या चालक मंडळीला द्यावी लागेल. पण या सीमित कायद्याच्या गोष्टी सोडून विचार केल्यास लोकशाही तत्त्वानुसार अशा दंडाच्या रकमेची विल्हेवाट ही सर्व विद्यार्थ्यांच्या संमतीनेंच इष्ट कार्याकरितां लावतां येईल. याठिकाणीं संस्थेच्या चालकांनीं, मुख्याध्यापकांनीं अगर दुसऱ्या कोणी अधिकाऱ्यांनीं आपल्या मताचा व अधिकाराचा बडगा न उचलणेंच योग्य होईल कारण येथें कायद्याचा, अधिकाऱ्याचा प्रश्न नसून शिक्षणाचा प्रश्न आहे. विद्यार्थ्यांना अनुभवाचें शिक्षण घेऊं द्यायचें आहे, ही उदार वृत्तिअधिकाऱ्यांची असली पाहिजे.

ज्या अपराधी मुलाला शिक्षा करावयाची ती त्याच्या सत्प्रवृत्तीला जागविणारी असली पाहिजे. चार माणसांत त्याला उभें करून ‘ यानें असा असा गुन्हा केला आहे व त्या बद्दल अशी अशी शिक्षा याला दिलेली आहे’ असें नुसतें जाहिर जरी केलें तरी ती त्याला थोर शिक्षा होते. कारण आपल्या मित्रांत आपली बदनामी होऊं नये असेंच प्रत्येक मुलास प्रामाणिकपणें वाटत असतें. आपण असें केलें तर लोक काय म्हणतील, इतकी जाणीव जरी मुलांत निर्माण करतां आली तरी प्रारंभीं पुरे आहे. सत्याची चाड प्रत्येकाला असते. स्वाभिमानहि प्रत्येकाला असतो. विद्यार्थ्यांच्या स्वाभिमानास धक्का पोंचेल अशी कोणतीहि गोष्ट घडतां कामा नये. माणूस सर्व गोष्टी सहन करूं शकतो; परंतु स्वाभिमानास धक्का लागलेला त्याला सहन होत नाहीं. मुलांत स्वाभिमान निर्माण झाला म्हणजे त्याच्या हातून वाईट कृत्यें सहसा होत नाहींत. न्यायदान मंडळाचें न्यायदेण्याचें धोरण स्वाभिमानास धक्का न पोंचेल अशा तऱ्हेचें असलें पाहिजे.

या न्यायदान मंडळाच्या स्थापनेचा एक हेतु असा असतो कीं, अपराध करणारास शिक्षा ही घडणारच आणि ती एक दोन माणसां देखत नसून शाळेंतील सर्व विद्यार्थ्यांदेखत, ही पुरेपूर कल्पना शाळेंतील प्रत्येक विद्यार्थ्यास यावी. ह्या निश्चित कल्पनेमुळेंच गुन्ह्यांचें प्रमाण कमी होत असते. खोड्या करणाऱ्या विद्यार्थ्यास रोज सांगायचें कीं, आज सोडून देतों, पुन्हां अशी खोडी केलीस तर अवश्य शिक्षा करीन. पण शिक्षा करीन करीन असें शिक्षक म्हणतात आणि शिक्षा होत नाहीं ही गोष्ट त्या खोडकर विद्यार्थ्यांच्या लक्षांत येते व त्याच्या त्या समजुतीनें अव्याहत खोड्या चाललेल्याच असतात. तेव्हां शिक्षेबाबत असें अनिश्चित व लांबणीचें धोरण कांहीं योग्य नसतें. परंतु सामान्य गुन्हा असेल व तो एखाद्या विद्यार्थ्याकडून घडला असेल, त्याला त्याबद्दल खरोखर पश्चात्ताप होत असेल किंवा वाईट वाटत असेल अशी न्याय मंडळाची किंवा शिक्षकाची खात्री झाल्यास तो गुन्हा मुद्दाम चार मंडळींत आणूं नये. त्या विद्यार्थ्यास सुधारणा करुन घेण्यास संधि द्यावी. एक दोन

वेळां अशी संधि देऊनहि जर कांहीं सुधारणा होत नाहीं आहे हें लक्षांत आल्यास मात्र अशा विद्यार्थ्यास अधिक कडक शिक्षा व्हावी हेंच योग्य.

या न्याय मंडळाची दृष्टि नेहमीं समतोल असावी. कारण तशी नसेल तर मासिक सभेंत त्याची इतरांकडून झडती घेतली जाईल. कारण त्या सर्वसाधारण सभेस सर्व प्रकारचे संपूर्ण अधिकार असतात. ती सभा अविश्वासाचा ठराव आणून न्यायदान मंडळांतील विद्यार्थ्यांसहि शिक्षा करूं शकते. तेव्हां कांहीं झालें तरी शेवटचा अधिकार जनतेचा आहे व असतो याची जाणीव ठेवून कार्य चाललें पाहिजे.

आतां न्यायदान मंडळांत ५ ते ७ विद्यार्थी असावेत असें म्हटलें आहे, त्यांत इष्ट वाटल्यास मुख्याध्यापकास किंवा दुसऱ्या कोणत्याहि उत्साही व होतकरू शिक्षकास राहातां येईल. येथें मान-सन्मानाचा प्रश्न नसून अगदीं खेळी मेळीच्या वातावरणांत हें कार्य चालावें, विद्यार्थ्यांनाहि शिक्षक आमच्यांत मिळून मिसळून काम करूं शकतात याची कल्पना यावी व त्यांच्या मनांत शिक्षकांबद्दल आदर व आपुलकी निर्माण व्हावी हा हेतु असतो.

प्राथमिक शाळेंतील खालच्या वर्गांत न्यायदान मंडळाचें कार्य इतकें पद्धतशीर चालूं शकणार नाहीं म्हणून ही कामगिरी शिक्षकासच करावयाची आहे. परंतु होतकरू शिक्षक विद्यार्थ्यांचा काय निर्णय मिळतो हेंहि अजमावून पाहाण्याचा प्रयत्न करील. शिवाजी लहान असतांना दादोजी कोंडदेव व जिजाबाई जेव्हां आपल्या जहागिरींतील लोकांच्या भांडण-तंट्यांचे निकाल देत, ते लक्षपूर्वक पाहाण्यास त्या न्यायदान सभेंत हजर राही किंवा मुद्दाम त्याला तेथें नेण्यांत येई. याचें कारण भावी जबाबदारी सांभाळण्याच्या दृष्टीनें अगदीं लहानवयापासून जर तसें शिक्षण मिळालें तर अधिक फायद्याचें होईल, हेंच धोरण मातोश्री जिजाबाईंचें व दादोजींचें होतें. तीच दृष्टि शाळेंत शिक्षकानें बाळगावी.

वरवर ही गोष्ट जरी सामान्य वाटली तरी ती असामान्य आहे. सामान्य वाटणाऱ्या गोष्टींचेच जीवनांत थोर महत्त्व असतें.

शाळेंतील, कॉलेजांतील न्यायदान मंडळें या स्वरूपांत चालल्यास एक नाविन्यपूर्ण वातावरण निर्माण होईल. लोकशाहीपद्धतीचें सहज सहज ज्ञान विद्यार्थ्यांस प्राप्त करून घेतां येईल. व्याख्यानानें ही गोष्ट साध्य होणार नाहीं, प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता आहे.

# शाळेचा कारभार

व्यक्तीचें जीवन घ्या कीं कोणत्याहि समाजाचें जीवन घ्या, तें सुव्यवस्थित चालण्याकरितां त्यांचीं अंगेंउपांगें एका नियमबद्धतेनें क्रियाशील असलीं पाहिजेत. एका व्यक्तीच्या ज्या गरजा असतात, त्याच गरजा समाजाच्या असतात, फक्त प्रमाण अधिक असतें येथढेंच. एक कुटुंब जरी सुव्यवस्थित चालवायचें झालें तरी किती गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतात. राहाण्याची जागा, तिची स्वच्छता, ती सजविण्याकरितां लागणारीं साधनें यांची उपलब्धता, त्या साहित्य-साधनांची मांडणी, त्यांची वारंवार घ्यावी लागणारी काळजी वगैरे गोष्टी पाहाव्या लागतात तेव्हां कोठें त्या कुटुंबाच्या आसऱ्याची पूर्तता होऊं शकते. अन्न धान्याची, कपड्या-लत्त्याची व इतर जीवनोपयोगी वस्तूंचीहि व्यवस्था करावी लागतेच,त्याशिवाय त्या कुटुंबाचें जीवन सुरळीत चालणेंच शक्य नसतें.

मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. संघकल्पनेची जाणीव त्याच्यांत जन्मतःच निर्माण झालेली असते. एकलकोंडेपणाचें भकास जीवन तो केव्हांहिं सुखकर रीतीने जगूं शकणार नाहीं. आदिमानवानें याच मनोवृत्तीमुळें कुटुंब निर्माण केलें. अशीं कुटुंबें वाढून समाज निर्माण झाला. व त्यांच्या वस्ती-स्थानास ग्रामाचें रूप प्राप्त झालें.

मनुष्य एकटा असतो त्यावेळीं जीवनाचे व्याप मर्यादित असतात. पण ज्या वेळीं त्यांचा समूह निर्माण होतो त्यावेळीं त्या समूहाचें जीवन अधिक गुंतागुंतीचें व अवघड बनतें. ज्यावेळीं अशा समूहाला वागविणारी एकच प्रमुख व्यक्ति असते व बाकीचे बेजबाबदारीनें वागत असतात, त्यावेळीं त्या समूहाच्या जीवनाचा कारभार अनागोंदी स्वरूपाचा होतो. तो समूह म्हणजे असंघटित अशी आंवळ्यांचीमोट बनते. कोणी कोणाला जबाबदार नसतो. कोणी काय करावें नि कोणी काय करूं नये, याचीच जाणीव कोणाला नसते. म्हणजे त्या समूहांतील व्यक्ति प्रत्येक गोष्टींत परस्परांच्या

तोंडाकडे पहात असतात. शेवटीं या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून त्या समूहाच्या प्रत्येक घटकांस विस्कळीत जीवनाच्या दारुण परिस्थितीस तोंड द्यावें लागतें.

या करितां कुटुंबाचें, समाजाचें किंवा राष्ट्राचें जीवन सुखकर व्हावें असें जर वाटत असेल, तर त्या प्रत्येकाचा कारभार एकतंत्री-बोजड-कारभार म्हणून न चालतां सुसूत्रित जबाबदारलोकशाही तत्त्वावर चालला पाहिजे. ह्या लोकशाहीपध्दतीच्या कारभारांत अनेक व्यक्ति आपापल्या लायकी व आवडी-प्रमाणें त्या समूहाचीं कामें आपल्या अंगावर घेतील व पार पाडतील. एकच काम एकानें पाहावयाचें असल्यामुळें या कारभारी मंडळीस आपापल्या कामांत योग्य दिशेनें प्रगति करतां येईल त्याचें चिंतन व मनन एकाच केंद्रापुरतें चालेल. 'एकना धड भाराभर चिंध्या' अशी त्यांची स्थिति होणार नाहीं. 'कारभार' म्हटला म्हणजे एका सामान्य कुटुंबाच्या कारभारापासून तहत राष्ट्राच्या कारभारापर्यंत जाऊन पोंचतो. म्हणून समाजांतील प्रत्येक व्यक्तीस प्रत्येक क्षेत्रांतील कारभाराची सामान्य कल्पना असलीच पाहिजे.

शाळेतील विद्यार्थी ही राष्ट्राची भावी पिढी. याच पिढीनें कुटुंबाचा, समाजाचा व पर्यायानें राष्ट्राचा कारभार पहावयाचा आहे. लहान मुलींचा चूल-बोळकांचा खेळ हा जसा त्यांच्या भावीजीवनाची पूर्वतयारी, मानला जातो, याच धोरणानुसार विद्यार्थ्यांना शालेय जीवनांत त्यांच्या भावी आयुष्याच्या तयारीकरितां संधि प्राप्त झाली पाहिजे. जो कारभार त्यांना पुढें करावा लागणार, त्याची प्राथमिक कल्पना तरी त्यांना या आयुष्यांत मिळूं शकली पाहिजे.

शाळेंत अशा कारभाराची मुलांना कल्पना देण्याइतकें कार्यक्षेत्र नक्की असतें. मात्र गुरुजनांनीं अधिक जागृत राहून असलेल्या परिस्थितींतून मार्ग काढण्याची दृष्टि अंगिकारली पाहिजे. वरवर पाहिलें तर ह्यांत कांहीं दिसणार नाहीं! पण कळकळ असेल, आपल्या जबाबदारीची जाणीव असेल व संपूर्ण राष्ट्रीय दृष्टीनें भारावलेलें त्यांचें हृदय असेल, तर शून्यांतूनहि ते

ब्रह्मांड निर्माण करूं शकतील ! असो.

शाळेंत जीं अनेक कामें केलीं जातात, त्यांत पहिलें महत्त्वाचें काम सफाईचें—स्वच्छतेचें असतें. स्वच्छतेचें अत्यंत महत्त्व असतें. स्वच्छता हीच शाळेची शोभा असते.

या नंतरचे काम म्हणजे व्यवस्थेचें. शाळेंत अनेक प्रकारचें साहित्य आहे पण तें सुव्यवस्थित मांडलेलें नसेल तर तें उपयुक्त साहित्यहि अडचण होऊन बसेल. थोडें खावें पण तें चांगलें खावें असें म्हणतात, त्याचप्रमाणें थोडें सामान असलें तरी तें नीटनीटकें ठेवलेलें असावें, म्हणजे त्यांतूनहि शोभा निर्माण होऊं शकते.

या नंतरचीं महत्त्वाचीं कामें म्हणजे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचाची व लघुशंकेची व्यवस्था.

वर्गाचा अभ्यास वेळापत्रकाप्रमाणें किंवा गुरुजी ठरवतील त्या क्रमानें चालला आहे किंवा नाहीं, हें पाहायचें कामहि महत्त्वाचें आहे. शाळेंत खेळले जाणारे खेळ, त्यांचें साहित्य, यांची व्यवस्था; वारंवार निघणाऱ्या सहली, यांची व्यवस्था; सण—समारंभ, उत्सव, जयंत्या, पुण्यतिथ्या, राष्ट्रीयदिन यांच्या कार्यक्रमांची व्यवस्था; सामुदायिक गीत्या किंवा व्यक्तिगत आरोग्याची काळजी वाहाणें; खेळतांना, इतर कामें करतांना होणाऱ्या सामान्य स्वरुपाच्या दुखापतींवर औषधोपचार करणें; शाळेची बाग असेल, शेती असेल किंवा दुसरा कोणता मूलोद्योग असेल तर त्याची व्यवस्था ठेवणें वगैरे कामें शाळेंत करावीं लागतात.

चर्चा मंडळें, अभ्यासमंडळें, न्यायदान मंडळें वगैरेंचीं कामें पाहावीं लागतात. शाळेचें वाचनालय, पुस्तकालय असतें त्याची व्यवस्था करावयाची असेत. शाळेंतील वातावरण आनंदी राखण्याकरितां मधून मधून करमणुकीचे कार्यक्रम ठेवावे लागतात.

शाळेचें सहकारी तत्त्वावर चाललेलें स्टेशनरी दुकान असेल तर त्याची व्यवस्था पाहावी लागते. ट्रेनिंग कॉलेजांतून वरील पद्धतीनें कारभार पाहाणें

अधिक सोयीचें व आवश्यक असतें. ज्या शाळांना वसतिगृहें व भोजनालयें जोडलेलीं असतात, तेथें अनेक गोष्टींचें शिक्षण विद्यार्थ्यांस मिळूं शकतें. आपलें व्यक्तित्व सांभाळून निरनिराळ्या स्वभाव धर्माच्या सहकाऱ्यांत सामुदायिक जीवन कसें व्यतीत करतां येतें, याचें प्रात्याक्षिक त्यांना मिळूं शकतें

सरकारच्या नवीन व आवश्यक धोरणानुसार ट्रेनिंग कॉलेजांना जोडून वसतिगृह व भोजनालय असणें आवश्यकच आहे. स्थानिक परिस्थितीमुळें कांहीं ठिकाणीं अशी सोय होऊं शकत नाहीं अशींहि उदाहरणें आहेत. अर्थात यांतूनहि अशा संस्था व सरकार यांना सहकार्यानें मार्ग शोधून काढतां येणें अशक्य मुळींच नाहीं. नव–शिक्षण यशस्वी करावयाचें झाल्यास प्रथम ट्रेनिंग कॉलेजें त्या दृष्टीनें स्वयंपूर्ण बनलीं पाहिजेत. धरसोडीचा कारभार उपयोगाचा नाहीं. कार्यकठोरता असलीच पाहिजे. असो.

वरीलप्रमाणें शाळेंतील कार्यें कोणतीं हें प्रथम निश्चित करून तीं योग्य अशा विद्यार्थ्यांवर सोपवावीं. अर्थात् अशा कारभारी विद्यार्थ्यांची-मंत्री-विद्यार्थ्यांची निवड सर्व विद्यार्थ्यांनीं बहुमतानें करावयाची आहे. मासिक सभेंत ही निवड केली जाते. सफाईमंत्री, व्यवस्थामंत्री, वर्गमंत्री आरोग्यमंत्री, उत्सवमंत्री, मूलोद्योगमंत्री, खेळमंत्री, सहलमंत्री वगैरे कामाप्रमाणें मंत्री निवडावेत. त्यांच्यांतूनच जो हुशार व कार्यकुशल असेल त्याला मुख्य मंत्री करावा. त्या मुख्यमंत्र्यानें एकंदर कारभाराचें धोरण, आपल्या सहकारी मंत्र्यांच्या अनुमतीनें-सल्ल्यानें आंखावें.आपलें व्यक्तिगत जबाबदारीचें काम सांभाळून इतर मंत्र्यांच्या कामावर देखरेख ठेवावी व प्रसंगीं प्रत्यक्ष मदतहि करावी.

कोणत्याहि मंत्र्याचें कार्य कमी दर्जाचें नाहीं. प्रत्येकाचें कार्य हें एकंदर कारभाराला पूरकच ठरतें. सफाई, व्यवस्था व मूलोद्योग हीं कामें दिसायला सामान्य वाटलीं तरी त्यांचें महत्त्वच अधिक आहे. मंत्री होऊं वाटणाऱ्या विद्यार्थ्याला व इतर विद्यार्थ्यांनाहि ही दृष्टि प्राप्त झाली पाहिजे.

प्राथमिक शाळेंत इ. ३ री पासून अशा तऱ्हेचीं वर्ग मंत्रि-मंडळें चालवितां येतात. तीं व्यवस्थित चालूं शकतात, विद्यार्थी उत्साहानें कामें

करतात, आपापले अहवाल थोडक्यांत व प्रामाणिकपणें तयार करतात हा प्रत्यक्ष अनुभव आहे. मंत्री-विद्यार्थी केव्हां, कोठें व कसा चुकला याचीहि नोंद इतर विद्यार्थी गुपचूप ठेवतात व मासिक सभेंत त्या मंत्र्याच्या अहवाल वाचनाच्यावेळीं तें शिक्षकाच्या दृष्टोपत्तीस कसे आणून देतात, याचाहि प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे. एकाद्या मंत्र्यानें असह्य असा अपराध केलेला आढळल्यास त्याच्या बडतर्फीबद्दल सर्वांच्या सह्यानिशी, विद्यार्थी, तक्रार-अर्जहि कसा मांडतात, याचाहि अनुभव आहे. मात्र विद्यार्थ्यांना बरेंच स्वातंत्र्य द्यावें लागतें. या स्वातंत्र्याशिवाय त्यांच्या मनांतील भावना ते प्रकट करूं शकत नाहींत. यावेळीं शिक्षकानें अत्यंत उत्साहानें व समरस होऊन कार्य साधलें पाहिजे.

अशा रीतीनें शाळेंतील किंवा कॉलेजांतील मंत्रि-मंडळें चालतील तर देशाच्या राज्यकारभाराचा गाडा व्यवस्थित हांकूं शकणारे राष्ट्र-मंत्री अवश्य निर्माण होतील. शाळेचें मंत्रिमंडळ या उदात्त कल्पनेवर आधारलेलेंच असलें पाहिजे.

---

# ग्रामसुधारणा

हिंदुस्थानसारख्या खेडीं प्रधान देशाची प्रगति व भरभराट करावयाची झाल्यास प्रथम त्यांतील खेडींच सुधारावी लागतील. मुंबई, कलकत्ता किंवा दिल्लीसारखीं चार दोन शहरें सुधारलीं व जगांत प्रसिध्दीस पावलीं, म्हणून सारा देशहि त्या स्थितीस जाऊन पोंचला, असें म्हणतां येणार नाहीं. उलट या शहरांनीं आपल्या उन्नतीकरितां शेजारच्या प्रांतांचेंच शोषण केलेलें असतें. लाखांच्या समुदायानें आपलें रक्त परिश्रम करण्यांत खर्च करावें व त्या परिश्रमाचें फळ चार दोन लक्ष्मीपुत्रांनीं चाखावें, तशा तऱ्हेचें या शहरांचें स्वरूप आहे. थोडक्यांत सांगायचें झाल्यास, शहरें हीं खेड्यांवर पोसलीं जाणारीं बांडगुळें आहेत! एकाद्या झाडावर. बांडगुळांची संख्या वाढूं लागली कीं जसें नक्की समजलें जातें–हें झाड लवकरच मरणार, त्याच प्रमाणें देशांत वाढणारी शहरांची संख्या ही देशाच्या प्रगतीच्या आड येणार, हें निश्चित समजावें.

महात्माजींनीं हा शहरांच्या वाढीचा धोका जाणला होता आणि म्हणून त्यांचा प्रत्येक कार्यक्रम खेड्याच्या जीवनाला अनुलक्षून आंखला जात असे. तरुणांनीं खेड्यांकडे जावें. कॉंग्रेसजनांनीं खेड्यांत जाऊन स्थीर व्हावें व कार्य करावें असें ते सांगत. ते नुसते सांगतच नव्हते, तर स्वतःहि खेड्यांतच आपला बराच काळ घालवीत होते. खेड्यांतील मुलांची, स्त्रियांची म्हाताऱ्या-कोताऱ्यांची भेट घ्यावी, आपुलकीनें त्यांच्या जीवनाची, त्यांच्या सुखा दुःखाची चौकशी करावी, त्यांना धीराचे दोन शब्द सांगावेत, आपणहि त्यांच्या सारखेंच जीवन कंठूं लागावें; त्यांच्यावर होणाऱ्या जुलुमाचा, अन्यायाचा प्रतिकार करण्याकरितां आपण पुढारीपण स्वीकारावें; त्यांची अन्यायाचा प्रतिकार करण्याची सुप्त शक्ति जागृत करावी, अशीं अनेक कामें ते खेड्यांत करीत. खेड्यांकडे देशांतल्या सुशिक्षित लोकांची नजर वळविण्याकरितां आपले आश्रम त्यांनीं

खेड्यांमधून स्थापन केले. फैजपूरसारख्या अगदीं खेडें असलेल्या ठिकाणीं कॉंग्रेसचीं अधिवेशनें भरवावीं हाहि पायंडा त्यांनीं पाडला. या सर्व गोष्टींच्या मागें त्यांच्या स्वदेशप्रीतीची तळमळ होती. माझा देश सुधारावा येवढीच महत्त्वाकांक्षा त्यांची नव्हती, तर माझा देश जगाचा मार्गदर्शक ठरावा ही थोर महत्त्वाकांक्षा ते हृदयाशीं बाळगून कार्य करीत असत.

त्यांच्याइतका हिंदुस्थानांतील खेडिनखेडीं फिरलेला क्वचितच एखादा राष्ट्रसेवक सांपडेल. खेडीं पाहाणें निराळें व खेडयांची नाडी परीक्षा करणें निराळें. त्यांनीं प्रत्येक खेडयांत जाऊन तेथील जनतेच्या जीवनांत प्रवेश केला व त्यांच्या हृदयांतील यातना जाणून घेतल्या. खेडयांत त्यांना महात्मा गांधी म्हणून कोणी ओळखीत नसत, 'गांधी बाप्पा' म्हटलें म्हणजे त्यांना त्या महात्म्याची ओळख पटे !

महात्माजींनीं खेडयांची जी नाडीपरीक्षा केली त्यांत त्यांना कित्येक गोष्टी आढळल्या. खेडीं हीं अस्वच्छतेचीं व रोगांचीं माहेरघरें आहेत, प्रत्येक खेडुत अज्ञानांधकारांत लोळत पडलेला आहे, चतकोर तुकडयास व चार बोटें रुंदीच्या लंगोटीसहि पारखा झालेला आहे, विश्रांतीसाठीं धड झोपडीहि नाहीं, अशा स्थितीस पोंचलेला आहे.

या दारुण स्थितींतून खेडयांना वर काढण्याकरितां त्यांनीं खेडयापाडयांत जाऊन सफाईचे कार्य सुरू केलें येवढेंच नव्हे तर आपल्या दैनंदिन कार्यक्रमांत ह्या ग्रामसफाईच्या कार्यक्रमास आद्य स्थान दिलें. ग्रामसफाईपासून दिवसाचा त्यांचा कार्यक्रम सुरू व्हायचा. या ग्रामसफाईचा हेतु हा असे कीं, त्यांना स्वच्छतेची गोडी वाटावी, त्यांनीं आपल्या झोंपडया, आसपासची जागा, विहिरी शेजारची अगर तळयाशेजारची जागा स्वच्छ ठेवून, मलेरिया, नारू या खेडयांच्या शत्रु-रोगांना आळा बसावा. जागोजागीं पाण्याचीं डबकीं, उकीरडे, रस्त्यावर पसरणारें सांडपाणी यामुळें डांसांचा प्रादुर्भाव होऊन मलेरियाची स्वारी गांवावर होते, गांवकऱ्यांच्या शक्तीचा, वित्ताचा नाश होतो व आधींच दरिद्र्याच्या खाईत पडलेली ग्रामीण जनता अधिक होरपळून

निघते, याचा अनुभव त्यांना आलेला होता. आणि त्यांना यांतून वर काढण्याचा स्वच्छतेशिवाय दुसरा मार्गच नव्हता.

ग्रामांच्या सुधारणेंत म्हणूनच गांवसफाईला, गांवच्या रचनेला अधिक महत्त्व आहे. गांव शक्य तो थोडा उंचवटयावर वसविलेला असावा म्हणजे सांड पाणी गांवांतच सांचून राहाणार नाहीं. गांवांत मोठमोठीं पक्कीं घरें समांतर मांडणींत असावींत अशी जरी सांपत्तिक स्थिति पाहातां अपेक्षा करतां येणार नसली तरी ज्या झोंपड्या असतील त्या पक्क्या असाव्यात व त्यांची मांडणी समांतरच असावी. हल्लींचीं खेडीं पाहिलीं तर त्यांना कोणत्याहि प्रकारची रचनाच नसलेली दिसेल. कशीं तरी आपली घोळका करून, पागोळीस पागोळी लागून वसलेलीं घरें व झोंपड्या दिसतात. यामुळें स्वच्छतेचा प्रश्न फार बिकट होऊन बसतो. देशावरील खेड्यांपेक्षां कोकणांतील खेडीं अधिक स्वच्छ व नीटनेटकीं आढळून येतात. खेड्यांत पायऱ्यांच्या विहिरी असतात त्या प्रथम बंद केल्या पाहिजेत म्हणजे नारूचा उपद्रव कमी होईल. मलेरिया आणि नारू यांचें प्रमाण कमी होईल तर खात्रीनें खेड्यांचें जीवन सुधारेल.

घरांची, पाण्याची नीट व्यवस्था झाल्यानंतर पोटाचा प्रश्न उभा राहातो, खेड्याचा' मुख्यधंदा शेती हा जरी असला तरी अधिकांश जनता ही जमिनदारांच्या जमिनी कसणारी मजूर जनताच असते. खोत, पाटील व इतर मोठे जमीनदार हे खेड्यांचे मालक असतात व ते गरीब प्रजेस वाटेल तसे राबवीत असतात. जहागिरदारीचा सरकारनें नवीनच केलेला कायदा या दृष्टीनें फारच उपयुक्त आहे. या पुढची पायरी म्हणजे सहकारी तत्त्वावर शेती करणें ही आहे. याचें महत्त्व जर लोकांना कळलें तर यांतच सर्वोदय निर्माण होईल. कांहीं खेडीं अशीं आहेत कीं वस्तीच्या मानानें शेतजमीन अगदींच अपुरी. अशा खेड्यांत इतर उद्योगांस प्रोत्साहन देणें आवश्यक आहे. खेड्यांत बेकारी हाहि एक मोठा रोगच असतो. त्यामुळें जनता अनीतीच्या मार्गास लागते. लोक व्यसनाधीन होतात. दारू–ताडी पिणें, चोऱ्या, मारामाऱ्या करून प्रजेच्या प्राणास व वित्तास धोका निर्माण

करणें, असलीं कृत्यें वारंवार घडतात, म्हणून बेकारी नष्ट करणें हाहि ग्राम सुधारणेचा एक कार्यक्रम होऊं शकतो.

या सर्व गोष्टींचा नाश करण्याचें एकमेव साधन म्हणजे लोकांना सज्ञान–साक्षर करणें.–साक्षर करणें म्हणजे केवळ लिहा–वाचायला शिकविणेंच नव्हे तर त्यांना आसपासच्या सुधारलेल्या जगाची कल्पना देऊन आपण कोठें आहोंत याची जाणीव करून देणें; त्यांच्या सत्प्रवृत्ति जागविणें अज्ञानामुळें ते ज्या त्याज्य रूढींना चिकटलेले असतात त्यापासून त्यांना परावृत्त करणें; देवा धर्माच्या, भूताखेताच्या ज्या खुळचट कल्पना त्यांच्या हाडीं मांसीं खिळलेल्या आहेत त्या दूर करणें; आपण नागरिक आहोंत, नागरिक या नात्यानें आपलें कर्तव्य कोणतें, देशाच्या दृष्टीनें आपलें स्थान कोणतें याची कल्पना त्यांना दिली पाहिजे.

इतक्या सर्व गोष्टी साक्षरतेंत येतात. देशांत शें. १५ टक्केच साक्षर जनता आहे. आणि या अज्ञानांधकारांत जोंपर्यंत देश राहील तोंपर्यंत देशाची उन्नति अशक्य आहे.

खेड्यांची सुधारणा आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीवर अवलंबून आहे. खेड्यांतलि तरुण पिढी खेड्यांतच राहूं लागली पाहिजे. आजची परिस्थिति अशी आहे कीं खेड्यांत तरुणच काय पण धडधाकट म्हातारीं माणसेंहि आढळत नाहींत! ही झाली अशिक्षितांची गोष्ट. पण चार दोन पुस्तकें शिकून साक्षर झालेला मुलगाहि शहराकडे धांव घेत असलेला दिसतो ! ही स्थिति भयंकर आहे !

अशा तऱ्हेनें खेड्यांतील तरुण व सुशिक्षित पिढी खेड्याला रामराम ठोकूं लागली तर खेड्यांचा उद्धार व्हावा कसा व देश वर यावा कसा? तेव्हां या दृष्टीनें विचारवंतांनीं विचार केला पाहिजे. खेड्यांतून शहराकडे हा माणसांचा प्रवाह वाहण्याचीं कारणें शोधलीं तर तीं अनेक असल्याचें आढळून येईल.

पहिली गोष्ट म्हणजे दिवसभर मेहनत करून शेवटीं रात्रीं अर्धपोटींच आराम करावा लागतो! ही पोटाची खळगीच त्यांना अधिक उतावीळ बनविते. दुसरें, शहरी जीवन अधिक छान छोकीचें, एषआरामाचें असतें, अशी त्यांची कल्पना झालेली किंवा कोणी तरी करून दिलेली असते; अर्थात् सुखासाठीं धडपडणारा प्राणी जर स्वल्पांत सुख प्राप्ति होत असेल ती कशी टाळूं इच्छिणार? तो वरवरच्या का होईना, देखाव्याला बळी पडणारच! तशांत अशिक्षित मनुष्य सारासार विचार करण्याची पात्रता त्याच्या ठिणाकीं नसते. मनुष्य स्वभावच असा आहे कीं, तो अधिक प्रगत होऊं इच्छितो, नवीन दिसेल तें ग्रहण करूं पाहतो. या सर्वांमागें त्याचा सुख प्राप्तीचा प्रामाणिक हेतूच असतो!

तेव्हां हें सुख प्राप्तीचें आकर्षण खेड्यांतच जेव्हां त्यांना वाटूं लागेल, त्याच वेळीं हा प्रवाह थांबूं शकेल. अन्न मिळालें तर वस्त्र नाहीं, आणि वस्त्र आहे तर घर नाहीं अशी स्थिति. आजारीपणांत औषध पाण्याची व्यवस्था होऊं शकत नाहीं, जीवनाच्या वाढत्या गरजा भागूं शकत नाहींत, करमणुकीचीं, चारपांच मैलांच्या अंतरावर असलेलीं शहरांतील, साधनें शतांशानेंहि उपलब्ध नाहींत, शिक्षणाची योग्य व्यवस्था नाहीं, प्राणाचे व वित्ताचे तितकेंसें संरक्षण होण्याचीहि निश्चित शाश्वति नाहीं. या अनेक कारणांनीं खेडीं शहराकडे धांव घेत आहेत. या करितां सध्यांच्या खेड्यांत वरील सर्व गोष्टी उपलब्ध होतील अशी सरकारनें योजना आंखली पाहिजे व ती सर्वांनीं मिळून यशस्वी केली पाहिजे.

खेड्यांत जीवनाच्या प्राथमिक गरजा भागल्या गेल्या पाहिजेत. ज्ञान प्राप्तीचीं केंद्रें असलीं पाहिजेत. करमणुकीचीं साधनें आलीं पाहिजेत व जीवित आणि वित्त यांच्या संरक्षणाची पुरेपूर व्यवस्था झाली पाहिजे, म्हणजे खेडीं टिकून राहातील; त्यांची भरभराट होईल.

या ग्राम सुधारणेस सरकारची शक्ति व वित्त अपुरें पडेल, तेव्हां राष्ट्रसेवकांनीं, देशातील धनवानांनीं मिळून प्रयत्न केला पाहिजे. ग्रामांचा उद्धार म्हणजेच सर्वांचा उद्धार आहे हे त्यांनीं जाणून कार्यास लागलें पाहिजे.

# गांधींचा रचनात्मक कार्यक्रम

**जातीय ऐक्य**—गांधीजींनी रचनात्मक कार्यक्रमांत जातीय ऐक्याला प्रथम स्थान दिलेलें आहे. गटागटाच्या राजकीय ऐक्याला इतकेंसें महत्त्व ते देत नसत, परंतु सांप्रदायिक ऐक्य अवश्य निर्माण झालें पाहिजे असें ते प्रतिपादीत.

'हिंदुस्थान हा हिंदूंचाच,' या कल्पनेस येथें थारा नाहीं. हिंदुस्थान हा त्यांत राहाणाऱ्या हिंदूंचा, मुसलमानांचा, ख्रिश्चनांचा, पारश्यांचा, व यहुद्यांचाहि आहे, असे ते मानीत. जो जो या देशावर हार्दिक प्रेम करतो, याच्या प्रगतीकरितां झटतो त्याचा हा देश आहे. या करितां त्यांत राहाणाऱ्या वरील सर्व धर्मीयांचें अभेद्य ऐक्य निर्माण झालें पाहिजे. ते सर्व बंधुभावानें वागूं लागले पाहिजेत, या सर्वांच्या अंगीं परधर्मसहिष्णुता निर्माण झाली पाहिजे असें त्यांना वाटे. व ते मुक्तकंठानें जाहीर करीत कीं, जों पर्यंत यांच्यांत ऐक्य नांदूं शकणार नाहीं तों पर्यंत खरें स्वराज्य येणार नाहीं व आलें तरी तें सुखावह होणार नाहीं.

हें ऐक्य जातीय, धर्मीय शाळा कॉलेजें ठेवून निर्माण होऊं शकणार नाहीं, हिंदु हॉटेल, मुसलमान हॉटेल, पारशीहॉटेल अशा धर्मविग्रह दाखविणाऱ्यां गोष्टी ठेवून तें साधणार नाहीं. ज्या वेळीं ज्ञानार्जनाकरितां, भोजनाकरिता व करमणुकीकरितांहि हे सर्व धर्म एकत्र येतील व खांद्यालाखांदा लावून देशाकरितां बलिदान करण्यास तयार होतील तेव्हांच खरें ऐक्य निर्माण होईल, असें गांधीजी म्हणत.

**अस्पृश्यता निवारण**—अस्पृश्यता निवारण हा त्यांचा दुसरा कार्यक्रम. 'अस्पृश्यता निवारण' हें कार्य राजकीय आवश्यकतेच्या दृष्टिकोनांतून हातीं घेणें हें निंद्य कर्म आहे असें ते मानीत. अस्पृश्यता हा हिंदुधर्मावरील महान कलंक आहे, तो धुवून टाकणें हें प्रत्येक हिंदूचें कर्तव्य आहे असे ते प्रतिपादीत. प्रत्येक कॉंग्रेस अभिमान्यानें आपल्या जीवनाच्या कार्य-

क्रमांत या गोष्टीस स्थान द्यावें, सनातन्यांना अहिंसक व सत्याग्रही मार्गानें ही गोष्ट पटवावी, असे ते म्हणत. स्वराज्याची उभारणी या दहा कोट हरिजनांना नरकयातना भोगत ठेवून पूर्ण करतां येणार नाहीं. स्वराज्याच्या संरक्षणाचें, त्याच्या भरभराटीचे तेच पाईक आहेत, त्यांचा उद्धार प्रथम झाला पाहिजे.

गांधीजींच्या धोरणानुसार कॉंग्रेसमंत्रिमंडळानें बरीच मोठी आघाडी मारली आहे. जनतेनेंहि आपल्या हृदयाची उदारता दाखविली आहे. आशा आहे थोडया काळांतच राष्ट्रपित्याचें स्वप्न खरें ठरेल.

**दारू बंदी:**—दारूबंदीचा तिसरा कार्यक्रम १९२० सालापासूनच दृष्टिपुढें ठेवला गेलेला आहे. गांधीजी म्हणत' जर अहिंसक मार्गानें आपलें राजकारण यशस्वी करावयाचें असेल तर मद्यपान बंद झालेंच पाहिजें.

या मद्यपान बंदीच्या 'यशस्वितेचें कार्य, डॉक्टरांना, अधिक चांगलें यशस्वी करतां येण्यासारखें वातावरण, निर्माण करतां येईल. स्त्रिया व मुलें यांच्याहि प्रेमळ प्रतिकारानें या गोष्टीस आळा बसूं शकेल.

या मद्यपान बंदीच्या यशस्वितेविषयीं गांधीजी म्हणत 'राष्ट्रसभेनें अशा लोकांच्या आनंदा-विनोदा प्रित्यर्थ विश्रांतिगृहें व आनंद-विनोद गृहें निर्माण करावीं. या मुळे थकलेला भागलेला श्रमिक वर्ग तिकडे आकर्षित होईल, श्रमपरिहाराकरितां त्या गृहांतून उत्तम तऱ्हेचे खाद्य पदार्थ व पेयें त्यांना मिळावींत, करमणूकहि होऊं शकेल अशी तेथें व्यवस्था असावी. आणि खरोखर पाहतां गांधीजींची ही सूचना अगदीं व्यवहार्य अशी आहे. या सूचनेकडे मंत्रिमंडळानें लक्ष पुरवून दारूबंदीचा कायदा अमलांत आणला, तरच त्याच्या यशस्वितेची बऱ्हंशीं खात्री आहे. कायदे करून सर्व गोष्टीना आळा घालतां येईलच असें नाहीं. जनतेच्या सहकाराची, साक्षरतेच्या प्रसाराची व दारूबंदी-प्रचाराची आवश्यकता आहे.

**खादी:-खादीला** रचनात्मक कार्यक्रमांत चौथें स्थान दिलेलें आहे. खादी प्रचाराच्या मागें सर्व जनतेच्या आर्थिक स्वतंत्रतेचें व समानतेचें धोरण आहे. या धोरणाचा अनुभव प्रत्यक्ष खादी निर्मितीचे कार्य केल्यानेंच कळून

येईल. खादी वापरण्याच्या आग्रहामागें स्वदेशीची संपूर्ण दृष्टि आहे. प्रत्येक भारतवासीयास असें वाटावें व तसें त्यानें वागावें कीं, 'मला लागणाऱ्या सर्व वस्तु मी माझ्या देशांत तयार झालेल्या, विशेषतः खेड्यांतील श्रमिक जनतेनें आपल्या मजदुराप्रमाणें तयार केलेल्यास मी वापरीन.'

खादी वापरण्याने अशी एक भावना निर्माण होते कीं, मी ४० कोटी जनतेंतील श्रमिकांपैकीं एक आहे. या प्रत्येकाच्या भावनेमुळें ऐक्याची अमोघ शक्ति निर्माण होते; आपण सारे एक, ही राष्ट्रीय दृष्टि प्राप्त होते.

या खादी मध्यें दुसरीहि एक दृष्टि आहे ती म्हणजे उत्पादनाच्या विकेंद्रिकरणाची. प्रत्येक गांव वस्त्राच्या बाबतींत स्वयंपूर्ण व्हावा व जें अधिक उत्पादन होईल तें शहरांतील आपल्या बांधवांस दिलें जावें. अशा दृष्टीनें प्रत्येक गांवांतील उत्पादन वाढविलें जाईल तर खेडीं सुखी होऊन शहरासहि त्यांची मदत होऊं शकेल.

या खादीच्या उद्योगाबरोबर खेड्यांतून चालत आलेले इतर धंदेहि जे मृतप्राय झालेले आहेत ते जिवंत होतील. परकीयानीं जी येथील प्राचीन हस्तकला जाणून बुजून नष्ट करून टाकली आहे, ती पुन्हां उदयास येईल

आज पर्यंत हिंदुस्थान, ही कच्च्या मालाची जागतिक पेठच होती. कापसाचे पीक याच दृष्टीनें काढलें जाई. हा कच्चा कापूस अमेरिका. इंग्लंड, जपान या देशांत जाई. तेथें त्याचें कापड तयार होऊन तें हिंदुस्थानांत येई. पक्क्या मालाचें गिऱ्हाईक म्हणजे हिंदुस्थान, अशी सर्वांची खात्री झालेली होती. या व्यवहारांत हिंदुस्थान कोट्यावधी रुपये गमावून बसे. हिंदुस्थानच्या दारिद्र्याचें हें एक मोठें कारण होतें.

खादी वापरणाऱ्या इसमाबद्दल किंवा कुटुंबाबद्दल गांधीजींनीं पुढील अपेक्षा बाळगल्या होत्या—त्या 'कुटुंबानें आपल्या जमिनींत इतर आवश्यक वस्तूंच्या उत्पादनाबरोबर कापसाचेंहि गरजे पुरते उत्पादन करावें. प्रत्येक कांतणारानें कापसावरच्या सर्व क्रिया शक्य तों स्वतःच कराव्या. जें सूत कांतलें जाईल तें कापड–उत्पादनास योग्य असेंच असावें. प्रत्येक कातणारास

आपल्या कताईच्या साधनांची चांगली माहिती असावी. त्याच्या मोड तोडीच्या दुरुस्तीचें काम त्याला स्वतःला करतां यावें. '

अशा प्रकारचें खादीचें कार्य गरिबापासून श्रीमंतापर्यंत जर सर्व करूं लागले तर गरिबी–श्रीमंतीला प्रेमपाशांत गुंफणारा याशिवाय अन्य यशस्वी मार्ग तो कोणता आहे?

आपल्या देशांत बुद्धि व श्रम यांची जी फारकत झालेली आढळून येते व या फारकतीचे जे दुष्ट परिणाम आपणांस भोगावे लागत आहेत, त्यापासून बचाव करण्याकरितां व बुद्धि आणि–श्रम यांचा सुवर्ण मिलाप घडवून आणण्याकरितां खादी हाच एक स्वयंपूर्ण उपाय आहे.

खादीशिवाय दुसरेहि कांहीं ग्रामीण उद्योग आहेत. परंतु ते मर्यादित लोकापुरते व मर्यादित स्वरूपाच्या उत्पादनाचे आहेत. ते खादीला पोषक असेच आहेत—दळण, कांडण, सडण करणें, साबण तयार करणें, कागद बनविणें, आगपेट्या तयार करणें, कातडीं कमाविणें, तेल घाणी चालविणें. हे धंदे ग्रामीण जीवनाला स्वयंपूर्ण बनविण्याच्या दृष्टीनें उपयुक्तच आहेत. यांना उत्तेजन मिळविणें आवश्यक आहे. यामुळें गरीब जनतेस, बेकार जनतेस काम मिळेल व इतरांची सोयहि साधेल.

(**ग्राम सफाई**):—श्रम आणि बुद्धि यांचें ऐक्य असतें तर हा ग्राम-सफाईचा प्रश्नच उरता ना. पण वस्तुस्थिति तशी नसल्यामुळें या अत्यंत आवश्यक गोष्टीकडे दुर्लक्ष झालेलें आहे. परदेशांत शहरांतील लोक आपल्या सुट्टीचे दिवस घालविण्याकरितां खेड्याकडे धांव घेतात. ज्या ज्या वेळीं अशी खेड्यांत जाण्याची संधि प्राप्त होते, त्या त्या वेळीं ते तिचा फायदा घेतल्याशिवाय राहात नाहींत. मात्र हिंदुस्थानची स्थिति याच्या अगदीं उलट आहे. खेड्यांत जावें लागणार या कल्पनेनेंच कित्येक लोकांचें रक्त आटूं लागतें! खेड्याचें दारिद्र्य, अस्वच्छता, आवश्यक वस्तूंची दुर्मिळता त्याच्या दृष्टीपुढें उभी राहाते व तो खेड्याचें नांव काढतांच चिचकून जातो! खेड्यांत जाणें म्हणजे मृत्यूच्या दाढेंत जाण्यासारखें त्याला वाटतें! खरोखर

ही गोष्ट अत्यंत अपमानास्पद आहे. या बाबतींत आपण विचार केला तर बऱ्याच अंशीं बुद्धिजीवि लोकच याला जबाबदार होऊं शकतील. आपण शहराकडे आलों. खेडयाकडे आपुलकीनें केव्हांच पाहिलें नाहीं. त्याच्या प्रगतीची आपणांस केव्हांच पर्वा वाटली नाहीं. आपलेच जातभाई, भाऊबंद तेथें राहाताहेत याची जाणीवहि आम्ही ठेवली नाहीं. एकंदरींत आम्ही खेडयापासून पराङमुख झालों. आणि याचमुळें एका काळीं आपणांस जन्म देणारीं खेडीं परकीं वाटूं लागलीं, भयानक भासूं लागलीं या परिस्थितींत सुधारणा घडवून आणण्याकरितां, शहरांतील लोकांना खेडयांत जाण्याची संधि देण्याकरितां गांधीजींनीं ग्रामसफाईचा कार्यक्रम सुरू केला. कांहीं हौस म्हणून, कांहीं सेवा म्हणून तर कांहीं गांधीजी सांगतात म्हणून या ग्रामसफाईत भाग घेऊं लागले. त्यांच्या पश्चात् आतां या कार्यक्रमाचा प्रेरक असा कोणी राहिलेला दिसत नाहीं; परंतु अत्यंत आनंदाची गोष्ट म्हणजे शाळेच्या अभ्यास क्रमांत या कार्यक्रमाला दिलेलें महत्त्वाचें स्थान ही होय.

**(नवशिक्षण)**:–‘हें शिक्षण खेडयांची परिस्थिति लक्षांत घेऊन आंखलेलें आहे’ असें गांधीजी म्हणतात. हिंदुस्थानांतील चालू प्राथमिक शिक्षण हा एक फार्स आहे. यांत खेडयांच्या हिताची दृष्टि तर नाहींच नाहीं; परंतु शहरांच्या वातावरणालाहि तें उपयुक्त ठरणार नाहीं. हें नव शिक्षण मुलाच्या शरिराचा व मनाचा विकास करतें. हें शिक्षण मुलाला स्वदेशीच राखतें. स्वदेशाभिमान जागृत करून उज्ज्वल भविष्य काळाचें दृष्य दृष्टीपुढें उभें करतें. शाळेंत पदार्पण करतां-क्षणापासूनच मूल देशाच्या भरभराटीस हातभार लावूं शकतें. या शिक्षणानें संपूर्ण विकसित असा मानव निर्माण होऊं शकतो.

**(प्रौढ शिक्षण)**:–रचनात्मक कार्यक्रमांत याचें स्थान बरेंच मोठें आहे.

प्रौढशिक्षणाचा मोठा प्रश्न आज शाळाखात्यापुढें अर्थात् सरकारपुढें उभा आहे. सार्वभौमप्रजासत्ताक राज्याची स्थापना लोकशाही तत्त्वानुसार

करावयाची झाल्यास सर्व प्रजा साक्षर असणें आवश्यक आहे. प्रजा अशिक्षित असेल तर खरी लोकशाही निर्माण होणेंच कठीण. वाटेल त्या पक्षानें अशिक्षित प्रजेस थापाबाजी करून राज्यशकट हस्तगत करण्याकडे त्यांच्या मताचा उपयोग करून घ्यावा, बिचाऱ्या गरीब प्रजेचीं दुःखें तशींच लोंबकळत राहावीं व पक्षनिष्ठ राजकारण सुरू राहावें अशी परिस्थिति निर्माण होईल. मग कसलें सुराज्य व कसलें रामराज्य! गांधीजींना रामराज्य स्थापावयाचें होतें. त्यांची रामराज्याची कल्पना पूर्णत्वास पोंचलेली होती.

प्रौढांना जें शिक्षण द्यावयाचें तें प्रथम अक्षरज्ञानापासून सुरू न करतां देशासंबंधीं गोष्टीरूपानें त्यांना माहिती करून देऊन स्वदेशप्रीति जागृत करण्यापासून सुरवात करावें. आपला देश केवढा आहे, त्याची वस्ती किती आहे, या देशांत कोणकोणत्या धर्मांचे, जातीचे लोक राहातात, देशाची सांपत्तिक स्थिति कशी आहे, ती अशी कां झाली, कोणी केली, अशा स्थितींतून आपणांस कसें वर येतां येईल, या करितां प्रत्येकानें काय केलें पाहिजे, आपण समाजाचे, राष्ट्राचे घटक आहोंत, या दृष्टीनें आपलें कर्तव्य कोणतें? इत्यादि गोष्टींची माहिती त्यांना प्रारंभीं देणें आवश्यक आहे. देशांतील थोर पुरुष, त्यांचें कार्य या संबंधींहि त्यांना माहिती देणें आवश्यक आहे. अशा तोंडी शिक्षणानें त्यांची कूपमंडूक दृष्टि नाहींशी होईल. आपलें खेडें हेंच जग व हाच देश अशी जी भ्रामक कल्पना त्यांची असते ती नष्ट होईल. दृष्टीची विशालता प्राप्त झाल्याशिवाय माणूस विचारी बनत नाहीं; माणसास आपल्या कर्तव्याची पुरेपूर जाणीव येत नाहीं.

या तोंडी शिक्षणाबरोबर त्यांचें अक्षरज्ञानाचें शिक्षणहि चालू असेल. हें अक्षरज्ञान करण्याची पद्धति निश्चित झालेली आहे. सध्यांचें प्रौढशिक्षण या धर्तीवरच दिलें जातें. सरकारनें 'प्रौढशिक्षण-विभाग' म्हणून स्वतंत्र विभागाची योजना केलेली आहे. ही 'प्रौढ शिक्षण-विभाग-समिति' वारंवार आपले अहवाल सविस्तर रीतीनें प्रसिद्ध करीत असते. त्या अहवालावरून हें कार्य प्रगतीपर आहे असें दिसून येतें; परंतु देशांतील अशिक्षित प्रौढांच्या संख्येच्या दृष्टीनें

प्रतिवर्षी साक्षर होणारी संख्या अल्पच वाटते. याच प्रगतीनें हें कार्य चालू राहिल्यास सर्व निरक्षर प्रौढांना साक्षर करण्यास बराच कालावधी लागेल. अर्थात खरी लोकशाही निर्माण होण्यास तितकाच काळ थांबावें लागेल.

या करितां एक गोष्ट करतां येण्यासारखी आहे. उच्च शिक्षण प्राप्त करीत असलेल्या विद्यार्थ्यांकडून सक्तीनें जरी नको तरी कर्तव्य बुद्धीने या कार्यात ठराविक काळ सहाय्य मिळवावें. अशा विद्यार्थ्यांनीं आपल्या सेवेचा काळ एका हप्त्यानें किंवा अनेक हप्त्यांनीं पुरा करून द्यावा. व त्यानंतरच सरकारनें त्यांना त्यांच्या शिक्षणाचें प्रमाण-पत्र द्यावें. या ठिकाणीं सक्तीचा प्रश्न नसून स्वदेश प्रीतीचा, स्वकर्तव्याचा प्रश्न आहे. स्वतःचें कल्याण साधणें कांहीं बुद्धिमान माणसास अवघड नाहीं; परंतु स्वार्थाबरोबर परमार्थ साधण्यांतच खरें वैशिष्ट्य आहे. माझें पोट भरलें म्हणजे जगाचें पोट भरलें, ही दृष्टि अगदीं संकुचित व त्याज्य आहे. ही मनुष्य-प्रवृत्ति म्हणतां येणार नाहीं.

गांधीजी या मनुष्य-प्रवृत्तीची अपेक्षा तरूणांकडून करीत असत. तरूण विद्यार्थी-वर्गानें त्या महात्म्याची अपेक्षा पुरी न करावी तर कोण करणार ?

**स्त्रिया**—स्त्रियांसंबंधींहि रचनात्मक कार्य गांधीजींनीं आखून दिलेलें आहे. ते म्हणतात हिंदुस्थानच्या स्त्रियांची जी पूर्वी स्थिति होती, ती सत्याग्रहानें कल्पनातीत सुधारली आहे. आणि स्त्रियांची उन्नति साधण्याचा हाच एक यशस्वी मार्ग आहे. हजारोंवर्षांपासून स्त्रीविषयक कायदेकानू पुरुषच तयार करीत. त्या कायदे-कानूप्रमाणें स्त्रियांनीं वागावें हीच पुरुषांची अपेक्षा असे. स्त्रियांना मात्र सर्व बंधनें पाळावीं लागत, पुरुष वाटल्यास पाळीत असत. पुरुष स्त्रीला दासी, सेविका मानी. पत्नी ही आपला बरोबरीचा मित्र किंवा सहकारी आहे. असें त्याला केव्हांहि वाटलेलें नाहीं. स्त्रीचें भविष्य पुरुषानें ठरवायचें. तिला त्या बाबतींत बोलायचाहि हक्क नाहीं, मग सल्ला देण्याचा अगर मत प्रतिपादन करण्याचा हक्क कुठचा असणार !

ही हिंसक परिस्थिति झाली, गांधीजी म्हणत, ' हें राक्षसी कृत्य आहे, स्त्रियांच्या माणूसकीच्या हक्कावरच ही गदा आहे, अहिंसक राज्यपद्धतींत याला स्थान नाहीं. येथें स्त्रियांनींच आपलें भविष्य ठरवावयाचें आहे. स्त्रि-पुरुषांनीं एकत्र बसून आपल्या आचारा-विचाराचे नियम ठरविले पाहिजेत. परस्परांच्या मर्जीनुसार कारभार चालला पाहिजे. कोणी कोणता अधिकार गाजवावा, हा येथें प्रश्न नसून तो अधिकार ज्याचें कर्तव्य श्रेष्ठ त्याच्याकडे जाईल. स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीनें आपलें कर्तव्य पार पाडील. दोघांचें कार्य परस्पर पूरक असेल. पुरुष स्वतःला स्त्रीचा स्वामी अगर मालक समजणार नाहीं, तर ' जीवनाचे साथी ' अशींच तीं दोघें राहातील. स्त्री ही पुरुषाच्या करमणूकीचें, भोगविलासाचें साधन नसून पुरुषाबरोबर समान पातळींत राहून सेवा कार्यांत सन्मानपूर्वक जगणारी ती देवी आहे. या करितां पुरुषांनीं त्यांना बरोबरीच्या नात्यानें शिक्षण घेण्यास मदत करावी. स्त्रियांनींहि आपली जबाबदारी ओळखून तें प्राप्त करून घ्यावें. नुसते समान हक्क मागून मिळणार नाहींत, ते कर्तव्य करून मिळवावयाचे असतात. पुरुषांनीं त्यांना या बाबतींत मदत करायला पाहिजे. आपलें वर्चस्व टिकविण्याकरितां स्त्रियांना आहे त्याच स्थितींत दाबून ठेवण्याचा प्रयत्न, हा उफाळलेल्या सागरास थोपवण्याच्या निष्फळ प्रयत्नासारखाच ठरेल. सध्यांची भारतीय स्त्री महात्मा-गांधींनीं, ज्योतिबा फुल्यांनीं, महर्षि शिंदे, महर्षि कर्वे व सरोजिनीदेवी यांनीं निर्माण केलेली तेजस्वी तरुणी आहे; ती आतां यत्किंचितहि मागें सरणार नाहीं !

**व्यक्तिगत आरोग्य**—व्यक्ति हा राष्ट्राचा घटक आहे. व्यक्ति व्यक्तींचे जीवन हें राष्ट्राचें जीवन आहे. व्यक्तीची उन्नति हीच राष्ट्राची उन्नति आहे. या दृष्टीनें व्यक्तिगत आरोग्याचें फार महत्त्व आहे. ज्या देशांतील जनता आपलें आरोग्य उत्तम राखते तो देश सर्व दृष्टींनीं बलवान बनतो. रोगांनीं पछाडलेली जनता देशाचें कांहीं कल्याण करूं शकणार नाहीं. जगांतील मृत्युसंख्येत हिंदुस्थानचा नंबर जवळ जवळ पहिला लागेल! अर्थात

याचें, 'व्यक्तिगत आरोग्याकडे दुर्लक्ष' येवढेंच कारण होऊं शकणार नाहीं' तर देशाची गरिबी हीहि या गोष्टीस जबाबदार आहे. ही गरिबीच मुळांत रोग आहे! तरीपण व्यक्तिगत आरोग्याचे कांहीं सामान्य नियम पाळले जाणें अशक्य मुळींच नाहीं. ते पाळले गेल्यास आरोग्य सुधारण्यास फार मदत होईल.

शरीर आणि मन यांचा दाट संबंध आहे. मन निर्मळ तर शरीर निर्मळ. सुदृढ शरिरांत सुदृढ मन. मनाचें पावित्र्य हेंच शरीरपावित्र्य. धडधाकट दिसणें निराळें व त्या धडधाकट शरिरांत मनाचें पावित्र्य असणें निराळें. सुदृढ याचा अर्थ पूर्णविकसित असाच आहे. मनुष्य पूर्णविकसित असेल तरच त्याचें मन पवित्र असूं शकेल. मनाची शुध्दता राखण्याकरितां पुढील कांहीं गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे.

(१) नेहमीं मनांत पवित्र विचार आणा; घाणेरडे विचार काढून टाका.

(२) नेहमीं शुध्द हवेंत संचार करा.

(३) शरीर व मन यांच्या संमतीनेंच कार्य करा.

(४) आपल्या प्रत्येक व्यवहारांत टापटीप, स्वच्छता व उत्साह राखण्याचा प्रयत्न करा आणि हें संवयवत् बनूं द्या.

(५) भोजन सेवेकरितां जगण्याच्या हेतूनेंच ग्रहण करा. भोग विलासाकरितां जगण्याचा व खाण्याचा मोह धरूं नका. म्हणून येवढेंच खा कीं, जेणें करून तुमचें शरीर निरोगी राहील व तुम्ही जनसेवा करूं शकाल.

(६) खाद्य पदार्थांचा शरीरावर व मनावर परिणाम होत असतो म्हणून जें खाल, जें प्याल तें स्वच्छ असलें पाहिजे. मना विरुद्ध कोणत्याहि पदार्थाचें सेवन करूं नका.

**प्रांतिक भाषा**—इंग्रजीच्या वर्चस्वामुळें प्रांतिक भाषांचें मरण ओढवलें. त्या जागच्या जागींच राहिल्या. त्यांच्या उन्नतीकडे लक्ष देण्यास इंग्रजी अमदानींत फुरसत सांपडली नाहीं. यामुळें जगांतील नव-विचार, नव-सुधारणा तींतून प्रकट होऊं शकल्या नाहींत. याचा परिणाम त्या भाषा जाणणाऱ्यांच्या संकुचित मनोवृत्ति निर्माण होण्यांत झाला. ती जनता जगाला अपरिचित अशी राहिली. देश जागृतीचे काम अवघड होऊन बसलें, कारण या खालच्या समाजांत व इंग्रजी शिक्षण घेऊन वर आलेल्या समाजांत विचारांची देवाण-घेवाण चालू राहूं शकली नाहीं. अशा रीतीनें एका समाजाचे दोन विभाग पडले. अर्थात् सर्व दृष्टींनीं ते परस्परास दूर झाले. या विभागणीमुळें देशाची थोर हानि झाली आहे. स्वराज्यांत आतां ती हानि भरून काढलीच पाहिजे. मातृभाषेंतून किंवा प्रांतिक भाषेंतूनच सर्व शिक्षण मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. असें झालें तरच सर्वांच्या सहकार्यानें राष्ट्र उन्नति करूं शकेल.

**राष्ट्रभाषा**—हिंदुस्थान अनेक प्रांत मिळून बनलेला देश आहे. या देशांत अनेक भाषा प्रचलित आहेत. या अनेक भाषा-भाषी यांच्यात विचारांची देवाण-घेवाण चालणें आवश्यक आहे. एक राष्ट्राची कल्पना एक राष्ट्रभाषेशिवाय मूर्त स्वरूप धारण करूं शकत नाहीं. याकरितां राष्ट्रभाषेची जरुरी आहे. प्रचलित असलेल्या अनेक भाषांमधूनच अशा एकीला तें स्थान प्राप्त करून दिलें पाहिजे कीं, जी अधिक प्रमाणांत लोक जाणताहेत. हिंदी ही अशी एक भाषा आहे. ती राष्ट्रभाषा होण्यास लायक आहे. राष्ट्रानें तिचा स्वीकार केलेला आहे. १९२५ सालच्या कानपूर-काँग्रेसनें तिला ' हिंदुस्तानी ' म्हटलें आहे. उर्दू आणि देवनागरी अशा दोन शैल्यांमधून ती लिहिली जावी. असा राष्ट्रसभेचा आग्रह आहे. गांधीजी याच मताचे होते. तरीपण लिपिसंबंधीं अधिक विचार होणें इष्ट आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांत अनेक भाषा प्रचलित आहेत; परंतु लिपि रोमन लिपीच आहे. रशियांतहि तीच तऱ्हा आहे. एक भाषेचें जितकें महत्त्व राष्ट्राच्या जीवनांत असतें

याच्या कितीतरी पटीनें एका राष्ट्रलिपीचें महत्त्व असतें. कारभाराच्या दृष्टीनें एक लिपीच सोयीची. या दृष्टीनें देवनागरी लिपीच राष्ट्रलिपि होऊं शकेल. लिपि निश्चित झाल्यावर भाषेच्या स्वरुपाचा प्रश्न तितकासा त्रासदायक ठरत नाहीं. भाषेच्या स्वरूपावर आजुबाजूच्या वातावरणाचा परिणाम होणारच. या दृष्टीनें अरबी, फारशी, संस्कृत, इंग्रजी व इतर प्रांतिक भाषा यांतील विशेष प्रचलित शद्ब आपोआपच पचविलें जाऊं शकतील. तेव्हां हा मुद्दा विशेष विवाद्य आहे असें वाटत नाहीं. मात्र स्वतंत्र भारताची स्वतंत्र राष्ट्रभाषा आतां विलंब न लावतां निश्चित स्वरूपांत राज्यकारभार पाहूं लागली पाहिजे. आशा आहे ती लौकरच आपलें स्थान ग्रहण करील.

**आर्थिक समानता**—लोकशाही प्रधान राष्ट्रांत आर्थिक समानतेला विशेष महत्त्व आहे. संपत्ति आणि श्रम यांची एकजूट म्हणजेच आर्थिक समानता, असें गांधीजी म्हणत. चार दोन व्यक्तींच्या हातांत असलेली राष्ट्राची अमाप संपत्ति कमी करून अर्धपोटीं राहाणाऱ्या कोट्यवधी जनतेच्या उदरांत भर टाकणें; हेंच आर्थिक समानतेचें गांधींचें धोरण होतें. स्वतंत्र हिंदुस्थानांत गरीब श्रीमंत हा भेदभाव न करतां अधिकाराची विभागणी झाली पाहिजे. कसेल त्याची जमीन व श्रमेल त्याची संपत्ति असली पाहिजे. एक झोंपडींत व एक महालांत ही स्थिति असतां कामा नये. जर धनवानांनीं आपली संपत्ति स्वखुशीनें राष्ट्रकार्यास अर्पण केली नाहीं तर क्रांती होऊन त्यांच्या हातून निघून जाईल; पण हा प्रसंग देशाच्या दृष्टीनें अहितकर ठरेल. हा हिंसेचा प्रसंग न आणूं देतां अहींसक मार्गानें समाजाला बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या अहिंसक मार्गाचा अवलंब कॉंग्रेसमधील धनवानांनीं आपल्या उदाहरणानें करावा; आपली संपत्ति राष्ट्रार्पण करावी. पं. जवाहरलाल नेहरुंचें उदाहरण खरोखर आदर्श स्वरुपाचें आहे!

**शेतकरी**—राष्ट्राचा उद्धार, एक दोन गोष्टी केल्यानें होणार नाहीं कीं चार दोन माणसांच्या परिश्रमानें साधणार नाहीं. राष्ट्राच्या प्रत्येक घटकानें त्यांत आपुलकीनें भाग घेतला पाहिजे.

देशांत ७०-८० टक्के लोक शेतकरी आहेत. या बहुसंख्य समाजाच्या हातांतच राष्ट्राचा उद्धार आहे. राष्ट्राचे खरे मालक हेच आहेत. एक काळ असा येईल कीं, हेच राज्याचे मालक बनतील. यांची शक्ति अमर्याद आहे पण तिचें संघटण होणें आवश्यक आहे. देशांतील निरनिराळे पक्ष यांच्या संघटणेचें कार्य करतात; पण पक्षीय राजकारणाच्या दृष्टिकोनांतून. यांत त्या विचाऱ्यांचा अगर देशाचा काडीमात्र फायदा होणार नाहीं. त्यांची दिशाभूल न करतां त्यांना त्यांच्या कामांत कोणत्या प्रकारें सहाय्य करतां येईल हें पाहिलें पाहिजे. ते अत्यंत विश्वासू असतात. त्यांच्यांत ऐक्य भावना अधिक असते. त्यांच्या या सद्गुणांचा सदुपयोग करून घेऊन राष्ट्राच्या उद्धारांत मोठ्यांत मोठा हिस्सा उचलण्याची संधि त्यांना दिली पाहिजे.

**मजूर**—देशांत मजूर वर्ग बराच मोठा आहे; पण तो अशिक्षित आहे. या वर्गाला साक्षर करून घेतलें पाहिजे. त्यांची व्यापक स्वरूपांत संघटना होणें आवश्यक आहे. यांचे जीवनमान सुधारून त्यांच्या सुखसोयी व शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे; तरच अधिक उत्पादनाचीअपेक्षा त्यांच्या कडून करतां येईल. असंतुष्ट मजूर राष्ट्राच्या उत्पादनात कितपत भाग घेऊं शकेल !

**आदिवासी**—आदिवासी म्हणजे या देशांतील मूळचे रहिवाशी. पण सध्यांची त्यांची स्थिती पाहिली, तर कधीं त्यांचा हा हक्क या देशावर चालला असेल, असें वाटत नाहीं ! पाहुणे आले तेच घरमालक होऊन बसले ! खरा मालक आपल्याच घरांत बंदिवान बनला !

आज हा दोन कोटींचा समाज माणूसकीच्या प्राथमिक गरजांनाहि पारखा राहिलेला आहे, मग शिक्षण व इतर सुधारणा कोठून झाल्या असणार ! या येवढ्या प्रचंड समाजाकडे पाहाण्याचीहि गरज आजपर्यंत आपणांस कधीं भासली नाहीं. स्वतंत्र भारतांत जर आपण ४० कोटी जनतेचें कल्याण करूं पाहतों तर त्यांतल्याच या २ कोटी जनतेकडे दुर्लक्ष करून कसें चालेल ? यांच्या उद्धाराची सर्वांआधीं काळजी घेतली पाहिजे. त्यांना इतर समाजाच्या

पातळीवर आणून सोडलें पाहिजे. हें काम तितकेंसें सोपें नाहीं. सरकार या गोष्टीकडे लक्ष देत आहे. ठक्करबाप्पा, बाळासाहेब खेर यांनीं या क्षेत्रांत ठीक कार्य केलें आहे. इतरहि कांहीं कार्य करीत आहेत; पण तें अपुरेंच आहे. यम समाजांत राहून कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची फार आवश्यकता आहे. गांधीजींनीं याच दृष्टीनें रचनात्मक कार्यक्रमांत याला स्थान दिलें होतें. हें कार्य थोर देशसेवेचें आहे असें तें मानीत.

**महारोगी**—मध्य आफ्रिकेनंतर या बाबतींत दुसरा नंबर हिंदुस्थानचा लागतो.

देशांतील कार्यकर्त्यांचे लक्ष या गोष्टीकडे लागायला पाहिजे तेवढें लागूं शकलेलें नाहीं. ज्याला खायाला मिळतें त्याला पोट फुटेपर्यंत, पण उपाशी राहाणारा सदा उपाशीच ! अशी स्थिति या बाबतींत झालेली आहे. सुस्थितींत असलेल्यांची कोणीहि चौकशी करील, पण अत्यंत हीन दैना स्थितीस पोंचलेल्या अशा या अपंगाची चौकशी करणें, त्यांचें दुःख कमी करण्याचा प्रयत्न करणें याला सेवा-धर्मांत थोरस्थान आहे.

महारोग्यांचा हा प्रश्न राष्ट्रीय स्वरुपाचा प्रश्न आहे. सरकारनेंच पुढाकार घेऊन जनतेस मार्गदर्शन करायला पाहिजे.

**विद्यार्थी**—सध्याचे विद्यार्थी भावी काळचे राष्ट्र संचालक आहेत त्यांच्यावरचेदशाचें भविष्य अवलंबून आहे. देशाच्या आशा आकांक्षा तेच पुऱ्या करूं शकतील. या दृष्टीनें पाहातां विद्यार्थी हा खरा विद्यार्थीच असला पाहिजे. राजकारणांत अगर पक्षोपक्षांच्या भानगडींत त्यानें पडतां कामा नये. ज्ञानार्जन ज्ञानसंवर्धन हेंच त्याचें ध्येय असलें पाहिजे. पक्षाच्या हांकेला 'ओ' न देतां राष्ट्राच्या हांकेला त्यांनीं अवश्य 'ओ' दिला पाहिजे. त्यांची वागणूक अहिंसक मार्गाची असावी कारण विद्येसारखें पवित्र क्षेत्र दुसरें नाहीं. या या पवित्र क्षेत्रांत हिंसेच्या राक्षसी मनोवृत्तीस थारा नाहीं.

विद्यार्थी अहिंसक सत्याग्रही असला पाहिजे. अन्यायाचा प्रतिकार, हक्काची जाणीव दुसऱ्यास किंवा सत्ताधारी संस्थेस करून देण्याकरितां त्यानें सत्याग्रह अवश्य करावा. धाकदपटशानें नव्हे, तर प्रेमानें दुसऱ्याच्या मनांत परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांनीं करावा. याकरितां त्यांनीं पुढील कांहीं गोष्टी अवश्य ध्यानांत घ्याव्यात—

(१) विद्याध्ययन हेंच ध्येय.

(२) अन्यायाचा प्रतिकार करण्याकरितां व हक्काची जाणीव करून देण्याकरितां क्वचित प्रसंगीं ‘ सत्याग्रह ’

(३) शास्त्रोक्त पद्धतीनें कताई करणें व त्यांत लपलेल्या आर्थिक, सामाजिक, नैतिक व राजनीतिक गोष्टींचे अध्ययन करणें.

(४) खादी व स्वदेशी वस्तूच वापराव्यात.

(५) राष्ट्रगीत व राष्ट्र-निशाण याबाबतींत दुसऱ्यावर सक्ती करूं नये.

(६) धार्मिक व जातीय भेदभाव न मानतां परधर्म सहिष्णुता व बंधुभावानें वागावें.

(७) दुःखाच्या ठिकाणीं धावून जावें. ग्रामसफाई, भंगीकाम यांत भाग घ्यावा. खेड्यांतील प्रौढ स्त्री-पुरुषांनां शिकविण्याचें काम करावें.

(८) राष्ट्रभाषेचें अध्ययन करावें.

(९) आपण जें शिकूं तें उत्तम रीतीनें समजून घेऊन त्याचा दुसऱ्यास फायदा देऊं, ही मनोवृत्ति असली पाहिजे.

(१०) प्रत्येक व्यवहार शुद्ध व उघड असावा, निर्भयतेनें वागावें, अहिंसक मार्गानें जुलुमाचा प्रतिकार करावा, दीन दुर्बलांचे रक्षण करावें व स्वदेशार्थ प्राणार्पणास नेहमीं तयार असावें.

(११) आपल्या सोबत्यांशीं सभ्यतेची व प्रेमाची वागणूक असावी.

वरील प्रकारचा कार्यक्रम गांधीजींनी विद्यार्थ्यांपुढें मांडलेला आहे. ते म्हणतात" कार्यक्रमाबद्दल मी सक्ती करूं इच्छित नाहीं; परंतु या कार्यक्रमाप्रमाणें वागणें विद्यार्थ्यांचें कर्तव्य आहे, यांत त्याचा फायदा आहे."

गांधीजींचा रचनात्मक कार्यक्रम हा नवीन शिक्षणास पोषक असाच असल्यामुळें त्याचा या ठिकाणीं स्वतंत्र प्रकारे थोडक्यांत त्यांच्याच शद्बांत उल्लेख केलेला आहे. आशा आहे कीं, तो थोडें तरी मार्ग दर्शनाचें काम करूं शकेल.

# समवाय

वर्धा-शिक्षण योजना आणि समवाय-शिक्षण पद्धति यांचा संबंध अगदीं निकटचा आहे. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं यांचा जन्म एकदमच झालेला आहे.

समवाय म्हणजे समन्वय-सांगड-सांखळी किंवा जोड. हा जोड कशाचा कशाशीं व कसा, तर बौद्धिक ज्ञानाचा मूलोद्योगाच्या क्रियेशीं, अगदीं नैसर्गिक रीत्या.

बुद्धि आणि श्रम यांचा तुटलेला संबंध जोडण्याचें काम ही समवाय शिक्षण पद्धति करणार आहे. म्हणून बेसिक शिक्षण योजनेंत नुसतें मूलोद्योग अगर हस्तव्यवसाय शिकविण्यास कांहींच महत्त्व नाहीं. ज्ञान देणें हेंच महत्त्वाचें आहे; परंतु तें ज्ञान परिणामकारक रीतीनें दिलें गेल्यास टिकाऊ स्वरूपाचें होईल या हेतूनें ते क्रियेशीं जोडून द्यावें, असें, ही बेसिक योजना सांगते.

बुद्धीचे गुलाम किंवा श्रमाचे हमाल निर्माण करावयाचे नसून बुद्धि आणि श्रम हे एकाच वेळीं करूं शकणारे नागरिक निर्माण करावयाचे, हा या योजनेचा प्रमुख हेतु आहे. नुसत्या बौद्धिक ज्ञानानें मेंदूला श्रम पडतात, पण शरिराला स्पर्शहि त्याचा होत नाहीं, त्यामुळें मनुष्याचा सर्वांगीण विकास या नुसत्या बौद्धिक ज्ञानात साधूं शकत नाहीं. समवाय पद्धति ही उणीव भरून काढील असा योजना कर्त्यांना पूर्ण विश्वास आहे.

योजना आखली जाणें वेगळें व तिची अंमलबजावणी होणें वेगळें. जर त्या योजनेची यथार्थ कल्पना आलेली नसेल तर तिच्यांत विकृति निर्माण होण्याचा फार संभव असतो, या करितां योजनेच्या मागचा हेतु, कार्यकारण भाव तिचें यथार्थ स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न या क्षेत्रांतील प्रत्येकानें करावयास पाहिजे. कांहीं तरी वरवरची माहिती मिळवून बरा किंवा वाईट ग्रह करून घेणें योग्य होणार नाहीं. या दृष्टीनें ट्रेनिंग कॉलेजांनीं या समवाय पद्धतिबाबत विशेष जागृत राहिलें पाहिजे.

वर सांगितलें गेलें आहेच कीं, समवाय हा कोणत्या तरी मूळ क्रियेशीं जोडावयाचा असतो. प्रथम उत्पादनशील अशी कोणती तरी क्रिया करावयाची व त्यांतून ज्या बौद्धिक ज्ञानाची आवश्यकता निर्माण होईल तें बौद्धिक ज्ञान मुलांना द्यावयाचें.

आतां, जर मुलांना बौद्धिक ज्ञान द्यावयाचें आहेच तर मग तें सर्व नेहमींच उत्पादनशील अशा मूलोद्योगांतूनच देतां येईल काय? हा प्रश्न उभा राहातो. या प्रश्नाचें उत्तर म्हणजे योजनेचा तसा आग्रह नाहीं; पण प्रायः दृष्टि तशी अवश्य असावी. या एकाच गोष्टीवरून योजनेची लवचिकता विशेष प्रामुख्यानें नजरेस येते. मागें सांगितलेलेंच आहे कीं, योजना जशी कठीण तशी लवचिकहि बनविण्याचें धोरण अंगिकारलेलें आहे.

या लवचिकपणांत योजनाकर्त्यांनीं समवायाला क्षेत्रहि निर्माण करून ठेवलेलें आहे.

जे विषय मूलोद्योग व इतर हस्तव्यवसायांमार्फत शिकविणें शक्य नसतील ते सामाजिक, नैसर्गिक व नित्यनैमित्तिक परिस्थितींतून शिकविण्याचा प्रयत्न करावा.

सामाजिक परिस्थिति म्हणजे सण, समारंभ, उत्सव, जयंत्या, पुण्यतिथ्या, राष्ट्रीयदिन व इतर सांघिक रीतीनें साजरे करावयाचे बालदिन, आरोग्यदिन या सारखे दिन. या सामाजिक परिस्थितींत राष्ट्रीय व धार्मिक उत्सवांचाहि समावेश केलेला आहे.

गुढी पाडवा, रामनवमी, हनुमान जयंति, गणेश चतुर्थी, गोकुळ अष्टमी, नवरात्र– विजयादशमी, दिवाळी, होळी इत्यादि हिंदुसणांमार्फत इतिहास, भूगोल, समाजशास्त्र वगैरे अनेक विषयांचे परिणाम कारक असें ज्ञान मुलांना देता येईल. ईद, मोहरम, रोजे यांच्या मार्फतहि मुसलमानच्या इतिहासाची

माहिती देतां येईल. त्याचप्रमाणें पारशी व ख्रिस्ती सणांमार्फत त्यांच्या इतिहासाची व चालीरीतींची माहिती करून देतां येईल.

जयंत्या, पुण्यतिथ्या, हुतात्मा-दिन यांच्या मार्फत त्या त्या पुरुषांच्या चरित्रांचा आपणास अभ्यास करतां येईल. राष्ट्राच्या अभ्युदयांत कोण कोणत्या वीरांनीं कोणती कामगिरी केली हें मुलांना सांगून त्यांचा स्वदेशाभिमान जागृत करतां येईल, देशासाठीं आपण काय केलें पाहिजे याची जाणीव होईल. 'राष्ट्रीयदिन' हे 'कर्तव्यदिन' म्हणून यापुढें साजरे करावयाचे असल्यामुळें विधायक कार्यक्रमामार्फत विद्यार्थी समाजापर्यंत जाऊन पोंचतील. सेवेचा पहिला धडा त्यांना अशा रीतीनें शाळेत असतानाच मिळेल. आपलें ज्ञान, आपली शक्ति ही दुसऱ्याकरितां आहे याची जाणीव होण्यापरतें दुसरें शिक्षण तें कोणतें ?

अशा प्रकारें या सामाजिक परिस्थितींतून अनेक विषयाचें ज्ञान देतां येईल. मात्र शिक्षकाच्या मनाशीं त्या सर्व गोष्टींचा आराखडा तयार असला पाहिजे. अमुक सण साजरा करावयाचा व त्यामार्फत अमुक अमुक विषयांचे ज्ञान मुलांना द्यायचें, हें शिक्षकाच्या मनाशीं निश्चित तयार असलें पाहिजे. सण-समारंभ कायद्यानें पार पाडले पाहिजेत असें सांगितलेलें असल्यामुळें ते साजरे करावयाचे, या मनोवृत्तीस कांहीं अर्थ नाहीं. कायदा असो अगर नसो, आपल्या कर्तव्याच्या कायद्याला स्मरूनच शिक्षकानें या गोष्टींकडे पाहिलें पाहिजे.

आज अमुक कार्यक्रम आपण आंखलेले आहेत तो सर्व शाळेकरितां असेल तर सामान्यरीतीनें कोणत्या विषयाकडे आपण लक्ष दिलें पाहिजे, एकाद्या यत्तेकरितांच कार्यक्रम असेल, तर त्या यत्तेस असलेल्या अभ्यासक्रमांतील कोणत्या भागाची आज आपणांस माहिती देतां येणें शक्य आहे; इतिहासाची, भूगोलाची, शास्त्राची कीं, भाषेची तें आरंभीं ठरविलें पाहिजे. मात्र विद्यार्थ्यांना अगदीं नकळत तें दिलें जाईल याची खबरदारी घ्यावी

लागेल. कारण ' आपणांस हें शिकायचें आहे ' म्हणतांच मुलांचे लक्ष द्विधा होईल. समारंभांत जो आनंद, जो उत्साह त्यांना वाटणार होता, तो नाहींसा होईल. त्यांचा आनंद अशा प्रकारें विषयाची स्पष्ट जाणीव करून देऊन नाहींसा करणें म्हणजे शिक्षण शास्त्रदृष्टया मोठा गुन्हाच करण्यासारखें आहे. आणि समयवाय पद्धतींतील हेंच वैशिष्ट्य आहे, कीं मुलांचा आनंद व उत्साह कायम राखून त्यांना त्यांच्या कलानें शिकूं देणें.

नैसर्गिक परिस्थिति म्हणजे ऋतुमानामुळें निर्माण होणारी परिस्थिति उन्हाळयांत, समुद्रसपाटीला दिसून येणाऱ्या हवामानाच्या गोष्टी, डोंगर.पर्वत शिखरावरील हवामान, तेथील हवामान अशा प्रकारचें कां ? वालुकामय प्रदेशांत दिसून येणारे चमत्कार, त्यांचीं कारणें, या साऱ्या परिस्थितीचा तेथील लोकांच्या जीवनावर होणारा परिणाम इत्यादि गोष्टी या नैसर्गिक परिस्थीतीमार्फत पाहातां येतील.

पावसाळा आला. नैऋत्य मान्सून वारे वाहूं लागले. ते याच दिशेनें कां वाहतात, हे वारे कोठें निर्माण झाले, ते याच दिशेनें अमुक अमुक प्रदेशाकडेच कां वाहताहेत इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें शोधतां येतील. ढग कसे निर्माण झाले, ढग निरनिराळया रंगाचे कां दिसतात, विजा कां चमकतात, गडगड आवाज कसा निर्माण होतो, वीज पडते म्हणजे काय होतें; या विजेपासून बचाव करण्याकरितां घरावर कोणती योजना करतात, आकाशांत इंद्र धनुष्याचा चमत्कार दिसतो. अशीं इन्द्रधनुष्यें केव्हां केव्हां दिसूं शकतात, कां दिसतात, त्यांत दिसणारे सातरंग कोठून आले, शास्त्राच्या कोणत्या नियमानें हें झाले इंद्र धनुष्यांतील रंगात खालच्या बाजूलाच लाल रंग कां दिसतो इत्यादि अनेक विषयांचें ज्ञान मुलांना करून देतां येईल. समकेंद्र पद्धतीनें हें ज्ञान द्यावयाचें असल्यामुळें यापैकीं कोणत्या गोष्टीचें अधिक स्पष्टीकरण कोणत्या यत्तेंत करावयाचें हें शिक्षकानें ठरवायचें असतें.

पाऊस पडला. नद्यांना पूर आले. नाले, ओढे वाहूं लागले. तळीं तुडुंब भरून गेलीं. जिकडे तिकडे हिरवें गार झालें, हे प्रसंगहि मुलांना

प्रात्यक्षिकांतून ज्ञान देण्यास योग्य असतात. पावसामुळें झरे निर्माण झाले. झरे मिळून ओढे बनले व असे ओढे एकत्र येऊन त्यांची नदी निर्माण झाली, हें मुलांना प्रत्यक्ष पाहतां येईल. या संबंधींचें ज्ञान उन्हाळ्यांत व तेंहि वर्गांत बसून कसें बरें देतां येईल ! तेव्हां अशा प्रकारचा अभ्यासक्रमांतील भाग ऋतुवार वाटून ठेवावा व योग्य संधी मिळतांच पुरा करून घ्यावा. पुस्तकांत इंद्र धनुष्याचा धडा ५ वा आहे. पहिले चार धडे उन्हाळ्यांत शिकविले, लगेच याचा नंबर आला, म्हणून तोहि धडा उन्हाळ्यांत शिकवून टाकायचा, हें शिक्षण नव्हे. जोपर्यंत अशीं ऋतुमानाप्रमाणें धड्यांची रचना असलेलीं पुस्तकें शिक्षकाच्या हातीं पडलेलीं नाहींत, तोंपर्यंत शिक्षकानें स्वतःच्या बुद्धिमत्तेनेच चालू असलेल्या पुस्तकांतील धड्यांचा क्रम लावून घ्यावा. यांत कोणत्याहि प्रकारचा गुन्हा होऊं शकत नाहीं.

हिवाळ्यांत अमुक देशांत थंडी कां व अमुक देशांत उन्हाळा कां, एकाच देशांतील त्या त्या प्रांतांत थंडीचे प्रमाण कमी जास्त कां; सूर्याच्या उदयास्तांचें निरीक्षण करून दक्षिणायन, उत्तरायण म्हणजे काय, याची माहिती मुलांना देतां येईल. अति थंडीचे काय परिणाम होतात, वनस्पती व प्राणी यांची काय स्थिति होते, या थंडीमुळें लोकांच्या राहाणींत कसकसा फरक पडत जातो याचेंहि ज्ञान मिळवितां येईल.

अशा प्रकारें ऋतुमानाच्या परिस्थितींतून सामान्यतः आपणांस कसें काय ज्ञान देतां येणें शक्य आहे, हें आपण पाहिलें. या नैसर्गिक परिस्थितींतून शिक्षण द्यायचें म्हणजे निसर्गाकडे गेलें पाहिजे. सहली काढून आपणांस निसर्गाच्या सान्निध्यांत राहातां येईल. म्हणून जसें मूलोद्योगांमार्फत शिक्षण देऊं शकूं, तसें सहलींमार्फतहि आपणांस शिक्षण देतां येईल.

सूर्य, चंद्राचे उदयास्त. रात्रीच्या वेळीं आकाशांत दिसणारे चमत्कार. ग्रह, नक्षत्रें, उल्कापात, वगैरेंचे प्रत्यक्ष निरीक्षण करून खगोलासंबंधीं माहिती मिळवितां येईल. चंद्र, चंद्राच्या कला त्यांचा उदयास्त यावर

अवलंबून असलेली भरती ओहोटी या संबंधीं प्रत्यक्ष निरीक्षणानेंच अधिक माहिती होणें शक्य आहे.

समवाय पद्धति विषयीं आणखीन एका गोष्टीचा स्पष्ट उल्लेख करणें आवश्यक आहे कीं, ही पद्धति चार भिंतीच्या आंत बसून राबवतां येणें शक्य नाहीं; ती शाळेच्या बाहेर पडूनच यशस्वी करतां येईल. आजुबाजूच्या परिस्थितीशीं, निसर्गाशीं तादात्म्य पावून हें कार्य आपणांस साधलें पाहिजे.

# पाठ.

ज्ञान असणें व तें दुसऱ्याला समर्पक रीतीनें देतां येणें यांत महदंतर आहे. ज्ञानी मनुष्य उत्तम शिक्षक असेलच असें नाहीं. ज्याला शिकविण्याची कला अवगत झाली तोच खरा शिक्षक.

ट्रेनिंग कॉलेजें, असे कलावान शिक्षक तयार करण्याकरितांच स्थापन केलेलीं आहेत. अर्थात् खरा शिक्षक जन्मावाच लागतो, हें वेगळें. तरीपण घणाचे सतत घाव सहन करून देवपण प्राप्त होतें, हा अनुभव आहेच! आणि म्हणूनच आम्ही म्हणूं शकतों कीं, ट्रेनिंग कॉलेजें हीं शिक्षक निर्मितीचीं केंद्रें आहेत. या ट्रेनिंग कॉलेजांना 'शिक्षक निर्मितीचे कारखाने' म्हणणें म्हणजे आपलें अज्ञान प्रगट करण्यासारखेंच आहे. कारण कारखान्यांत ठराविक साच्याचा व पद्धतीचाच माल निर्माण केला जातो. ट्रेनिंग कॉलेजांत कांहीं असा निर्जीव माल निर्माण करावयाचा नसतो; तर स्वतंत्र बुद्धिमत्तेच्या तेजानें तळपणारे व दुसऱ्यांना प्रकाश देणारे स्वयंप्रकाशित ज्ञानदीपच तयार करावयाचे असतात!

ही दृष्टि प्रत्येक कॉलेजची असते-असली पाहिजे. जे विद्यार्थी शिकण्यास येतात त्यांना या दिशेनें नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

शिक्षकास विषयाचें भरपूर ज्ञान असलेंच पाहिजे. तें ज्ञान ज्यांना द्यायचें त्या बालमनाचा त्यांनीं अभ्यास करायला पाहिजे. मुलांच्या मनाची, स्वभावधर्माची जर शिक्षकाला परीक्षा करतां आली नाहीं, तर त्यांच्या कलानें त्यांना ज्ञान देतां येणार नाहीं. मुलांच्या मनांतील विचारांच्या प्रवाहाप्रमाणें वाहात जाऊन, कधीं अनुकूल बनवून घेऊन शिक्षकाला आपलें कार्य साधतां आलें पाहिजे. मुलांच्या मनाचा कल सांभाळून शिक्षण देणें कांहीं सोपें नाहीं. या करितां शिक्षकाच्या अंगीं समयसूचकता असलीच

पाहिजे. समयसूचकता ही निर्माण झालेल्या परिस्थितीच्या आकलन होण्या-वर अवलंबून असते. म्हणून शिक्षक चाणाक्ष असला पाहिजे.

म्हणजे, शिक्षक होण्यास ज्ञान असणें व बालमानस शास्त्र जाणणें या या गोष्टींची नितांत आवश्यकता आहे. या पुढील गोष्टी म्हणजे ज्ञान देतां येणें, ही या दोहोंवरच अवलंबून असते. या तिसऱ्या गोष्टीस 'पाठ' या सदरांत ट्रेनिंग कॉलेजांमधून ओळखलें जातें.

पाठ निरनिराळ्या प्रकारचें असतात—सुटे पाठ, जोड वर्गाचे पाठ व समवाय पाठ.

सर्व ट्रेनिंग कॉलेजें 'बेसिक कॉलेजें' बनविण्याच्या धोरणानुसार पाठासंबंधीं शाळाखात्यानें पुढील गोष्ट निश्चित केली आहे—जे पाठ ट्रेनिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं घ्यावयाचे त्यांत ८ सुटे पाठ, २ जोड वर्गाचे पाठ व १० समवाय पाठ, या प्रमाणांत घ्यावेत.

कोणताहि पाठ देण्याच्या ठराविक पायऱ्या व ठराविक पद्धति असते.

**सुटे पाठ**—हे एका वर्गाकरितां, एकच विषय ठराविक वेळांत शिकविण्याच्या दृष्टीनें आंखावयाचे असतात. या पाठाकरितां पुढील माहिती लक्षांत असणें आवश्यक असतें.

इयत्ता कोणती आहे, विषय कोणता शिकवावयाचा आहे, वेळ किती आहे, या वेळांत पुरा होण्याइतकाच भाग प्रथम शिकविण्यास घ्यावयाचा, विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान किती आहे, इत्यादि गोष्टींची माहिती शिक्षकास असली पाहिजे. जो विषय शिकवावयाचा तो परिणामकारक शिकविला जावा याकरितां आवश्यक तें साहित्य जमवावयाचें, ही गोष्टहि विसरतां कामा नये.

विषय-मुद्यांसह, पद्धति-प्रश्नांसह व फळ्यावरील टांचण असे याचे विभाग पाडतात. शिकविण्यासाठीं पुढील पायऱ्यांचा अवलंब केला जातो.

(१) विषय प्रवेश, उपोद्घात किंवा प्रस्तावना.
(२) हेतुकथन.
(३) प्रतिपादन.
(४) आवृत्ति.
(५) गृहपाठ.

नाटकांत, स्टेजवर येतांना पात्र ज्या कौशल्यानें प्रवेश करतें, त्यावरच त्या पात्राबद्दलचा बरा वाईट ग्रह प्रेक्षकांच्या मनांत निर्माण होणें न होणें अवलंबून असतें. ' काय झोकांत तें पात्र स्टेजवर आलें ! असले उद्गार आपण ऐकतों किंवा आपणहि काढतों. या उद्गारावरूनच ही गोष्ट लक्षांत येते कीं, त्या पात्रानें आपल्या मनांत एक विशिष्ट आपुलकीचें स्थान पटकाविलें आहे. आणि प्रेक्षकांच्या मनांतील ही आपुलकीच त्या पात्राच्या कामाच्या यशस्वितेची किल्ली असते. ज्याला ही गोष्ट साध्य करतां आली तें पात्र यशस्वी झालेंच म्हणून समजा !

जशी ही नाटकांतल्या पात्राच्या प्रवेशाची गोष्ट, तशीच शिक्षकाच्या विषय प्रवेश करण्याची गोष्ट. सिताफीनें ज्याला विषय प्रवेश करतां आला, त्याचा निम्माधिक पाठ यशस्वी झालाच !

आतां विषय प्रवेश करतांना कोणी पूर्वज्ञानाच्या चांचणी प्रश्नांवरून करील, कोणी चित्र किंवा वस्तु दाखवून करील किंवा कोणी तात्कालिक परिस्थितीचा आधार घेऊनहि प्रश्नोत्तरांनीं करील. या ठिकाणीं एकच गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे कीं, प्रस्तावना कृत्रीम व लांबलचक असतां कामा नये. २-३ मिनिटांत पद्धतशीर विषय प्रवेश करतां आला पाहिजे.

हेतुकथन—मोजक्या शब्दांत व स्पष्ट रीतीनें करावें. मात्र अंकगणित, व्याकरण या विषयांचें हेतुकथन आरंभीं करावयाचें नसतें. हें एकदोन वाक्यांतच झालें पाहिजे.

७४०२

**प्रतिपादन**—विषयाच्या विस्ताराप्रमाणें त्याचे भाग पाडून त्यावर प्रश्नोत्तरानें चर्चा करावी. विषय मुलांशीं चर्चा करूनच स्पष्ट होत जावा. मुलांकडून विषयाची उकल केली जावी, या करितां शिक्षकाची प्रश्नशैली अचूक असायला पाहिजे. प्रश्नशैली ज्याला साधली आहे त्याला स्वतःला विशेष स्पष्टीकरणासाठीं व्याख्यानबाजी करावी लागत नाहीं. अशा शिक्षकाच्या श्रमाची व वेळेची बचत होऊं शकते. मात्र इतिहासा सारखे कांहीं विषय शिकवितांना कथन पद्धतीचाच विशेष उपयोग करावा लागतो.

प्रतिपादनांत दुसरी गोष्ट ही लक्षात ठवली पाहिजे कीं, कोणता मुद्दा विद्यार्थ्यांकडून सोडवून घेतां येईल व कोणता मुद्दा आपणांसच स्पष्ट करून सांगितला पाहिजे, याची जाणीव शिक्षकास असली पाहिजे. नाहीं तर विद्यार्थ्यांच्या आवाक्या बाहेरचा विषय आहे व शिक्षक उलट सुलट प्रश्न करून तो विषय मुलांकडून काढून घेण्याचा प्रयत्न करीत आहे: ही स्थिति महाभयंकर होय.

या प्रतिपादनाच्या वेळींच फळ्यावरील टांचण करावयाचें असतें. कोणी विषयाचा एक मुद्दा शिकवून झाल्यावर फळालेखन करतो. कोणी विषय शिकवून झाल्यावर करतो तर कोणी चर्चा चालू असतांनाच फळालेखन करण्याकरितां वारंवार फिरकत असतो. पहिल्या दोन पद्धती तिसरी पेक्षां अधिक योग्य आहेत.. वारंवार फळ्याकडे जाण्यांत कालापव्यय होत असतो, म्हणून ही तिसरी पद्धति टाळावीच.

विषय प्रतिपादनाच्यावेळीं आवश्यक त्या साहित्याचा अचूक उपयोग करतां आला पाहिजे. साहित्य पुष्कळ असूनहि पाठांत अयशस्वी होणार विद्यार्थी कांहीं कमी नसतात. तेव्हां साहित्यहि अतिनसावें. ठळक गोष्टींचें स्पष्टीकरण करतां येईल असेंच तें निवडक असावें. केव्हां केव्हां विषयाची साखळी तुटते. शिक्षक गोंधळून जातो व या गोंधळांत तो काय करतो याचा त्यालाच पत्ता राहात नाहीं. तेव्हां साखळी तुटली तरी भेदरून जातो कामा

नये. धीटपणानें व प्रसंगावधान राखून विचाराची व विषयाची मांडणी जोडून घ्यावी. धीटपणा हा आवश्यक गुण आहे.

प्रश्न हा पाठाचा आत्मा आहे. तेव्हां त्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. प्रश्न हे शिक्षकांनी मुलांस, मुलांनी शिक्षकांस व मुलांनी मुलांस विचारावयाचे असतात.

प्रश्न बोलण्याभाषेंत, योग्य आवाजांत अगदी स्पष्टपणें विचारावेत. प्रश्नाची भाषा स्वभाविक नेहमींच्या वापरांतली असावी. प्रश्न शक्यतों एकदांच उच्चारावा, यामुळें मुलें नेहमीं तयार राहातात.

प्रश्न सूचक, मोघम, अंदाजी, नंदीबैली व पुच्छपद्धतीचे नसावेत.

प्रश्न, सर्व वर्गाला विचारावा. यामुळें विद्यार्थ्यांचें लक्ष आपणाकडे केंद्रित करतां येतें. शिक्षकांनी तरतरीतपणें जर प्रश्न विचारला तर मुलांचें लक्ष वेधून घेण्यास त्याची फार मदत होते.

मुलांकडून चुकीचीं उत्तरें आल्यास शिक्षकानें रागावून जातां कामा नये. तीं चुकीचीं कां येतात याचा विचार करावा. एक विद्यार्थी चुकला तर दुसऱ्याकडून त्याचें उत्तर मिळविण्याचा प्रयत्न करावा. थोडें बरोबर व थोडें चूक असेल तर त्याची दुरुस्ती करून घ्यावी. कच्च्या, खोडकर व शेवटीं बसणाऱ्या मुलांवर अधिक लक्ष असावें. आळशी मुलास गप्प बसवि-ण्याचें सामर्थ्य शिक्षकाच्या प्रश्नांत असतें. त्याचा योग्य वेळीं उपयोग केल्यास आळशी मुलांना खोड्याकरण्यास संधी मिळूं शकत नाहीं. शिक्षकाची सर्व विद्यार्थ्यांवर जागती-नजर असली पाहिजे म्हणजे पाठांत गोंधळ माजत नाहीं. मुलांचें अवधान शेवटपर्यंत राखतां आल्यास पाठांत अपयश येण्याचें कारणच नाहीं.

फळा लेखन टापटिपीनें करावें. खडूचा आवाज होऊं नये. आवृत्ती-पूर्वी फळा पुसावा. फळा हातानें केव्हांहि पुसूं नये.

**आवृत्ति**—शिकविलेला विषय समजला कीं नाहीं हें आवृत्तींत पाहावयाचें असतें. निरनिराळ्या विषयांची आवृत्ति निरनिराळ्या प्रकारानें घ्यावयाची असते. अंकगणितांत उदाहरण सांगून. भाषा विषयांत, प्रश्न लिहायला देऊन किंवा नुसते तोंडी प्रश्न विचारून, इतिहास, भूगोल या विषयांतहि अशाच प्रकारें उजळणी ( आवृत्ति ) घेण्याचा प्रघात आहे.

कोणत्याहि प्रकारें आवृत्ति घ्या, त्यावरून विषय कळला किंवा नाहीं हें अजमावतां आलें म्हणजे झालें.

**गृहपाठ**—फळा लेखन व गृहपाठ या पाठांतील दुय्यम गोष्टी आहेत. गृहपाठ देण्याची पद्धति, जुनी पद्धति आहे. गृहपाठ दिलाच पाहिजे असें नाहीं. दिल्यास तो तपासण्यासाठीं ' करून घेऊन या ' अशा स्वरूपाचा शक्यतों असूं नये. शाळेत एकादी कविता अगर गोष्ट मुलांना आवडली असेल तर ती कविता मुलें घरीं आवडीनें म्हणतात, किंवा भाईला, दादाला, ताईला किंवा इतर कोणत्याहि आवडीच्या माणसाला गाऊन दाखवितात; गोष्ट आवडली असल्यास ती घरीं सांगतात. आणि हाच खरा गृहपाठ होऊं शकतो. ' अशा नमुन्याचीं पांच उदाहरणें सोडवून आणा ,' हा गृहपाठ मुलांना त्रासदायक वाटल्यावांचून राहात नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं गृहपाठ लिहून आणण्यास द्यायचा व आणल्यानंतर तो तपासायचा नाहीं, असें मुलांना दिसून आल्यास मुलांचा तो एक थट्टेचा विषय होऊन बसतो. म्हणून गृहपाठ अशा स्वरूपाचा देऊं नये, हेंच बरें.

**जोडवर्गाचे पाठ**—ज्या ठिकाणीं एका शिक्षकाला दोन दोन किंवा त्यापेक्षां अधिक वर्ग शिकवावे लागतात, त्या ठिकाणीं या पाठांचा उपयोग

करावा लागतो. विशेषतः खेडेगांवच्या शिक्षकाच्या नशिबांत असे वर्ग असतात. अशा वेळीं त्या सर्व वर्गांना एकाचवेळीं शिकविणें कांहीं शक्य नसतें. आणि जर शिक्षण चालू नसेल तर विद्यार्थी गप्प बसणेंहि शक्य नसतें. त्यांना कामांत गुंतवून ठेवून अशी शाळेची शिस्त राखतां येते. कामांत गुंतवून ठेवायचें म्हणजे, उजळणी काढा, शुद्धलेखन काढा, पुस्तक वाचा नाहीं तर ड्रॉइंग काढा असें सामान्यतः मुलांना सांगण्यांत येतें. पण वारंवार त्याच त्याच गोष्टी करण्याचा विद्यार्थ्यांना कंटाळा येतो. रोज कांहीं तरी नवें त्यांना हवें असतें. तें जर सृजनात्मक असेल, बुद्धीचा व्यवसाय असेल, तर त्यांत मुलांचें मन रमतें-म्हणून अशा शाळेवरील शिक्षकानें असे अनेक व्यवसाय शोधून काढून तयार ठेवले पाहिजेत कीं, ते वर्षभर पुरूं शकतील. अर्थात अशा शिक्षकाला श्रमहि फारच करावे लागतात.

या पाठपद्धतींत एका वर्गाला नवीन विषय शिकवायला घेतला तर दुसऱ्या वर्गाला मागील भागाची उजळणी घेण्याचा किंवा झालेला भाग घटविण्याचा उद्योग लावून दिला पाहिजे. असें करतांना, पाठ ठराविक मुदतींत पुरा करावयाचा असल्यामुळें त्याचे काल खंड पाडणें आवश्यक असतें. ज्या वर्गाला उजळणी पाठ द्यावयाचा त्या वर्गाला प्रारंभीं अगदीं तयार स्वरूपाचा व्यवसाय चटकन द्यावा व हा १० मिनिटांचा व्यवसाय असेल तर या नवीन विषयाच्या वर्गाला १० मिनिटें पर्यंत शिकवावें. लगेच शिकविलेल्या भागावर ४–५ मिनिटांचा व्यवसाय देऊन त्या पहिल्या वर्गाला दिलेला व्यवसाय या मुदतींत तपासावा. तपासून होतांच पुन्हां दुसरा व्यवसाय तपासून राहिलेला भाग शिकवून पुरा करावा व आवृत्तीचे प्रश्न द्यावेत. हें काम १० मिनिटें पर्यंत चालावें. नंतर पहिल्या वर्गाला दिलेला व्यवसाय तपासावा व गृहपाठ द्यावयाचा असेल तर देऊन वर्ग सोडावा. शेवटीं दुसऱ्या वर्गाला आवृत्तीचें दिलेलें काम तपासून त्यानाहि सोडून द्यावें.

अशा प्रकारें अत्यंत चलाखीनें हा जोड वर्गाचा पाठ घ्यावा लागतो.

शिक्षकाला फुरसत घेतां येत नाहीं.

**समवाय पाठ**—मागील प्रकरणांत समवायाबद्दल आपण विचार केलेलाच आहे. या ठिकाणीं समवायाच्या पाठाचें स्वरूप कसें असतें येवढेंच पाहावयाचें आहे.

कोणत्याहि प्रकारचा जरी पाठ असला तरी सर्वांस शास्त्रीय पद्धति लागू असतेच. इतर पाठांत जशी पूर्व ज्ञानाची आवश्यकता असते, तशी याहि पाठांत पूर्वज्ञान लक्षांत घ्यावें लागतेंच. इतर पाठ या पूर्वज्ञानावरून, वस्तुदर्शनावरून किंवा चित्रावरून प्रस्तावना करून सुरू केले जातात. समवाय पद्धतीचा पाठ कृति पासून सुरू होत असल्यामुळें कृतीची आवश्यकता काय, येथून पाठास सुरवात होते. आवश्यकता कळल्यानंतर आपणांस ती कृति करावयाची आहे, हें हेतुकथन केलें जातें. म्हणजे, ‘ आम्हांला आतां हें शिकायचें आहे ’ असें या पाठांत विषयाकडे बोट दाखवतां येत नाहीं-कृतीकडे बोट दाखविणें हेंच हेतुकथन.

हेतुकथन झाल्यावर, कृति करण्यास कोणकोणत्या साहित्याची गरज आहे याची चौकशी करून कृतीची पूर्वतयारी करून घ्यावी लागते. या पूर्व तयारींत करावयाचें काम व साहित्य यांचा तुलनात्मक दृष्ट्या विचार करून साहित्याची निवड करावी लागते.

साहित्य मिळविल्यानंतर कृति व्यवस्थित व्हावी. सर्वांना काम मिळावें, श्रमविभागणी व्हावी या हेतूनें कामाच्या अनुरोधानेंच मुलांची संख्या लक्षांत घेऊन मुलांचे गट पाडावे लागतात. त्या प्रत्येक गटांत नायक ठरवावा लागतो. येवढें झाल्यानंतर कोणत्या पध्दतीनें काम करावयाचें, याचें प्रात्याक्षिक शिक्षक करून दाखवितो. नंतर मुलें कामास लागतात. गट नायक व शिक्षकहि त्यांच्या बरोबरीनें कामें करतात. मात्र आपलें काम करीत असतांना इतर

मुलांच्या कामावर त्यांची नजर असते. चुकत असल्यास सूचना दिल्या जातात. कृति पूर्ण होईपर्यंत शिक्षकास अगदीं बारीक नजर ठेवावी लागते. काम चांगलें होण्यास मुलांचा उत्साह कायम राखावा लागतो. अशा समुदायिक रीतीनें केलेल्या कामांत उत्साह वाटतोच पण तो उत्साह त्या कृतीला पोषक अशा गीतगायनानें अधिक वाढवितां येतो. म्हणून अशा मूळ कृतीच्या वेळीं सामुदायिक रीतीनें गाणीं गावींत. या गाण्याच्या नादांत काम केव्हां पुरें झालें हें मुलांना कधीं कधीं कळतहि नाहीं, व त्यांचा उत्साह अधिकच वाढतो!

अशा उत्साही वातावरणांत मूळ कृति संपल्यानंतर शिक्षक मुलांचा हा उत्साह कायम ठेवून सहज निर्माण होणाऱ्या विषयांत मुलांना घेऊन जातो. मुलांना आपण आतां अमुक विषय शिकणार आहोंत, हेंहि सहसा कळूं शकत नाहीं. कारण विषयाचें हेतुकथन करण्याची पद्धत या पाठांत नाहीं. याच विषय प्रवेशाला कृतीशीं समवाय साधणें असें म्हणतात.

कापूस वेंचणी ही मूळक्रिया घेतली तर वेंचणी केलेला कापूस कोठें व कसा ठेवावा, मोठमोठे व्यापारी शेतकरी तो कसा ठेवतात, त्याची कशी काळजी घेतात, हा सामान्य-विज्ञानाचा विषय आपणांस सहज या कृतींतून निर्माण करतां येतो. हा येथें समवाय झाला. यानंतर अशा कापसाचे प्रदेश, लागणारें हवामान कापडाच्या गिरण्या इत्यादि विषय भूगोल या सदरांत समवाय जोडून शिकवितां येतील मुंबई इलाख्यांत ५० लक्ष एकर व समंध हिंदुस्थानांत २॥ कोटी एकर जमीन कापसाच्या लागवडी खालीं असतांना ३५ कोटी रुपये किंमतीचा कापूस परदेशांत कां पाठविला जातो, व कापड टंचाई कां भासते याचीं कारणें स्पष्ट करतांना यंत्रसामुग्रीचा अभाव, गिरणी मालक व मजूर यांची वृत्ति, कामगारांचे संप व मालक व मजूर यांची राष्ट्रीय दृष्टीनें ठरणारीं कर्तव्यें हा समाज शास्त्राचा भाग मुलांना शिकवितां येईल. हा समाजशास्त्राचा समवाय झाला.

अशा प्रकारें कापूस वेचणीला मूळ कृतींतून समवाय पध्दतीनें (१) सामान्य विज्ञान (२) भूगोल व (३) समाजशास्त्र असे बौद्धिक विषय शिकवितां आले.

या ठिकाणीं आपल्या ही गोष्ट ध्यानांत येते कीं, मूळ कृतींत मुलांच्या शरिरास व्यायाम घडून शिवाय आनंद प्राप्त झाला व त्याच आनंदांत त्यांनीं पुढील तीन बौद्धिक विषयाचें सहज ज्ञान मिळविलें. जर हेच बौद्धिक विषय सुटे पाठ घेऊन शिकविले गेले असते तर ते अत्यंत कंटाळवाणें होऊन बसलं असते. तेव्हां समवायाचा पाठ म्हणजे अखंड उत्साह व आनंद टिकविण्याचें शिक्षणशास्त्रांतलें अजोड साधन आहे, हें कळून येतें.

या पाठाची सर्व मदार शिक्षकाच्या चातुर्यावर, उत्साहावर व तन्मयतेवर अवलंबून असते. शिक्षक आपलें स्थान विसरून मुलांत एकरूप झाला पाहिजे. ही तन्मयता ज्या प्रमाणांत त्यास साधेल त्या प्रमाणांत तो समवाय-पाटांत यशस्वी होऊं शकेल.

अशा प्रकारें बौद्धिक विषय शिकवून झाले म्हणजे साहित्याचा व केलेल्या कामाचा आवर करावा लागतो. आणि हें शेवटचें काम फार महत्त्वाचें असतें. सामान्यतः काम झालें म्हणजे माणसाची बेफिकीर वृत्ति वाढते वापरलेलें किंवा आपल्या उपयोगी पडलेलें साहित्य पुन्हां व्यवथित व नीट नेटकें ठेवण्याकडे सर्वांचीच प्रवृत्ति नसते. म्हणून शिक्षकानें मुलांना या शेवटच्या गोष्टीचें आपल्या कृतीनें वळण लावलें पाहिजे. कथेचा समारोप उत्तम रीतीनें करतां येणें जसें महत्त्वाचें असतें, त्याच्या किती तरी पटीनें या पाठाच्या कथेचा समारोप करणें महत्वाचें असतें. हा समारोप साहित्य गोळा करून व्यवथित ठेवून देऊन जागेची स्वच्छता करण्यानें करतां येतो.

वरील विवेचनावरून आपणांस कळून येतें कीं प्रस्तावना, हेतुकथन

कृतीचीपूर्वतयारी, प्रत्यक्षकृति, समवायाचे बौद्धिक विषय व समारोप या पायऱ्यांनीं हे समवाय पाठ घ्यावयाचे असतात. अगदीं आरंभीं टांचणांत विषय नमूद करावे लागतात जसें – (१) मूळकृतीचें नांव व त्यापुढें पाठांत समवाय पद्धतीनें येणारे क्रमवार विषय.

या समवाय पाठाची काळमर्यादा निश्चितअसूं शकत नाहीं. ती मर्यादा मूळ कृति व त्यांतून निर्माण होणारे विषय यावर अवलंबून असते. असले पाठ कमींतकमी ६० मिनिटाच्या १ तासापासून, दोन दोन तीन तीन दिवसाच्या कालमर्यादेपर्यंत चालू शकतात.

अशा प्रकारचे पाठ वर्गाच्या चार भिंतीच्याआंतच चालतील असें नाहीं, तर ज्या ठिकाणीं कृति घडेल त्याहिठिकाणीं ते सुरू करावे लागतील. सहलीस गेलों तर रस्त्या रस्त्यानें पाठ चालू असेल. सणसमारंभाद्वारां पाठ घेतलेला असेल तर तो समारंभ चालू असेपर्यंत तेथेंच पाठ सुरू असेल. म्हणजे मूळ परिस्थिति व बौद्धिक विषय हे तुटले जातील अशी कोणतीहि गोष्ट या पाठांत चालावयाची नाहीं. कृति व बौद्धिक विषय यांची नैसर्गिक रीतीनें जोडली गेलेली सांखळी जोंपर्यंत अखंड आहे असें आपल्या सारासार बुद्धिमत्तेला पटेल तों पर्यंतच हा समवाय पाठ चालू आहे, असें म्हणतां येईल.

पाठाच्या पायऱ्या वर नमुदकेल्या आहेतच. या पाठाच्या टांचणाचें विभाग पुढील प्रमाणें असतात—

| पाठांतील क्रमवारटप्पे | विषयमुद्यांसह | द्यावयाचें ज्ञान | पद्धति व चर्चा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

समवाय पाठाचें वैशिष्टय (१) प्रारंभीं कृति असल्यामुळें शिक्षकास आपल्या मनांतील भीति काढून टाकण्यास सवड सांपडते.

(२) इतर पाठांत प्रस्तावनेचा जो बाऊ वाटतों तो येथें नाहीं. कारण प्रस्तावना ही आपोआपच नैसर्गिक होऊं शकते.

(३) साहित्याच्या जमवाजमवीची व त्या त्या

साहित्याच्या अचूक उपयोगाची जी भीति इतर पाठांत वाटते ती भीति या पाठांत नसते. कारण पुढील बौद्धिक विषयाची उभारणी कृतींतील कामावरून करतां येते.

(४) इतर पाठांत विशेष व आकर्षक कृति नसते त्यामुळें मुलें कंटाळतात; या पाठांत मुलांच्या सृजन शक्तीस व कृतीस भरपूर वाव असल्यामुळें मुलें कामांत गुंतून राहून शिवाय उत्साही राहातात. त्यामुळें वर्गांत शिस्तीचें आपोआप पालन होऊन शिक्षकास पुढील बौद्धिक विषय शिकविण्यास अडचण पडत नाहीं.

[५] वेळेचें काटेखोर बंधन नसल्यामुळें विषयअर्धवट सोडावा लागत नाहीं. त्यामुळें विद्यार्थ्यांची ओढाताण न होतां शिक्षक अधिक निश्चिंतपणें आपला विषय विद्यार्थ्यांस समजावून देऊं शकतो.

[६] या पाठांत वेळ किती लागला हा प्रश्न नसून विषय विद्यार्थ्यांस कळला किंवा नाहीं याकडेच विशेष लक्ष ठेवावयाचें असतें. कारण अमुक वेळांतच इतकें इतकें शिकावें हें बंधन मानसशास्त्र दृष्ट्या योग्य नाहीं.

वरीलप्रमाणें समवाय पाठासंबंधीं पाळावयाचे नियम म्हणा किंवा समवाय पाठाची पद्धति म्हणा, अमलांत येणें आवश्यक आहे. या पाठासंबंधीं अनेक प्रयोग बेसिक बी. टी. कॉलेजांमधून व बेसिक ट्रेनिंग कॉलेजांमधून झालेले आहेत व सर्वानुमतें वरील पद्धति स्वीकारण्यांत आली आहे. कोणतीहि शिक्षण पद्धति राबविण्यापूर्वी तिचे प्रयोग करून पाहणें आवश्यक असतें. त्या प्रकारचे सर्व प्रयोग व सुधारणा होऊन वरील पद्धति कार्यान्वित होत आहे. प्रत्येक ट्रेनिंग कॉलेजांतून हिची अमल बजावणी शक्य तितक्या लवकर झाली पाहिजे. मात्र ती सुरू करण्याचें काम या योजनेच्या तज्ज्ञ शिक्षकांच्या किंवा योग्य व्यक्तींच्या देखरेखीखालीं सुरू केलें जावें, हेंच उचित.

REFBK-0007403